
# ठिणग्या

[redacted]न्त गणेश वझे

म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : १८७२
१८७२



REFBK-0006368

मूल्य १॥ रुपया
आर्यसंस्कृति प्रकाशन
पो.बॉ.२१ पुणें शहर

२८५८
७३४८५
२५।२।७९
~~कथा~~
निबंध
९८०२
दा. क्र.
~~६२९८~~
६३६८

७३०८
२६।२।०९

# ठिणग्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३९८
६३६

लेखक

यशवन्त गणेश वझे,
बी.ए., एलएल.बी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

REFBK-0006368

आर्यसंस्कृति प्रकाशन

१९४३] [मूल्य रु. १॥

(सर्व अधिकार लेखकाचे स्वाधीन.)

मुद्रक व प्रकाशक—
लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८/१७ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें शहर.



...८३४८५... वि: ..निबंध
..१८७२... दि २६-२-

## निवेदन—

वास्तविक 'न बोलायच्या गोष्टीं'चाच हा पुढचा हप्ता आहे. अर्थात् 'ठिणग्या' उडविण्यामागील भूमिका, वर उल्लेखिलेलें पुस्तक लिहितांनाच्या भूमिकेपेक्षां कांहीं विशेष वेगळी आहे असें मुळींच नाहीं. पण, मीं विचार केला कीं जातां जातां आणखी एक पुस्तक आपल्या नांवावर पडतें आहे, तर अशी संधि का सोडा? म्हणून ह्या पुस्तकाला वेगळें नांव देण्याचें मीं ठरविलें.

'न बोलायच्या गोष्टी' प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांचा स्वीकार वेग-वेगळीं माणसें आणि 'गट' कशा तऱ्हेनें करतील याचा मीं स्वतःशीं जो अंदाज केला होता तो पुष्कळशा अंशीं बरोबर ठरला. माझ्या हातीं जे वृत्तपत्रीय अभिप्राय आणि खासगी पत्रांनीं कळविलेलीं निर्भीड मतें आहेत त्यांवरून एकच सूर मुख्यतः निघतो. तो असा कीं 'कुणींतरी हें सगळं स्पष्टपणें बोलून दाखवायला किंवा प्रसिद्ध करायला हवंच होतं.' मीं ती गोष्ट केली हा माझ्या दृष्टीनें तरी केवळ एक योगायोग आहे– त्यांत मीं विशेष असें कांहीं केलें आहे असें मला अजून देखील वाटत नाहीं. अर्थात् ज्यांना माझें लिखाण झोंबेल असें मला वाटलें होतें त्यांचें विव्हळणें गेलीं दोन वर्षें मला अधूनमधून ऐकूं येतेंच. 'न बोलायच्या गोष्टी' प्रकाशित करून मीं कांहीं शत्रू करून ठेविले असणें शक्य आहे याची देखील मला जाणीव आहे. पण मला एवढेंच सांगायचें आहे कीं, कुणाही व्यक्तीशीं माझा हेवादावा नाहीं. मी व्यक्तींना ओळखतच नाहीं.

कोणतीही मतप्रणाली समाजापुढें मांडली जाऊं लागली कीं तिचा खरेखोटेपणा तपासून पाहण्याचा अधिकार प्रत्येकाचाच आहे. व्यक्तिशः माझ्यापुरता तो अधिकार मीं बजावला यांत माझें कांहीं चुकलें असें मला वाटत नाहीं.

मदिरापानानें बेहोष झालेल्या माणसानें धुंदींतच मद्यपानाचा निषेध करावा ही गोष्ट 'कले'च्या दृष्टीनें समर्थनीय ठरत असली तरी व्यवहारांत ती उपहासास्पदच ठरणार. दांभिकपणाच्या आणि 'कंपू'-शाहीच्या बळावर प्रतिष्ठित समजलीं जाणारीं माणसें आपल्या नादान पाग़लपणाचाही गौरव स्वतःच किंवा आपल्या अंकित हस्तकांकडून करवूं लागलीं म्हणजे त्यांच्या त्या वृत्तीवर प्रहार करून त्यांचें खरें स्वरूप समाजाला दाखविण्याची ईर्षा कुणाच्या मनांत उद्भवली तर त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें काय आहे ?

आपल्याला न पटणाऱ्या गोष्टी बोलण्याचा प्रसंग पुष्कळदां आपल्यावर येत असतो. पण तर्कशुद्ध विचाराच्या क्षेत्रांतच जोंपर्यंत आपण वावरत असतों तोंपर्यंत ती गोष्ट क्षम्य ठरते. कारण, व्यक्तीला तात्त्विक वादविवादांत अस्तित्वच नसतें. पण तत्त्वें बाजूला राहून जेव्हां व्यक्तीची बुवाबाजी सुरू होते, त्या वेळीं तत्त्वांच्या पेक्षां अशा व्यक्तींच्या दांभिकपणावरच कोरडे ओढणें अनिवार्य होतें. गोंडस तत्त्वांचें 'पांघरलेलें कातडें' अशा वेळीं आंतल्या 'खऱ्या' प्राण्याचा बचाव करूं शकत नाहीं.

उपहासाचें शस्त्र म्हणजे एक दुधारी सुरीच होय. त्याचा उपयोग इतरांवर करणाऱ्याचाच घात केव्हां होईल याचा नेम नसतो. मराठी साहित्य-क्षेत्रांतल्या गेल्या दोन वर्षांतील घटनांचें वरवर निरीक्षण केलें तर ही गोष्ट अगदीं स्पष्ट होण्यासारखी आहे. असलें घातकी शस्त्र कुणावर चालवायचें याचा विचारच ज्यांना राहिला नाहीं, आपल्या बेजबाबदार प्रचारानें, व 'विकतें तें पिकतें' असल्या आचरट कल्पनेनें समाजाच्या हिताकडे पाठ फिरवून ज्यांनीं स्वतःची तुंबडी

भरून घेण्याचा आणि अज्ञ लोकांच्या डोळयांत ‘नव-विचारांची’ धूळफेक करून आपली प्रतिष्ठा वाढवून घेण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावरच तें शस्त्र अगदीं अल्पावधींत उलटलेलें आपण पाहात आहोंत. तत्त्वाला तत्त्वानें उत्तर द्यायचें हें खरें. पण जिथें मुळांतच तत्त्वाचें अस्तित्त्व नाहीं, विचाराऐवजीं विकारच ज्यांचें अधिष्ठात्रें दैवत आहे, आणि वादाच्या ऐवजीं वितंडवाद आणि कुचेष्टाच ज्यांना अधिक प्रिय आहे, त्यांच्याशीं तात्त्विक चर्चेचा उपयोग काय ? अशा वेळीं त्यांच्याच भाषेंत त्यांची समजूत पाडणें भाग पडतें. विषावर उतारा म्हणून विषाचीच योजना करावी लागते.

‘न बोलायच्या गोष्टीं’च्या टीकाकारांना माझें हेंच उत्तर आहे. अमेरिकेंत जन्म पावलेल्या लैंगिक तत्त्वज्ञानाच्या महाराष्ट्रीय दलालांना आणि आराम खुर्चींतलें राजकारण करण्यासाठींच ज्यांचें अस्तित्व आहे अशा ‘स्थितप्रज्ञ’ आणि पुरोगामीपणाच्या ‘तयार’ कल्पनांचा व्यापार करणाऱ्यांना माझें लिखाण मानवलें नाहीं. पण त्यांनीं मला उत्तर देण्याचा जो प्रयत्न केला तो मात्र अद्वितीय खरा ! एकानें माझ्या एकदोन गोष्टींचा सारांशच छापला पण माझ्या विधानांतील दोष दाखविण्याचा मात्र मुळींच प्रयत्न केला नाहीं. दुसऱ्यांनीं, मला ‘जाब’ विचारण्याचा प्रकट सल्ला आमच्या ‘भगिनीवर्गाला दिला. पण ‘भगिनीवर्गाला’ मात्र आपल्या ‘हक्कांची जाणीव’ अजूनहि झालेली दिसत नाहीं.

उपरिनिर्दिष्ट पुस्तकानंतर जवळजवळ दोन वर्षांनीं तसल्याच प्रकारचें हें आणखी एक पुस्तक मी प्रसिद्ध करीत आहें. आज महाराष्ट्र-साहित्यप्रांतांत दोन विरोधी गट विद्यमान आहेत. महाराष्ट्रीय घाटाच्या पात्रांना पाश्चात्य पोशाख आणि सौंदर्यप्रसाधनें यांच्या साह्यानें मढवून, आणि केव्हां रशियन तर केव्हां अमेरिकन, केव्हां फ्रेंच तर केव्हां इंग्रजी, अशा परकीय जीवनाची ‘कार्बन-कॉपी’ मिळवून तिच्या आधारें एक ‘आंतरराष्ट्रीय’ जात निर्माण

करावयाची आणि तोच बिनशिक्क्याचा माल 'अस्सल देशी' माल म्हणून साहित्याच्या बाजारांत खपवायचा– हाच उद्योग करणारा एक गट आहे. असाच माल बरेच दिवस विक्रीला ठेवला गेल्या-कारणानें सामान्य गिऱ्हाइकाला देखील खरा देशी माल ओळखण्याची पंचाइत पडूं लागली आहे. युद्धजन्य परिस्थितींत वर उल्लेख केलेल्या 'कार्बन-कॉपीज्' देखील मिळणें दुरापास्त झाल्याकारणानें युद्धपूर्व मालच्या स्मृति रंगविण्यापलिकडे ह्या गटाला सध्या फारसें कांहीं करतां येत नाहीं ही वेगळी गोष्ट! दुसरा गट ह्या पहिल्या गटाच्या मानानें लहानसाच आहे. पण त्याचें कार्य 'विध्वंसक' स्वरूपाचें असल्याकारणानें पहिला गट त्याला अलीकडे भिऊन वागूं लागला आहे. आपण 'देशी' बनावटीचा शिक्का मारून जो माल सध्या खपवीत आहों त्यावरचीं बिनशिक्क्याचीं परदेशी आवरणें फाडून त्या मालाचें खरें स्वरूप हा विध्वंसक गट चवाठ्यावर मांडणार नाहीं यासाठीं पहिल्या प्रतिष्ठित गटाच्या जिवाची आटापीट चालली आहे.

समाजाच्या व्यवहारांचें सूक्ष्म निरीक्षण आणि शास्त्रशुद्ध अभ्यास करणाऱ्यांनींच समाजाला मार्गदर्शक झालें पाहिजे. पण त्याऐवजीं केवळ 'तमासगिरांचीं', किंवा 'ललित्यां'चीच ज्यांची खरी भूमिका आहे अशांच्या हातीं समाजकारण जावें ह्यापेक्षां अधिक दुर्दैव तें कोणतें? पण असला भयंकर प्रसंग सध्या तरी आपल्या समाजावर ओढवला आहे यांत संशय नाहीं. बुद्धिवादाच्या निकषावर प्रत्येक सामाजिक व्यवहार पारखून खरी सुधारणा घडवून आणूं पाहणारे कै. आगरकरांसारखे सुधारक कुठें, आणि परकीयांचें अंधानुकरण व विकारप्रधान वृत्ती यांच्या सर्वस्वीं आहारीं गेलेले आजचे आमचे बेगडी सुधारक कुठें? तत्त्वासाठीं समाजाचा छळ सहन करण्यांत सौख्य मानणारे प्रामाणिक समाजकार्यधुरिण कुठें? आणि प्रामाणिकपणाशीं उभ्या जन्मांत ज्यांची ओळख देखील झालेली

नसतांना केवळ जाहिरातबाजीवर सुधारक ठरूं पाहणारे आजचे साहित्यिक-सुधारक कुठें ? अगदीं क्षुल्लकशी एक गोष्ट सांगतों. कोकणस्थ व देशस्थ ह्या ब्राह्मणवर्गांच्याच दोन पोटजातींमध्यें विवाह व्हावा असें दहाबारा वर्षांपूर्वी कलात्मकरीत्या, अगदीं हृदयाला जाऊन भिडणारी कथा लिहून प्रतिपादणारे एक प्रथितयश साहित्यिक आपल्याच देशस्थ व्यवसायबंधूनें कोकणस्थ मुलीशीं विवाह केला म्हणून तिरस्कारानें त्याला 'बाटगा' म्हणून संबोधून त्याचा अपमान करूं पाहतील ही गोष्ट संभवनीय वाटते काय ? पण हें एक 'कटु-सत्य' आहे. बरें, त्यांचें मत आतां बदललें असें म्हणावें तर तशी कबुली द्यायला ते तयार नाहींत. कदाचित् आपल्याला लोक 'प्रतिगामी' म्हणतील अशी भीति वाटत असेल त्यांना ! यावरून, कलेचा आणि प्रामाणिकपणाचा अर्थाअर्थी संबंधच नाहीं असें मानावयाचें काय ?

ह्या प्रश्नाचें उत्तर, नुसता वर वर विचार करून मिळणार नाहीं. कला आणि कलावंत ह्या दोन शब्दांचा विपरीत अर्थ करण्याची संवय लागल्यामुळें असला विरोधाभास निर्माण होत आहे. आपण मानतों कीं जरा खुसखुशीत आणि चुरचुरीत भाषेत चार गंमतीदार गोष्टी लिहितां आल्या कीं झाला 'कलावंत' साहित्यिक. खूप मेहनत करून एकादें पद लोकप्रिय करतां आलें कीं गाणारा ठरला कलावंत. थोडींफार आकर्षक (— मग तें आकर्षण कसल्याहि हीन अभिरुचीचें आणि वरवरचें असो—) चित्रें काढतां आलीं कीं झाला अगदीं अस्सल कलावंत चित्रकार ! पण कला आणि कुसर किंवा हाताचें, गळ्याचें अथवा शब्दयोजनेचें कौशल्य, यांतला फरक आपण ओळखला पाहिजे. 'Beauty is Truth and Truth, Beauty.' तसेंच 'Whatever is Beautiful must also be Good and True' ही विचारप्रणाली ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. 'सत्यं, शिवं, सुन्दरं' हीं जगताच्या आदिसत्त्वाचीं तीन

स्वरूपें आहेत असें मानण्यांत येतें. तत्त्वज्ञानी (किंवा ब्रह्मज्ञानी) 'सत्यं'च्या शोधांत असतो, नीतिशास्त्रज्ञ आणि भक्तिमार्गी 'शिवं'चें चिंतन करीत असतो. त्यांच्याच बरोबरीनें 'सुन्दरं' आत्मसात् करूं पाहणाऱ्या कलावंताचें स्थान किती उच्च आहे याची यावरून कल्पना येईल. अर्थात् नुसती कौशल्यपूर्ण 'कुसर' किंवा कारागिरी कांहीं कला होऊं शकत नाहीं. कलेच्या सर्व अंगोपांगांची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे, म्हणून येथें वरील फरकाचा केवळ उल्लेख केला आहे.

प्रस्तुत कथासंग्रहांतली पहिली कथा पूर्वप्रकाशित असून बाकीच्या सर्व अप्रकाशित आहेत. चिकित्सक वाचकाला कदाचित् त्यांपैकीं कांहीं अतिरंजित वाटण्याचा संभव आहे. पण प्रत्यक्ष वस्तुस्थिती-पेक्षां मी त्यांना अधिक सौम्य स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे एवढें आधीं सांगून ठेवणें अवश्य आहे. मीं ज्या स्वरूपांत त्या मांडल्या आहेत तशा त्या पटत नसल्या तर, वाटल्यास तो माझ्या लेखनपद्धतींतील दोष आहे असें म्हणावें. असा दोष पत्करायला मी केव्हांहि तयार आहें. 'जें जसं जमेल तसं सांगायचं' हें एकच तंत्र मला माहीत आहे. शिवाय व्यावहारिक अडचणींमुळें देखील कांहीं बाबतींतली कार्यकारणमीमांसा आणि तपशील मीं दिले आहेत त्या-पेक्षां अधिक देणें शक्य नाहीं.

तथापि कांहीं गोष्टींचा थोडाफार खुलासा करतां येईल. 'जीवन-स्वर' ह्या माझ्या पहिल्या कथासंग्रहांत सध्याच्या विद्यार्थि-जीवनां-तील कांहीं अनिष्ट प्रवृत्तींवर मीं टीकात्मक, उपहासात्मक कथा प्रसिद्ध केली होती. त्या वेळीं एका प्राध्यापकांनीं विद्यार्थ्यांच्या बाजूनें कैफियत मांडण्याच्या मिषानें असें एक भुळभुळीत विधान केलें कीं 'सध्याच्या तरुण पिढीला दोष देण्याचें कारण नाहीं. त्यांच्यामध्यें सत्प्रवृत्ती खासच आहेत. मात्र त्यांना समजुतदारपणानें फुंकर घालून त्या चेतविणारीं चांगलीं माणसें पाहिजेत.' मशारनिल्हे प्राध्यापक-महाशय यांनीं केलेलें विधान मला सर्वथैव मान्य आहे. इतकेंच

नव्हे, तर या बाबतींत मानभावी पुरस्कर्त्यांपेक्षां तरुण पिढीच्या खऱ्या मनोवृत्तीची साक्ष मीं दररोजच्या निकट परिचयानें अधिक विश्वासानें देऊं शकतों. पण आमच्या तरुण पिढीचें दुर्दैव असें कीं त्यांच्या शिक्षकवर्गाला मात्र आपल्या जबाबदारीची खरी जाणीव नाहीं—त्यांना, फुकटांत मोठेपणा मिळवण्याची, अगदीं 'साहित्यिक' होण्याची आकांक्षा अनिवार झाल्याकारणानें ते आपल्या खऱ्या भूमिकेला पारखे होत आहेत. आपली लोकप्रियता अढळ राहावी यासाठीं ते विद्यार्थीवर्गाला अकारण शेफारून ठेवतात एवढेंच नव्हे तर त्यांच्याकडून अत्यंत गैरशिस्त, असभ्य असें आचरण होऊं लागलें तरी त्याविरुद्ध नुसता ब्र काढण्याची देखील ह्यांना हिंमत होत नाहीं. अशा परिस्थितींत, तरुण पिढीच्या चांगल्या प्रवृत्तींना 'फुंकर' घालण्याचें महत्कार्य करण्याची बुद्धि आणि पात्रता कितीशा शिक्षकांमध्यें— त्याहीपेक्षां प्राध्यापकांमध्यें—असण्याचा संभव आहे ? पूर्वींच्या पिढीपेक्षां आजची पिढी खासच सरस आहे; पण वेगवेगळ्या मिषानें त्यांच्या भोंवतालीं गोळा झालेले, बाजारी वृत्तीचे, नवेजुने पापग्रह देखील अगदीं बलाढ्यसे आहेत यांतहि संशय नाहीं ! साहित्यिकांना समाजानें, आणि शिक्षकवर्गाला शिष्यवृंदानें 'शुद्धीवर आणण्याची' वेळ येऊन ठेपली आहे, हें लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. 'रीगलमधील री-टेक' ह्या कथेमध्यें जें सत्यचित्र रंगविलें आहे तें, तशा तऱ्हेनें वागणाऱ्या विद्यार्थ्यांनीं तर आपल्या अनुभवाशीं ताडून पाहावेंच, पण त्याहीपेक्षां जबाबदार समजल्या जाणाऱ्या शिक्षकांनीं त्याचा अधिक विचार करावा.

संक्रमणावस्थेंतल्या आपल्या समाजाची, जुन्या रूढी आणि नवीन आक्रमक विचार यांच्यामध्यें ओढाताण चालली आहे. जुने विचार आणि पुरातन आचार यांच्या आधारावर, अजूनहि येणाऱ्या परिस्थितीला आपल्याला तोंड देतां येईल अशा भ्रामक कल्पनेनें अज्ञानमूलक स्वस्थतेंत निर्धास्तपणें राहूं पाहणारा जसा समाजाचा

अजूनहि केवढा तरी मोठा भाग आहे, त्याचप्रमाणें कांहींही नवीन दिसलें कीं त्यावर आंधळेपणानें झडप घालून एकदम सुधारणेचें शिखर गांठू पाहणारा वर्ग देखील लहान नाहीं. कोणत्याहि समाजाच्या कुठल्याही अवस्थेमध्यें असले दोन वर्ग नेहमींच असणार. पण ह्या दोन्ही प्रवृत्तींना योग्य ती मुरड घालून, जुन्यामधील अहितकारक गोष्टींचा त्याग आणि नव्यामधील श्रेयस्कर गोष्टींचा स्वीकार डोळसपणें करायला लावणारा विचारवंतांचा वर्गच समाजाची खरी प्रगति साधण्याचें महत्त्वाचें कार्य करीत असतो.

वरील विचार येथें मांडण्याचें कारण एवढेंच कीं आमच्या अज्ञानी आशिक्षित बांधवांची 'सुधारणा' करण्याचा विचार करतांना, आपण ज्या गोष्टी त्यांना शिकवूं पाहतों त्या आपल्या 'सुधारलेल्या' पांढरपेशा समाजाला तरी कितीशा पचनीं पडल्या आहेत किंवा हितकारक ठरल्या आहेत याचा आपण अवश्य विचार केला पाहिजे. नाहींतर, आपल्याच घरांत आरोग्यविघातक, किळसवाणी घाण सांचलेली असतांना दुसऱ्यांना स्वच्छतेचे 'संदेश' देण्याचा मूर्खपणा आपण करीत आहोंत असेंच व्हायचें. अत्यंत आवश्यक असें, सामाजिक जीवनांतल्या आत्मशुद्धीचें प्रचंड कार्य आपल्या सुशिक्षित समाजापुढें पडलेलें असतांना त्याकडे दुर्लक्ष करून आपण इतरांना सुधारण्याचा चंग बांधला तर कांहींच साधणार नाहीं. आमच्या नव्या रूढी, नवी नीति आणि नवी समाजरचना (ह्यांचाही अर्थ अनिश्चित आहे हें आपण जाणतोंच) आधीं आपण यशस्वी करून दाखवूं या. समाजाच्या टिकावू हिताच्या दृष्टीनें हें सर्व कांहीं नवें आपण तपासून-पारखून आणि जरूर तिथें फेरबदल करून स्वीकारूं आणि त्याच्यापासून आपलें कल्याण होत आहे असा विश्वास आला म्हणजेच मग त्याची इतरांसाठीं शिफारस करूं. तोंपर्यंत आपलें साहित्य, तत्त्वज्ञान आणि समाजकारण म्हणजे केवळ मूठभर परभृत लोकांचे ध्येयहीन 'प्रयोग', एवढीच त्यांची किंमत !

वरील गोष्टी विचारांत घेतल्यानंतर सध्याच्या आपल्या साहित्याचा आमच्या सामाजिक जीवनाशीं खरोखर कितीसा संबंध आहे हें ध्यानांत येण्याला फारसा वेळ लागणार नाहीं. आमचें प्रचंड ललितवाङ्मय म्हणजे नुसतें ठराविक सांच्याचें स्वप्नरंजन किंवा त्याहीपेक्षां भ्रमांतलें बरळणें आहे असेंच दिसून येईल. अशाच अतुलनीय साहित्यावर आमच्या साहित्यिकांची सारी प्रतिष्ठा अवलंबून असल्यामुळें त्यांना, चित्रपटांच्या बेफाट जाहिरातीप्रमाणें आपली देखील जाहिरात करून जगण्याचा- निदान साहित्यप्रांतांत तरी-प्रसंग येत आहे. सुदैवानें महाराष्ट्राचा खरा आणि मोठा समाज ह्या कलकलाटापासून दूर- पूर्वापार चालत आलेल्या अज्ञानांत कां असेना-पण अधिक सुखी आहे, असेंच म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. त्याच्या जीवनामध्यें 'सुधारणेची' ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करण्याच्या अगोदर आपण स्वतःची सुधारणा करण्याचा प्रयत्न करूं या- आणि तोंपर्यंत समाजकार्याचा मोह आवरत नसेल तर त्यांच्या खऱ्या जीवनाची निदान तोंडओळख तरी आपण करून घेणें अवश्य नाहीं का?

केवळ पांढरपेशा वर्गालाच ह्या 'ठिणग्यां'चे चटके बसतील. पण याचें कारण आतां वाचकांना खात्रीनें कळलें असेल.

पुणें, ता. २१ एप्रिल १९४३ यशवन्त गणेश वझे

# प्रस्तुत लेखकाचीं पुस्तकें

१. **जीवन-स्वर**— कथासंग्रह किं. १। रु.

कलात्मक व उपहासात्मक कथांचा, वाचकांना नवी दृष्टि देणारा संग्रह.

२. **न बोलायच्या गोष्टी**— किं. १ रु.

साहित्य आणि कला यांच्या बरोबरच सामाजिक जीवनांतील 'अंदरकी बात' निर्भीडपणें वाचकांपुढें मांडणारें पहिलेंच व एकच पुस्तक. पहिली आवृत्ति संपत आली.

३. **स्त्री आणि सौंदर्य**— (सचित्र). किं. १॥ रु.

या विषयावर चालू असलेल्या बेजबाबदार प्रचाराला सडेतोड उत्तर देऊन स्त्रीसौंदर्याची शास्त्रशुद्ध व कलात्मक चिकित्सा करणारें मराठींतील पहिलेंच व एकमेव पुस्तक.

४. **ठिणग्या**— किं. १॥ रु.

५. **मुद्रणांतील रचनातंत्र**— सचित्र. (छापत आहे).

अगदीं सोप्या भाषेंत लिहिलेलें व मुद्रणव्यवसायांतील लोकांना अत्यंत उपयुक्त अशी तात्त्विक व व्यावहारिक माहिती देणारें, ह्या विषयावरचें पहिलेंच मराठी पुस्तक.

**आगामी**

● **स्फोट**—

सामाजिक जीवनांतील रहस्यांचा परिस्फोट करून सत्यस्थितीचें अचुक दर्शन घडविणारी नावीन्यपूर्ण कादंबरी.

दिवंगत वडिलांच्या
पवित्र स्मृतीस

# अनुक्रमणिका


| कथा | पृष्ठ |
|---|---|
| १ कुमारी गिरिजा ! | १ |
| २ बालहत्या | १० |
| ३ जोशीबुवांनीं सांगितलेली गोष्ट | २६ |
| ४ रीगलमधील री-टेक | ३४ |
| ५ ब्रह्म तेथें माया ! | ४३ |
| ६ सत्तेचाळिसावी मुलगी | ५४ |
| ७ वांचवा ! वांचवा ! | ७३ |

# ठिणग्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ६२१८...
संदर्भ शाखा

## कुमारी गिरिजा ! : : १

श्रीमती सरलाबाई सरदेशपांडे, मुख्याध्यापिका, महिला विद्यामंदिर, यांची ती विचित्र पण आग्रहाची विनंति ऐकून मी एका प्रकारें स्तिमितच झालों होतों. तसें म्हटलें तर त्यांचा माझा स्नेह कांहीं फार पुरातन किंवा दाटहि नव्हता. आपली सहज केव्हां तरी आमच्या सौभाग्यवतीनें त्यांची आणि माझी ओळख करून दिलेली. आणि खरें सांगायचें तर सरलाबाईंची ती नेहमींच गंभीर दिसणारी मुद्रा आणि त्यांच्या डोळ्यांतली ती अवास्तव करडेपणाची– तुसडेपणाची म्हणा हवी तर– झाक मला मुळींच आवडत नाहीं. शक्य तों त्यांना टाळण्याचाच मी प्रयत्न करीत असतों.

आणि म्हणूनच त्यांची असली विचित्र विनंति ऐकून मला आश्चर्य वाटलें. क्षणभर माझा गैरसमजच झाला त्यांच्याविषयीं ! ह्या बाईंना अशा उतार वयांत असल्या चौकशा काय करायच्या ? कीं पुनः त्या 'कांत टाकायला' लागल्या ? असलेहि भलभलते संशय माझ्या मनांत डोकावूं लागले.

त्यांची विनंति मला 'विचित्र' वाटण्याचें कारण असें कीं, मी कांहीं कुणी सामाजिक कार्यकर्ता नाहीं किंवा साहित्यिकहि नाहीं. माझी दृष्टी संशयी असली तरी प्रवृत्ती 'हुडक्या'ची नाहीं; आणि तसें

पाहिलें तर मला असल्या उठाठेवी करायला तशी सवडहि नसते.

ह्या भानगडींत पडायचें नाहीं असेंच मीं मनाशीं ठरवून टाकलें आणि अप्रत्यक्षपणें त्यांना तशी जाणीव देण्याचा प्रयत्नहि केला.

पण एक दिवस मी घरीं नसतांना, आमच्या सौभाग्यवतींना त्या भेटून गेल्या. त्यांनीं तिला काय काय सांगितलें कुणास ठाऊक ! 'तुम्हीं एवढं काम केलंत तर, एकाच कां, अनेक जिवांची अधोगति थांबविण्याचं सत्कार्य केल्यासारखं होईल' असा निर्वाणीचा निरोपहि त्यांनीं देऊन ठेविला होता. सौभाग्यवती देखील त्यांच्या कामाची वारंवार आठवण देऊं लागली आणि शेवटीं, त्रासूनच कां होईना, सरलाबाईंची विनंति मान्य करण्याचें मीं ठरविलें.

एकदां ठरलें, मग 'विलंब कां ? त्वरा करा' ह्या तत्त्वाप्रमाणें लागलीच मीं प्रवासाची तयारी केली. त्यांनीं दिलेला पत्ता नीट ध्यानांत ठेवून सकाळच्या मेलनें मी मुंबईला निघालों.

कुमारिकेची मुलाखत !

त्यांतून, लैंगिक विषयावर 'अधिकारी लेखणीनें' लिहिणाऱ्या 'कुमारी गिरिजा' यांची मुलाखत ! !

लैंगिक विषयावरील एकहि पुस्तक किंवा ग्रंथराज न वाचतां देखील आमच्या जीवनाची 'ती बाजू' परमेश्वराच्या कृपेनें आजपावेतों भानगडीशिवाय निर्वेधपणें चाललेली आहे. तसे 'सीरिअस् प्रॉब्लेम्स' उपस्थितच झाले नाहींत. पण कदाचित् ह्याच कारणामुळें त्या विषयाचें 'गांभीर्य' मला पटलें नसेल. आमचें आपलें एक ठीक आहे, म्हणून काय सगळ्यांचेंच तसें असावें असा कुठें नियम आहे ? मी म्हणतों, असेल; त्याहि प्रश्नाचें 'प्रचंड' महत्त्व असेल. आमच्यासारख्या कमनशिबी माणसांना नसेल त्याची महती पटत, इतकेंच. जसें 'प्रेमविषयक' प्रश्नांचें, तसेंच लैंगिक प्रश्नांचें ! प्रत्यक्ष समाजांत 'प्रेमाचे प्रॉब्लेम्स' जरी शेंकडा– नव्हे हजारांत– एक, ह्या प्रमाणांत आढळत नसले तरी देखील आमचें चालू वाङ्मय जसें

पंचाण्णव टक्के प्रेममयच आहे, त्याचप्रमाणें वाङ्मयापुरतें तरी लैंगिक प्रश्नांचें महत्त्व अमर्याद वाढलें तरी काय बिघडलें? तेव्हां उगीच आपल्या डोक्याला भलता त्रास कांहीं करून घ्यायचा नाहीं— फक्त 'कुमारी गिरिजा' यांची मुलाखत घ्यायची, इतकें ठरवून मीं तो विषय डोक्यांतून काढून टाकला.

सरलाबाईनीं दिलेल्या पत्त्यावर सुमारें बारा वाजतां मी जाऊन पोचलों. 'नवप्रकाश' व 'लिंगविचार' या दोन नियतकालिकांच्या कचेऱ्या तिथेंच असल्याची खात्री करून घेऊन मी धडधडत्या अंतःकरणानें त्या इमारतींत शिरलों.

'लिंगविचार कचेरी' असा फलक पाहून मीं कॉलबेल वाजवली.

'हुरेफूर' चित्रपटांत नायक शोभण्याजोगा अत्यंत खप्पड आणि पिंजारलेल्या केसांचा एक नवनवान बाहेर आला.

'कोण पाहिजे तुम्हांला?' त्यानें विचारलें.

'कुमारी गिरिजा यांना भेटायचंय्.' मीं चांचरत उत्तर दिलें.

'कशाला?' त्यानें थोड्याशा बेपर्वाईनें विचारलें.

'थोडं काम आहे त्यांच्याकडे.' सिगारेट पुढें करून जरा विनवणीच्या स्वरांत मीं त्याला सांगितलें.

'खाजगी?' खुशींत येऊन त्यानें विचारलें.

'हो! म्हटलं तर खाजगीच आहे.' मी म्हणालों.

'बरं, या आंत. थोड्या वेळांत येतील त्या.'

'किती वेळ लागेल?'

'चारपांच मिनिटांत. बसा ह्या खोलींत.'

त्यानें जरासें हंसतच उत्तर दिलें आणि तो निघून गेला.

त्यानें दाखविलेल्या खोलींत जाऊन मी अस्वस्थपणेंच एका कोपऱ्यांतल्या खुर्चीवर बसलों.

कुमारी गिरिजा यांचें एकहि पुस्तक मीं वाचलें नसलें तरी त्यांची 'लैंगिक विषयावरील अधिकारी लेखणी' मशहूर आहे. तरुण-

तरुणींचे हजारों लैंगिक प्रश्न सोडवून त्यांनीं महाराष्ट्रीय तरुण पिढी-वर अनंत उपकार करून ठेवले आहेत, ही गोष्ट लोकांच्याकडून मला माहीत झाली होती. अर्थात्., अशा अद्वितीय, समाजकार्यधुरीण महिलेची एका प्रकारच्या आदरानें आणि थोड्याशा भीतीनेंच मी मार्गप्रतीक्षा करूं लागलों.

त्यांना काय काय प्रश्न विचारायचे त्यांची यादी मीं अगोदरच करून ठेविली होती. ती यादी खिशांतून काढून मीं दोनतीन वेळां वाचून ठेवली. उत्तरें, उपदेश किंवा संदेश यांपैकीं जें कांहीं त्या देतील तें व्यवस्थितपणें लिहून घेतां यावें यासाठीं चांगले ग्लेज कागद मीं बरोबर आणलेच होते. फाउन्टनपेन पूर्ण भरलेलें म्हणून नेमकें त्याच वेळीं गोंधळ करील यासाठीं तें झाडून त्याच्या देखील कार्यक्षमतेची खात्री करून घेतली.

जवळजवळ पांच मिनिटें झालीं. माझी उत्कंठा वाढूं लागली.

पुनः प्रश्नांची यादी मीं डोळ्यांपुढें धरली—

आणि बाहेर पावलांचा नाजूक आवाज ऐकूं आला—

मी व्यवस्थितपणें सांवरून बसलों—

दरवाज्याचा पडदा सरकविण्यासाठीं एक हात पुढें आला—

मी उठून उभा राहिलों—

—आणि एक भयंकर प्राणी आंत आला.

'कोण पाहिजे तुम्हांला ?'

'कुमारी गिरिजा—'

त्या प्राण्यानें दरवाजा लावून घेतला. चमत्कारिक चालीनें, संथपणें तो टेबलाजवळच्या खुर्चीवर जाऊन बसला आणि थोड्याशा आच-रटपणानें, किंचित् मिस्किलपणानें हंसत म्हणाला—

'काय काम आहे ?'

'कुमारी गिरिजा यांना कांहीं विचारायचं आहे—'

'कशाविषयीं ?' त्यानें टेबलावर हनुवटी टेकीत विचारलें.

'आपलं...म्हणजे जनरल माहिती...केव्हां येणार आहेत त्या? मुद्दाम त्यासाठीं ×× पुराहून आलोंय् मी.'

'अस्सं होय!...पण त्याचं असं आहे—' तो प्राणी मोठ्या गंभीरपणें बोलूं लागला. 'मीच सांगेन काय माहिती हवी असेल ती.'

'पण त्यांचीच भेट घ्यायचीय् मला.' मी थोड्याशा निश्चयी स्वरांत म्हणालों.

मला उत्तर द्यायचें टाळून तो नुसताच पाहात राहिला माझ्याकडे.

आणि मला एकदम संशय आला—

भयंकरच संशय होता तो! पण—

टेबलावरच्या एका कागदावर तो कांहीं तरी लिहूं लागला.

'त्यांची भेट होईल कीं नाहीं मग?' मीं त्रासूनच विचारलें.

पुनः पूर्वीचेंच मिस्किल हास्य चहऱ्यावर ओढून तो म्हणाला—

'विचारून सांगतों हं!'

'मोठी मेहेरबानी होईल.' मी नम्रपणें म्हणालों.

आणि ती 'निसर्गाची अपकृति' खोलीबाहेर पडली.

तो बाहेर जातांच मी टेबलाकडे गेलों आणि तो लिहीत असलेला कागद उचलला.

'कुमारी गिरिजा.' कागदाच्या कोपऱ्यांत एवढेच दोन शब्द त्यानें लिहिले होते.

आणि माझा संशय एकदम बळावला.

ही सही मीं कुठें तरी पाहिली होती पूर्वी—

अगदीं हीच सही!

बरोबर! साहित्यशार्दूल फाल्गुन पेटकर यांना सप्रेम नजर केलेल्या एका कसल्याशा पुस्तकावर अगदीं हीच सही होती!

तो कागद मीं चटकन् खिशांत घातला.

अर्ध्याच मिनिटांत तो प्राणी पुनः खोलींत आला.

आतां मीं थोड्याशा बेपर्वाईनेंच विचारलें, 'काय, येताहेत का

गिरिजाबाई ?'

तो नुसता हंसला आणि खुर्चीवर जाऊन बसला.

मीं पुनः विचारलें, 'भेटतील का त्या ?'

'म्हणजे त्याचं असं आहे कीं...'

पटकन् त्याची मानगुटी पकडून आणि शक्य तो सर्व उग्रपणा स्वरांत आणून मीं त्याला विचारलें,

'म्हणजे तूंच ना कुमारी गिरिजा ?'

पण माझ्या ह्या अतिप्रसंगानें तो अगदीं घाबरून गेला.

'ह्यॅ ! ह्यॅ ! ह्यॅ !...' तो बोलण्याचा प्रयत्न करूं लागला.

त्याची ती अनुकंपनीय स्थिति पाहून माझी वीरश्री मात्र खलास झाली. मीच पुनः त्याची कॉलर वगैरे साफसूफ करून दिलगिरीच्या स्वरांत म्हणालों— 'मला फार वाईट वाटतं. पण हें पाहा, कुमारी गिरिजा यांच्या लेखनाविषयीं आदर आहे मला.'

ह्याचा परिणाम मात्र चांगला झाला.

कपाळावरचा घाम पुशीत तो म्हणाला, 'अहो, ह्या दिवसांत धंद्यासाठीं करावं लागतं असं.'

पण त्याच्याकडे तिरस्कारानें पाहात मीं तिथून पाय काढला.

* * * *

'काय हो, घेतलीत का मुलाखत ?' सरलाबाई गंभीरपणें मला विचारीत होत्या.

'हो तर ! फर्स्टक्लास मुलाखत घेऊन आलोंय् मी !' थोड्याशा विचित्र स्वरांत मीं त्यांना उत्तर दिलें.

'कशी आहे हो ती बाई ?' सौभाग्यवतीनें मध्यें तोंड घातलें.

'कौमार्यावस्थेंतच लैंगिक विषयाबद्दल इतकी सखोल माहिती मिळविलीय् तिनं कीं मला अगदीं आश्चर्यच वाटलं.' मीं त्याच स्वरांत उत्तर दिलें.

त्या दोघांही आर्यमहिलांना जरा चमत्कारिकच वाटलें. कारण,

माझ्या उत्तरांत अनेक प्रकारचे बरेवाईट अर्थ भरलेले होते, असा त्यांना संशय येणें स्वाभाविकच नव्हतें का ?

'दिसायला कशी काय आहे ती ?' सौभाग्यवतीनें पुनः प्रश्नांची सरबत्ती सुरू केली.

'लाखांत मिळायचं नाहीं असलं स्वरूप.' मीं खोट्याच गंभीरपणानें उत्तर दिलें.

'वय काय आहे तिचं ?' सरलाबाईनीं विचारलें.

'नक्की सांगणं कठीण आहे. वीस आणि चाळीस याच्या मध्यें कोणतंही असूं शकेल.' मीं उत्तर दिलें.

'अस्सं ! मुलाखत दाखवा कीं आम्हांला ?' सरलाबाईनीं मूळ मुद्द्याची आठवण करून दिली.

'कुमारी गिरिजा' यांची सही असलेला तो कोरा कागद चटदिशीं त्यांच्या हातीं देऊन मीं म्हटलें, 'ही घ्या मुलाखत.'

सरलाबाई माझ्याकडे आश्चर्यानें पाहूं लागल्या.

पण त्यांना फार वेळ संशयांत न ठेवतां, झालेला सर्व प्रकार त्यांना सांगून मी थोड्याशा चिडखोरपणें म्हणालों, 'छान पाठवलंत मला, त्या चतरशिंगीच्या कवडीवाल्याची मुलाखत घ्यायला.'

'एकूण असा प्रकार आहे काय ? मला वाटलंच !' सरलाबाई गंभीरपणा वाढवून म्हणाल्या.

'अगऽऽबाई !' इति सौभाग्यवती.

'काय हो ? पण तुम्ही कां पडलांत ह्या भानगडींत ?' मी सरलाबाईंना विचारलें. 'एकादं मासिक काढतां कीं काय ?'

'त्याचं असं झालं,' सरलाबाई बोलूं लागल्या, 'आमच्या शाळेंत तें गलिच्छ वाङ्मय चोरून शिरूं लागलं. मी जिला अगदीं निष्पाप, साधी भोळी अन् सरळ समजत होतें अशी एक मुलगी तें भिकारडं मासिक आपल्या पुस्तकांत लपवून वाचीत होती. मला वाटलं, कसलं तरी चांगलं पुस्तक, फार तर गोष्टींचं पुस्तक ती वाचीत असेल.

जास्तींत जास्त म्हणजे फडक्यांची नाहीं तर माडखोलकरांची एखादी अलिकडची भडक प्रणयकथा असेल, असं वाटलं मला. पण पाहातें तर काय !'

'अस्सं ! तुमच्या शाळेंत अं ? आतां कुठं जपाल ?' आमच्या सौभाग्यवतीनें चिंतायुक्त स्वरांत उद्‌गार काढले.

'अहो आम्हांला कळत नाहीं इतकंच !' सरलाबाई पुढें म्हणाल्या. 'त्या पोरीला हडसून खडसून विचारलं, तेव्हां तिनं आणखी किती तरी मुलींचीं नांवं सांगितलींन् ।'

'ह्यांना मिळतात कुठून असलीं पुस्तकं ?' मीं विचारलें.

'कुठून ? वाट्टेल तिथून ! मीं अधिक चौकशी केली तेव्हां असं समजलं कीं, कुणाचे आईबाप चोरून वाचतात, तर कुणाचे भाऊ, चुलतभाऊ, आतेभाऊ, एक ना दोन. कांहीं पोरी तर दरमहा सर्क्युलेटिंग लायब्रऱ्यांची वर्गणी भरताहेत यासाठीं. पुस्तक आणायचं दुसऱ्याच्या नांवावर एवढं मात्र करताहेत अजून. म्हणून म्हटलं, आतां कसं करायचं ? यासाठीं निदान ह्याचं मूळ तरी कुठं आहे तें शोधावं. खरंच, एकादी कुमारिका आपलं कुंवारपण संभाळूनदेखील इतके विविध अनुभव घेऊन जगापुढं मांडतेय् किंवा काय म्हटलं ! यासाठीं तुम्हांला त्रास दिला मीं.'

'महत्त्वाचाच प्रश्न आहे हा !' मीं म्हटलें.

सरलाबाई पुढें बोलूं लागल्या, 'एखाद्या अनुभवी डॉक्टरनं किंवा मानसशास्त्रज्ञानं खूप विचार करून, अभ्यास करून, खरोखरीचे प्रश्न हाताळणं ही वेगळी गोष्ट. पण ह्या माकडांच्या हातांत असलं कोलीत मिळालंय्, आतां जितकी आग लावतील तितकी थोडी.'

'ह्याला कांहीं उपाय आहे का हो ?' आमच्या सौभाग्यवतीनें मला विचारलें.

'आहे, एक उपाय आहे.' मीं म्हटलें.

'कसला ?'

'लिहिणारा, छापणारा, विकणारा किंवा प्रसार करणारा यांपैकीं प्रत्येकजण जन्मभर शंख करीत राहील असा दंड केला पाहिजे.'

'पण करायचं कुणीं हें ? तुमचा नवमतवाद, मतस्वातंत्र्य आड येतील त्याची वाट काय ?' सरलाबाई म्हणाल्या.

ह्याचें उत्तर जबाबदार साहित्यिकांनींच द्यावें.

---

('यशवंत' दिवाळी अंक १९४२, 'अनुभवाचें सांगणें तें हेंच' ह्या शीर्षकाखालीं प्रथम प्रसिद्ध झालेली.)

## बालहत्या : : २

कितीही भयंकर अनुभव असला तरी कालान्तरानें त्याच्या स्मृतीमधील तीव्रता कमी कमी होत जाते. पण तशाच प्रकारचा दुसरा एकादा प्रसंग पाहिला किंवा त्या पूर्वानुभवाशीं संबद्ध अशी एकादी व्यक्ति दृष्टीस पडली म्हणजे मात्र तो अनुभव बऱ्याच तीव्रतेनें आपल्या डोळ्यांपुढें स्मृतिरूपानें उभा राहतो.

* * * *

नागपूर एक्सप्रेस जेव्हां अकोला स्टेशनवर उभी राहिली तेव्हां डब्याच्या खिडकींतून डोकें बाहेर काढून चहावाल्याच्या शोधांत मीं प्लॅटफॉर्मवर दृष्टि फेकली.

आमच्या डब्याला जोडूनच असलेल्या दुसऱ्या डब्यांत तिसऱ्या वर्गाचें स्त्रियांचें कंपार्टमेंट होतें. चहावाला त्याच ठिकाणीं गुंतला होता. तो आमच्या बाजूला येण्याची वाट मी पाहात होतों इतक्यांत एक आधुनिक पद्धतीची पोलादी ट्रंक व एक होल्ड-ऑल डोक्यावर चढवलेला हमाल आणि त्याच्या मागोमाग एक तरुण बाई स्त्रियांच्या डब्यापाशीं येऊन दाखल झालीं. गाडीला कांहीं विशेष गर्दी नव्हती आणि म्हणून ती बाई सावकाशपणेंच डब्यांत शिरली व आपल्या हातांतली लोंकरीची शाल आंत ठेवून पुनः बाहेर आली. हमालानें

तिचें सामान डब्यांत ठेवून दिलें आणि हमाली चुकती झाल्यावर तो निघून गेला.

'गर ऽ ऽ म चाय' पुकारीत चहावाला आमच्या डब्यापाशीं आला.

चहा पितांना पुनः माझें लक्ष त्या बाईकडे गेलें—

दुसऱ्याच क्षणीं मीं तिला ओळखलें. पण—

पण— मी आतां जी हकिगत सांगणार आहें ती घडली नसती तर आपण होऊन तिला भेटून मीं तिची विचारपूस केली असती. ती देखील कदाचित् 'झनाना-डब्यांत' न बसतां मी ओळखीचा भेटल्याकारणानें आमच्याच डब्यांत येऊन बसली असती.— पण आतां नुसती ओळख दाखवावी असें सुद्धां माझ्या मनांत येईना.

थंडीचे दिवस असल्यामुळें, गाडी सुटेपर्यंत सकाळच्या कोवळ्या उन्हाचा आस्वाद ती डब्याशेजारीं उभी राहून घेत होती— आणि तिच्या ध्यानांत येणार नाहीं अशा रीतीनें मी तिचें बारकाईनें निरीक्षण करीत होतों.

तिच्या स्वरूपामध्यें भयंकर वाटण्याजोगा फरक पडला होता.

सौन्दर्य-प्रसाधनांच्या सढळ योजनेनें देखील तिच्या तोंडावरचे देवींचे असंख्य वण तिला लपवितां येत नव्हते.

तिनें सहजच मान फिरविली;— तिचा डावा डोळा अनैसर्गिकपणें चमकला— आणि लगेच मला कळून चुकलें कीं तो खोटा, कांचेचा डोळा होता. एका वेळचें तिचें वैभव— काळेभोर— लांबसडक विपुलसे केस— त्यांची जागा आतांच पिकूं लागलेल्या विरळ केसांनीं आणि जनावरांना देखील विचित्र दिसणाऱ्या तुटक्या शेपटाप्रमाणें वीतभर लांबीच्या शेपट्यानें घेतली होती.

तिच्यामधील बांधेसूदपणाची आकर्षकता ही आतां फक्त दुरून पाहण्याची चीज राहिली होती.

तिच्यामध्यें झालेल्या स्थित्यंतरानें माझ्या अंगावर शहारेच आले.

कारण —

पण आतां पूर्वीची हकिगतच सांगितलेली बरी—

संजयासारख्या अगदीं सामान्य परिस्थितींतल्या पण बुद्धिमान विद्यार्थ्याशीं ललितेसारख्या स्वरूपसुंदर आणि थोड्याफार सुस्थितींतल्या त्याच्याच वर्गभगिनीनें विवाह केला– तो सुद्धां बी.ए.ची परीक्षा दोन महिन्यांवर आलेली असतांना– तेव्हां पुष्कळांनाच आश्चर्य वाटलें. त्यांच्या कॉलेजांतले दोन अविवाहित तरुण प्रोफेसर, एक डँडी-फेलो आणि तीन टग्गे डेमॉन्स्ट्रेटर्स ललितेवर दृष्टी ठेवून होते– असा 'रिपोर्ट' होता. पण त्या साऱ्यांना डावलून, त्यांच्यातर्फें ओळखीचा फायदा घेऊन 'मध्यस्थी' करूं पाहणाऱ्या हितचिंतकांना चकवून ललितेनें अखेरीस एका सुप्रभातीं संजयालाच माळ घातली. दोघांच्याही वडील माणसांनीं यत्किंचितही विरोध केला नाहीं ही आश्चर्य वाटण्याजोगीच गोष्ट असली तरी त्यांच्या प्रेमांत त्यामुळें 'रोमान्स' कांहीं निर्माण झाला नाहीं हें देखील खरें.

दोघेंही बी.ए. पास झालीं आणि दोघांनींही शिक्षक-व्यवसाय पत्करला. संजय एका मोठ्या हायस्कुलांत चिकटला आणि ललितेची एका गर्लस् हायस्कुलांत वरणी लागली. जूनच्या पहिल्या तारखेला त्यांनीं बिऱ्हाड थाटलें.

दोघांच्या मासिक पगाराची बेरीज नव्वद रुपयांच्यावर नव्हती.

उण्यापुऱ्या चाळीस रुपयांच्या प्रचंड प्राप्तींतहि चार पोरांबाळांचा संसार काटकसरीनें हांकतांना आपल्या जीवनाचा 'सामाजिक प्रश्न' न होऊं देणारीं असंख्य कुटुंबें त्या शहरांत होतीं– आणि आहेतहि– ह्या गोष्टीची जाणीव संजय-ललितेला नव्हती असें नाहीं. परंतु 'कसं करीत असतील कुणाला ठाऊक' अशा वरवरच्या आणि किंचित् तिरस्कारपूर्ण उद्‌गारांखेरीज त्याविषयीं अधिक विचार करण्याची वेळ आतांपर्यंत त्यांच्यावर आलीच नव्हती.

पण, ललितेच्या कमाईपैकीं निम्याइतकी रकम तिच्या 'अप्‌कीप'-

साठीं खर्च होऊं लागली. 'आकस्मिक' बाबी राहिलेल्या तिच्या पगारापैकीं अर्धाअधिक भाग दर महिना नियमितपणें गिळून टाकूं लागल्या. फारतर पांचदहा रुपये ती दोघांच्या संयुक्त संसारासाठीं देऊं शकत होती—

आणि संजयाला दरमहा जागाभाडें वीस रुपये, (-स्वतंत्र फ्लॅट-बाथरूम-संडासासह असणें त्यांच्या दोघांच्याहि जीवनविषयक कल्पनेला अवश्यच होता-) व गडी आणि स्वयंपाकीण यांचा एकत्रित पगार वीस रुपये न चुकतां द्यावेच लागत. इतर खर्चाचे तपशील—वाणी, दूधवाला, कोळसेवाला, धोबी वगैरे. पहिल्याच पगाराची व्यवस्था करतांना त्याला आपल्या तोट्याच्या अंदाजपत्रकाची चांगलीच कल्पना आली आणि पैशाचें रिकामें पाकीट उलटें धरून झाडतांना त्याच्या तोंडून उद्‌गार निघाले, 'हरेऽऽराम.'

लौकरच उधारीवाल्यांचे तगादे सुरू झाले, आणि 'संसार' म्हणजे काय ह्या गोष्टीची त्यांना जाणीव होऊं लागली. ललितेनें माहेरून पैसे मागणें संजयाला, आणि ललितेला देखील, अपमानास्पद वाटे आणि काटकसरीनें वागण्याचा दोघेंही दररोज निश्चय करीत. ललितेला 'फुलासारखी सुखांत' ठेवण्यासाठीं संजय स्वतःच्या गरजा कमी करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता; पण दाढी करण्याचें एक ब्लेड वीस दाढ्यांना वापरून कितीशी बचत होणार? तगादे-वाल्यांची कटकट ललितेपर्यंत जाऊं नये म्हणून तो त्यांना परस्पर वाटेला लावण्याचा प्रयत्न करी; त्यांत त्याला महिना दोन महिने थोडेंफार यशही आलें. पण— दूधवाला—?

'आतां न्हाइ थांबायला सवड.' त्यानें एक दिवस स्वर चढविला.

'अरे पण महिनाअखेरीला कुठून देऊं पैसे? पगार होऊंदे कीं!' संजय हंसत म्हणाला.

'अवो हसतांव काय? दुध घ्याया लागल्यापासनं दोन पगार झाले असत्याल.'

इतक्यांत ललिता दुधासाठीं भांडें घेऊन आली. 'काय रे ! काय कटकट लावलीय् ?'

'कटकट कसली बाइसाब ? ह्यो तिसरा म्हैना...'

'काय ? तिसरा महिना ?... ऑऽऽ' जसें कांहीं आपल्याला कल्पनाच नव्हती अशा स्वरांत तिनें विचारलें.

'मग काय म्हन्तो मी !'

'बरं बरं ! चार दिवस थांब हं. दोन तारखेला घेऊन जा पैसे...'

'अवो पर तंवर काय करूं मी ?' त्यानें जरा नर्माइनेंच विचारलें.

'हें पाहा, आज कांहीं पैसे नाहींत आमच्याकडे. जरा कळ सोस कीं !' इति संजय.

'पर चार दोन रुपये द्या की !'

संजयानें पैशाचें पाकीट काढलें आणि त्यांतून दोन सिनेमाचीं तिकिटें आणि एक अधेली काढून म्हणाला, 'हें बघ. हीं सिनेमाचीं दोन तिकिटं आणि ही अधेली...काय देऊं तुला ?'

'ढोरांच्या म्होरं काय कागदाच कपटं टाकूं आतां ?' दूधवाला चिडून बोलला आणि कपाळाला हात लावून निघाला. पण चार पायऱ्या उतरल्यानंतर तो पुनः वर आला आणि म्हणाला, 'ह्या पगाराला समद चुकत द्या...कसं करावं आमीं ?'

हा एक नमुना झाला. इतरांनीं भाषा कमीजास्त फरकानें वापरली असेल एवढेंच. असला अप्रिय प्रवेश संपला कीं दोघेंही खिन्नपणें पांच मिनिटें स्वस्थ बसत, आणि पुनः...कांऽऽहीं नाहीं !

खरें म्हणजे मिया-बिबीचा संसार होता त्यांचा. पण जाग्याचा प्रश्न सोडला तरी केवळ भपक्यासाठीं, एक गडी आणि स्वयंपाकीण पगार देऊन वर तीं पोशीत होतीं. आणि अशा वृत्तीचीं माणसें एक वेळ उपाशीं राहतील पण देखावा मात्र कमी करणार नाहींत. अर्थात्, लवकरच दोघांनींही जादा हमाली – शिकवण्या– केवळ 'मागत नाहीं' अशा सबबीखालीं पत्करल्या, आणि आपल्या पाठी-

मागें अधिक उपाधी लावून घेतल्या.

पण– एक दिवस ललितेला संशय आला—

दोघांचीही इच्छा नव्हती. त्यासाठीं त्यांनीं जरूर ती दक्षता घेण्याचा प्रयत्न चालविला होता–, तरी पण 'तसंच असणार' असा भयंकर संशय ललितेला आला.

त्या दिवशीं नवराबायकोची भेट होतांक्षणींच तिनें संजयाला फर्माविलें—

'तरी मला वाटलंच होतं असा गोंधळ करणार तुम्ही म्हणून ! आजच्या आज भेटा डॉक्टरना.'

'अग पण झालंय काय असं.'

'कपाळ तुमचं ! वर लाज नाहीं वाटत विचारायला, काय झालं म्हणून ?'

'तरी पण...म्हणजे ? अॅऽऽअॅ ??'

'चूप बसा आतां ! दोघांचं भागतांना जीव नकोसा होतोय् आणि...'

'बरं, बरं ! अग, पण इतकं घाबरायला नि रागवायला काय झालं असं त्यांत ?'

'जा म्हणतें ना डॉक्टरांच्याकडे ! मला इतक्यांत नको आहे असं कांहीं व्हायला.'

आपल्या देहाचें प्रश्नचिन्ह करून संजय खुर्चीवर बसला. कांहीं वेळानें तो शान्तपणें म्हणाला, 'मग रजा घे कीं थोडे दिवस ! आईला बोलावूं का ?'

'माझं ऐकायचं आहे कीं नाहीं ?' ललितेनें रागानेंच विचारलें.

आणि गोगलगाय बनून संजय डॉक्टरांच्याकडे गेला.

चोविशीच्या घरांत आलेल्या बाईला मूल झालें नाहीं तर तिला 'हतभागी' समजणाऱ्यांची संख्या आपल्या समाजांत कांहीं लहान नाहीं. पण आपल्या स्वातंत्र्यावर, चैनीच्या बेजबाबदार आयुष्य-

क्रमावर संक्रांत येईल ह्या भीतीमुळें गर्भपात करायला सिद्ध होणाऱ्या (वास्तविक गुन्हेगार वृत्तीच्या) सुशिक्षित विवाहित स्त्रियांची संख्या अजमावण्याचा जर आपण प्रयत्न केला तर ही प्रवृत्ती किती झपाट्यानें वाढत आहे याची कल्पना येईल.

पुढें कांहीं दिवस दोघेंही डॉक्टरांच्याकडे फेऱ्या घालीत होतीं— पण 'तसं व्हायला नको' यासाठीं करण्यांत आलेल्या 'सुरक्षित' उपायांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. तेव्हां जालीम उपायाचा विचार तीं करूं लागलीं. त्यासाठीं त्यांनीं तसलेच उद्योग करण्यांत निष्णात ठरलेल्या एका नामांकित डॉक्टरकडे जाण्याचें ठरविलें— पण असल्याच प्रयत्नांत मृत्युमुखीं पडलेल्या एका सुशिक्षित महिलेची गोष्ट कर्णोपकर्णीं त्यांना तेवढ्यांतच कळल्याकारणानें दोघांनींही कच खाल्ली—

आणि त्यांच्या विवाहाच्या पहिल्या वाढदिवशींच 'विजय'चा जन्म झाला.

मुलाचें नांव ठेवतांना जर त्यांनीं प्रामाणिकपणा दाखविला असता तर त्यांनीं त्याचें नांव वास्तविक 'अजय', 'उत्पात'... वगैरेसारखेंच कांहींतरी ठेवलें असतें—

पण आईवडिलांच्या इच्छेची पर्वा न करतां मुलगा जन्माला आलाच– आणि सर्वांच्याकडून ललिता-संजयांनीं मुलाचें आणि आपलें स्वतःचें भरपूर कौतुक करून घेतलें.

प्रसूतिगृहांतून ललिता माहेरीं राहायला गेली आणि संजयानें आपल्या संसाराची आर्थिक बाजू सावरण्यांत सारें लक्ष घातलें. त्यानें स्वयंपाकीण आणि गडी यांना रजा दिली आणि तो फ्लॅटही सोडला. लहानशी खोली घेऊन तो तीनचार महिने राहिला.

जूनच्या आरंभीं त्यानें आमच्या शेजारच्या एका बंगलेवजा इमारतींत पुनः जागा घेतली आणि बिऱ्हाड थाटण्याची तयारी केली.

आणि एक दिवस, चार महिन्यांच्या 'विजय'ला घेऊन ललिता त्या जागेंत दाखल झाली.

मागच्या अनुभवानें शाहाणा होऊनच कीं काय कुणाला माहीत— संजयानें चाळिशी उलटलेली एक स्वयंपाकीण आणि वरकामाला 'कोरडी' मोलकरीण ठेवून दिली. ललितेला पुनः त्याच शाळेंत नोकरी मिळाली आणि तिच्या गैरहजिरींत स्वयंपाकाची बाईच मुलाला सांभाळूं लागली.

विजय नाकींडोळीं चांगला होता पण जन्मतःच अशक्त. त्याला औषधोपचार करीत राहणें हा एक नवा कार्यक्रम संजयाला पत्करावा लागला आणि कुणींसें म्हटल्याप्रमाणें त्याच्या जीवनाचा 'तराणा' व्हायला आरंभ झाला.

नवराबायकोंचा जीवनक्रम पुनः पूर्ववत् चालू झाला. दुपारीं शाळेंत, संध्याकाळीं फिरायला जाणें, अधून मधून सिनेमा— आणि सारें कांहीं.

आणि एक दिवस बी.टी.च्या टर्म्स भरण्याचें, मुंबईच्या कॉलेजचें प्रवेशपत्र घेऊन ललिता घरीं आली.

त्या रात्रीं उभयतांच्या विवाहित आयुष्यांतली पहिली मोठी लढाई झाली—

'विजय अजून अगदीं लहान आहे.' संजय म्हणत होता.

'मी त्याची आई आहें म्हटलं.' ललिता त्याचा विरोध मुळांतच मोडून काढायचा प्रयत्न करीत होती.

'पण त्याला सांभाळायचं कोणीं? तूं त्याची आई आहेस म्हणूनच तुला त्या गोष्टीचा नीट विचार करायला पाहिजे.'

'मग मीं पूर्ण विचार केला आहे एवढं सांगून ठेवतें. उगाच डोक्याला त्रास करून घेऊं नका— अन् मलाही त्रास देऊं नका.' ललितेनें निश्चयानें सांगितलें.

'काय विचार केला आहेस तूं? माहेरीं नेऊन ठेवणार आहेस

त्याला ?'

'तो कां म्हणून ? तुम्हीं काय बांगड्या भरल्या आहेत ?... वेळींच जपून वागलां असतां तर असं बोलायची पाळीच आली नसती माझ्यावर.'

'म्हणजे काय ? मी त्याला सांभाळीत बसूं ? मग शाळेंतली हमाली काय तूं करणार आहेस माझ्यासाठीं ? कीं वर्षाच्या खर्चाची रक्कम ठेवली आहेस तयार करून ? म्हणे– बांगड्या भरल्या आहेत...' तो देखील संतापूं लागला.

'कांहीं नको नोकरी सोडायला. स्वयंपाकीण बाईनीं इथेंच राहून त्याला संभाळायचं कबूल केलं आहे. महिन्याला वीस रुपये अधिक द्यायचे त्यांना.'

'अग, पण जरा विचार कर. त्याला चार महिनेसुद्धां पुरते झाले नाहींत अजून. मनाची नसली तरी जनाची...'

'बस्स झालं बोलणं. मला नको तुम्हीं शिकवायला. मला काय गुलाम समजतां कीं मोलकरीण ? मी त्याची आई तसे तुम्ही त्याचे वडील आहांत ना ? जशी कांहीं तुमच्यावर मुळींच जबाबदारी नाहीं त्याची !'

'मीं त्याचा बाप होण्याचा गाढवपणा केलाय् म्हणूनच सांगतों कीं दुसऱ्याकडे ठेवण्याइतका तो मोठा होईपर्यंत बी.टी. फिटी कांहीं नाहीं. माझी मुळींच संमति मिळणार नाहीं.'

'तुमची संमति मीं विचारलेली नाहीं. अधिकाराची भाषा बोलूं नका. माझ्याकडे चालायचं नाहीं असलं कांहीं.' तिनें तणतणत त्याला सांगितलें.

'तुझा मुंबईचा खर्च ?' त्यानें विचारलें.

'मी तुम्हांला नाहीं तो करायला लावीत. माझी मींच व्यवस्था केलीय्. माझ्या आईनें दिलेत मला पैसे.'

'अहाऽऽ रे स्वाभिमान.' त्याच्या स्वरांतला तिरस्कार स्पष्ट

दिसत होता.

'लग्न व्हायच्या आधीं तुम्हींच पोसलीत मला जशी कांहीं. लाज नाहीं वाटत वर तोंड करून बोलायला... तरी बरं, अजून पन्नासांच्यावर एक दमडी मिळत नाहीं म्हणून...'

कोट टोपी चढवून तो बाहेर पडला.

—आणि तासाभरानें परत घरीं आला.

त्याचा पराजय झाला होता. पण त्याला 'व्यवहार' आठवला आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो तिला स्टेशनवर पोचवायला गेला.

आणि त्या दिवसापासून विजयाच्या हालांना प्रारंभ झाला.

अवघ्या चार महिन्यांचा विजय—

आई 'बी.टी.' व्हायला मुंबईला गेलेली—

अंगावरचें दूध त्याला मिळेना—

वरचें पचेना—

भाडोत्री स्वयंपाकिणी, मोलकरणी, दाया मिळतील; पण आईची माया थोडीच मिळणार आहे !

'तसं व्हायला नको' यासाठीं जें कांहीं करण्यांत आलें होतें त्याचा परिणाम विजय जन्मापासून भोगीतच होता. आणि आतां—

एका आठवड्यानें ललिता परत आली तेव्हां संजय म्हणाला— 'अवघ्या सात-आठ दिवसांत किती खराब झाला बघ.'

बिचारा विजय आशाळभूतपणें तिच्याकडे पाहूं लागला—

पण तिनें त्याला फक्त उचलून घेतला—त्याचा पापा घेतला, आणि—

'नको उगीच. दोन दिवस झालं तरी पुन्हा त्रासच होईल त्याला, अन् मला दिखील.' न पाजतांच तिनें त्याला खालीं ठेवून दिला.

विजय दीनवाणेपणानें रडूं लागला.

संजय तिथून निघून गेला.

पण पुनः संध्याकाळीं शहरांतल्या मुख्य रस्त्यानें फिरून, मुद्दाम

चार मित्रमंडळींच्या भेटी घेऊन आपल्या 'सुखी संसारा'चें नाटक करायला तीं चुकलीं नाहींत !

दोन दिवसांनीं पुनः ललिता मुंबईला निघून गेली.

* * * *

विजयची प्रकृति अधिकाधिक बिघडूं लागली.

डॉक्टरनीं पहिल्या प्रथम संजयाची सौम्य शब्दांत हजिरी घेतली— आणि मग 'इलाजच नाहीं' हें ओळखून अनेक औषधांची योजना करून त्या निरपराधी दुर्दैवी बालकाचें आयुष्य संपुष्टांत न येण्याची खटपट त्यांनीं चालविली.

स्वयंपाकीणबाई भाडोत्री असल्या तरी त्यांना हृदय होतें. आपल्या परीनें त्यांनीं विजयला सांभाळण्याचें काम जिवापासून चालविलें होतें. त्यांनीं जरी प्रथम पैशाच्या लोभानें तें काम पत्करलें तरी पुढें विजयची कींव येऊं लागली त्यांना. एकादे वेळीं विजय जेव्हां दीनपणें कळवळून रडूं लागे तेव्हां उद्वेगानेंच त्या म्हणत— 'आई असून मूल पोरकं झालं कीं काय करायचं ?... शिक्षण झालं म्हणून काय पोराच्या जिवाकडे नको बघायला ?'

—आणि दर पंधरवड्याला ललिता येई आणि दोन दिवस हरएक गोष्टींचें नाटक करून परत जाई.

एक दिवस विजयची प्रकृती फारच बिघडली– आणि शेजारी या नात्यानें माझी पत्नी आणि मी त्याला पाहायला गेलों.

'अयाई ऽ काय दशा झाली आहे ह्याची !' असे उद्गार त्या दुर्दैवी अर्भकाची स्थिती पाहून तिच्या तोंडून बाहेर पडले. तिनें त्याला उचलून घेतला. तो क्षणभर फसला; पण– नव्या संवयी-प्रमाणें, तिच्या खांद्यावर असहायपणें मान टाकून आणि आपल्या चिमुकल्या बोटांनीं तिचा पदर घट्ट धरून अगदीं दीनवाणेपणानें तो रडूं लागला.

स्वयंपाकीणबाई हा प्रकार शांतपणें पाहात होत्या. त्यांच्या

६३६

डोळ्यांना पाणी आलें—

'ह्याला अशा स्थितींत सोडून त्यांना दूर राहवतं तरी कसं ?' मीं त्यांना विचारलें.

'जन्माला आला यासाठींच जर आई चिडलेली त्याच्यावर... तर...' पण त्या पुढें बोलल्या नाहींत.

'तुम्हीं त्यांना जरा वडीलपणानीं सांगा समजावून...' माझी पत्नी म्हणाली.

'त्याचा उपयोग व्हायचा नाहीं. मला जावं लागेल आणि मग ह्याचं काय होईल कुणाला ठाऊक ?'

जन्म देणारी सुशिक्षित आई, आणि, ज्यांना मी भाडोत्री समजत होतों, त्या अशिक्षित स्वयंपाकीणबाई !

पण माणुसकीचा प्रश्न आहे हा !

—आणि माणुसकी शिक्षणावर अवलंबून असते असें म्हणणें धाडसाचेंच होईल.

नाहीं तर, ललितेच्या ह्या अमानुषवृत्तीचा तिच्या सुशिक्षितपणाशीं कसा मेळ घालायचा ?

त्या दिवशीं ह्या प्रश्नावर मीं खूपखूप विचार केला—

मनुष्य आपत्तींनीं आणि दारिद्र्यानें गांजला म्हणजे तो वाटेल तें करायला उद्युक्त होतो असें म्हणतात.

पण बेसुमार स्वार्थ देखील— मग तो कोणत्याही प्रकारचा कां असेना— माणसाला माणुसकी विसरायला लावीत असला पाहिजे.

आवश्यक गरजांची मर्यादारेषा, अगदीं निश्चितपणें नाहीं तरी बऱ्याचशा प्रमाणांत, आपल्याला ठरवितां येईल— पण सुखवासनेला आणि चैनीच्या जीवनविषयक कल्पनेला कशी आणि कुठें मर्यादा घालणार ?

हिंदुस्थानांतल्या दुय्यम महत्त्वाच्या कोणत्याही शहरांत दोन जिवांचा संसार, केवळ एक नवा भागीदार— पोटचा लहान मुलगा—

जन्माला आला म्हणून, महिना नव्वद रुपयांच्या प्राप्तींत 'असह्य' व्हावा हें सामान्य लोकांना पटण्यासारखें नाहीं– आणि तसा जर तो होत असला, तर त्या 'जीवन'विषयक कल्पनेचें बारकाईनें पृथक्करण केलें पाहिजे.

ही वृत्ति आपणांला कोठवर नेणार हा देखील विचार करण्या-सारखाच प्रश्न आहे.

सर्व बाजूंनीं विचार केल्यानंतर एकच गोष्ट वारंवार मला दिसून येऊं लागली. ती म्हणजे—

स्वातंत्र्य– (कीं स्वैर वागण्याची प्रवृत्ति ?)

फुलपांखराच्या स्वच्छंदीपणाची भयंकर ओढ—

सांसारिक जबाबदारींचा तिटकारा—

हेंच ललितेच्या वृत्तींचें सार होतें.

शिक्षकिणीचा सुटसुटीत पेशाच अशा वृत्तीला अनुकूल होता– आणि म्हणूनच ती पोटच्या गोळ्याची अशी आबाळ करायला उद्युक्त झाली होती.

*   *   *   *

रात्रीचा साडेनवांचा सुमार—

संजय घाईघाईनें मला हांका मारीत होता.

मी लागलाच खालीं गेलों.

'चटकन डॉक्टरना घेऊन या...' तो अडखळतच बोलला.

'विजय...?' मीं विचारलें.

'हं...' आणि तो निघून गेला.

थोड्याच वेळांत मी डॉक्टरांच्यासह त्यांच्या बिऱ्हाडीं पोचलों.

स्वयंपाकीणबाईंनीं विजयला मांडीवर घेतला होता.

डॉक्टरनीं एकवार विजयकडे पाहिलें– त्याचा क्षीण हात आपल्या हातांत घेऊन पाहिला त्यांनीं.

—आणि कांहींच न बोलतां ते निघून गेले.

स्वयंपाकीणबाई मुकाट्यानें अश्रु ढाळीत होत्या—

आणि विजयची आई ?—

ती कल्पनाच मला असह्य झाली. मी चटकन् खोलीबाहेर गेलों.

'तिला तार करायला हवी.' संजय अस्पष्टपणें मला सांगत होता.

'कांहीं नको ! उद्यां कार्ड टाका.' मी तिरस्कारानें म्हणालों—

* * * *

म्युनिसिपालिटींत अंत्यविधीचा पास काढण्यासाठीं मलाच जावें लागलें.

पण 'मृत्यूचें कारण' सांगतांना माझ्या छातींत धडधडूं लागलें. मी सपशेल खोटेंच बोलत नव्हतों का ?

'अशक्तपणा आणि रिकेट्स्.' मी अडखळत बोललों. पण माझें मन मला ओरडून सांगत होतें, 'हा खून आहे, खून– !! एका सुशिक्षित माथेफिरू त्राटिकेनें निर्दयपणें केलेली ही बालहत्या आहे !'

तो पास घेतांना माझा हात कांपत होता.

* * * *

विजयचें कलेवर दोन्ही हातांवर घेऊन मी स्मशानभूमीकडे चाललों होतों. माझ्या पाठीमागून संजय जड पावलांनीं येत होता. त्याच्या मागें त्याचे दोन स्नेही कांहीं तरी बोलत चालले होते.

—वाटेंत माझ्या डोळ्यांपुढें अनेक भेसूर कल्पनाचित्रें थैमान घालीत होतीं.

स्मशानांत पोंचल्यावर कुणींसें विचारलें, 'खड्डा कीं गोवऱ्या ?'

'गोवऱ्याच !' संजय कांहीं बोलायच्या आधींच मीं तड्कन् उत्तर दिलें. कारण, जन्माला आल्यापासून त्याची अमानुषपणें आबाळ झालेलीच होती– आतां मेल्यानंतर तरी त्याला कुणीं पायांखालीं तुडवायला नको, असें मला वाटलें.

अग्निनारायणाच्या स्वाधीन होण्यापूर्वीं विजयचा देह जमिनीवर विश्रांति घेत पडला होता– आणि शून्य दृष्टीनें संजय त्याच्याकडे

पाहात उभा होता.

क्षणभर मला त्याच्याविषयीं सहानुभूति वाटली. पण तिरस्काराच्या उग्र भावनेनें क्षणार्धांत सहानुभूतीला हांकून लावलें. कारण—

अब्रूला भिऊन आणि दौर्बल्यापुढें मान तुकवून तो बालहत्येच्या ह्या भयंकर पापांत सहभागी झाला नव्हता का ?

त्या निष्पाप अर्भकाचा तो जीर्ण देह चितेवर ठेवतांना चैनीच्या आणि स्वैरपणाच्या मागें धांवणाऱ्या आमच्या सुशिक्षित समाजाची माणुसकीच मी चितेवर ठेवीत आहें अशी भयंकर कल्पना माझ्या डोक्यांत चमकून गेली.

* * * *

वधस्थान असंख्य लोकांनीं गच्च भरून गेलें होतें.

प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सूडाची भावना भेसूरपणें नाचत होती.

शिरच्छेदाचें विक्राळ पोलादी पातें वर तळपलें- आणि—

खच्च !

आसुरी आनंदाच्या भयंकर आरोळ्यांनीं वधस्थान दुमदुमून गेलें. इतक्यांत—

हातपाय बांधलेली एक स्त्री दूतांनीं ओढीत आणली—

'लांव आली लांव ! हो ऽ हो ! !' प्रेक्षकांतून कल्लोळ उसळला.

एक चिमुकलें बालक पटापट वधस्तंभाच्या वरच्या आडव्या तुळईवर जाऊन विक्राळपणें हंसत उभें राहिलें—

विजयच होता तो !

—आणि शिरच्छेदासाठीं आणलेली ती 'लांव' ललिताच होती—

दूतांनीं तिला पुढें ओढली—

एक दुबळा पुरुष तिच्यामागें जाऊं लागला- तो संजय होता- पण दूतांनीं त्याला लाथा मारून मागें फेकला.

रक्तानें माखलेलें तें भयंकर पोलादी पातें वर जाऊं लागलें—

वरच्या तुळईवर विजय टाळया वाजवीत नाचूं लागला—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ६३६६९ वि: निबंध
क्रमांक १६०२ नों: दि: २९-२६-

ललितेचें डोकें एका विक्राळ पुरुषानें वधस्तंभाखालीं लाकडाच्या ओंडक्यावर दाबून धरलें—

तें पातें खालीं कोसळणार– इतक्यांत—

'थांबा !' एका अधिकारी पुरुषानें हुकूम सोडला.

सारे प्रेक्षक चिडून त्याच्याकडे पाहूं लागले—

'ही शिक्षा पुरेशी नाहीं होणार !' तो अधिकारी गर्जून म्हणाला. 'मनस्ताप आणि समाजाचा तिरस्कार सहन करीतच हिला जिवंत ठेवली पाहिजे. सोडा तिला.'

दूतांनीं तिला त्या पुरुषापुढें उभी केली—

त्यानें आपल्या हातांतील आसुडाचा एक तडाखा फाड्दिशीं तिच्या पाठीवर लगावला—

—आणि मी जागा झालों.

* * * *

जाग्रतावस्थेंत मनावर झालेले आघात स्वप्नसृष्टींमध्यें विचित्र दृश्यांच्या रूपानें आपल्यापुढें तांडव करतात या दृष्टीनें, 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' हें खरें असलें तरी अशा स्वप्नांतूनच भावी घटनांच्या अस्पष्ट सूचना देखील आपल्याला कांहीं वेळां मिळत असतात.

तीन वर्षांनंतर अकोला स्टेशनवर आकस्मिक रीतीनें माझ्या दृष्टीला पडलेलें तें दृश्य— ललितेचा तो भयंकर अवतार—अशा-पैकींच एक स्वप्नप्रत्यय नव्हता का ?

---

## जोशीबुवांनीं सांगितलेली गोष्ट : : ३

'जोशीबुवांनीं सांगितलेली गोष्ट' हें शीर्षक वाचून कुणी विचारील—'हे जोशीबुवा कोण ?'

पण कुतूहल संपलें तर पुढचें वाचतो तरी कोण कशाला ? तेव्हां जोशीबुवा कोण, हें एवढ्यांतच नाहीं सांगत. त्याचा उलगडा— जरूर पडलीच तर— पुढें करीन.

कदाचित् तुम्हीं ऐकलेली देखील असेल ही गोष्ट. कारण, मनांत कल्पना आली म्हणजे चार मित्रमंडळींना ती बेलाशक सांगून टाकायची असा त्यांचा स्वभाव आहे. एकाद्या चोरट्या साहित्यिकानें 'आपलीच' म्हणून यापूर्वीं ती छापून सुद्धां टाकली असेल. असा प्रकार झाला आहे यापूर्वीं चार दोन वेळां, म्हणून म्हणतों.

पण चोरून नाहीं तरी, मीं ही उसनी शिदोरी आणली आहे, हें मात्र आधींच सांगून ठेवतों. उगीच मागाहून चोरीचा आरोप नको यायला माझ्यावर !

* * * *

सुदामराव किरकिरे, बंडोपंत दडपे, शंतनु समझोते आणि मी असे एकदां संध्याकाळीं पर्वतीच्या उतरणीवर भेळ खात बसलों होतों. तसें पाहिलें तर साहित्यविषयक किंवा कोणत्याही गंभीर

विषयाची चर्चा करण्याचा आमचा त्यावेळीं मुळींच मानस नव्हता.

—पण भेळ संपल्यावर ज्या कागदाला मी हात पुशीत होतों त्याकडे पाहून बंडोपंत दडपे म्हणाला– ‘काय रे, पुरोगामी वाङ्मयांत अगदीं हात धुवून– म्हणजे पुसून घेतो आहेस कीं !’

‘अमक्याच साप्ताहिकाच्या रद्दींत भेळ बांधून दे असें कांहीं आम्हीं भेळवाल्याला सांगितलें नव्हतें.’ पण बंडोपंताच्या शब्दांमुळें माझें लक्ष त्या कागदाकडे गेलें—

—कला, कलावंत आणि कलामंदिर ह्या सदराचें तें पान होतें—

आणि त्यांतून डोकावणाऱ्या चारपांच नटनटींच्या तोंडाला मीं माझा हात पुसला होता.

बंडोपंतानें ह्या गोष्टीचा पुरेपूर उपयोग करून घ्यायचें ठरविलें. तो म्हणाला– ‘कलावंतांचीं थोबाडं रंगविणं कांहीं बरं नाहीं– आणि तीं सुद्धां भेळ खाल्लेल्या हातांनीं...!’

पण मीं कांहीं बोलायच्या आधींच सुदाम किरकिरे म्हणाला– ‘अरे बाबा, आतां त्याला दे कीं तो कागद. त्याचे हात अगदीं शिवशिवायला लागले आहेत बघ.’

हा पाचकळपणा आणखीहि पुढें चालला असता; मसाल्यानें रंगलेल्या त्या स्वर्गीय सौंदर्यप्रतिमांचें सौंदर्यसमीक्षण देखील चालू झालें असतें कदाचित्. पण तेवढ्यांतच दुसरा एक रद्दीचा तुकडा कुठून तरी वाऱ्यानें उडून आमच्या मध्येंच येऊन पडला.

‘हे कोण आले ?’ असें म्हणून शंतनु समझोत्यानें तो कागद उचलला.

‘कोण म्हणजे ? त्या पहिल्या वीराचा छुपा मारेकरी !’ बंडोपंतानें आपल्या अद्ययावत् माहितीची चुणुक दाखविली.

आणि महाराष्ट्राच्या तरुण पिढीच्या पुढारीपणावर हक्क सांगणारे दोन प्रतिस्पर्धी पेंढारी भेळवाल्यानें रद्दीच्या स्वरूपांत आमच्यापुढें उभे केले होते.

त्या दोघांनीं गेलीं तीनचार वर्षें साहित्यक्षेत्र हलवून सोडलें होतें. दोघांनाही परस्परांचा हेवा वाटत होता– कारण दोघेही असामान्य होते– निदान त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनें तरी.

त्यांतला एक तमाशाच्या कलामंदिरांचें उद्‌घाटन करून, वेळीं-अवेळीं विदूषकी विनोदाचीं व्याख्यानें देऊन, कोणाहि सभ्य माणसावर चिखलफेक करून, वाऱ्याबरोबर राजकीय मतांची टोपी फिरवून, शेवटीं बरोबर नटयांना नाचवून 'येन केन प्रकारेण' प्रसिद्धी पावण्याचा प्रयत्न करून राहिला होता—

आणि दुसरा—

वैद्यबुवांचें सोंग करणाऱ्या बेडकाची गोष्ट आहे ना? तसा!

दोघांनींही साहित्यिक बुवाबाजीच एका प्रकारें चालविली होती. आणि दोघांचाहि भगतगण देखील बराच मोठा होता.

रद्दीचे दोन्ही तुकडे हातीं धरून सुदाम किरकिऱ्यानें विचारलें,

'ह्यांतला मोठा कोण?'

'मोठेपणाचं मोजमाप काय?' मीं विचारलें.

'कसलंही घ्या.' बंडोपंत म्हणाला.

'वजनानं ठरवायचं असेल तर उत्तर सोपं आहे.' शंतनु म्हणाला.

'लोकप्रियता?' किरकिऱ्यानें प्रश्न केला.

'त्यांची कीं त्यांच्या रद्दीची?' इति दडपे.

'कुणाच्याही रद्दीचा भाव सारखाच. आणि सध्या तो चांगला आहे.' मीं म्हटलें.

'कोणाच्या व्याख्यानाला गर्दी अधिक होईल?' समझोत्यानें नवें परिमाण सुचविलें.

'पण त्यांपैकीं एक पुण्यांत तरी व्याख्यान देणार नाहीं.' मीं शंका काढली.

'आणि इतक्यांत त्या दुसऱ्याला कसलाही जाहीर कार्यक्रम करण्याचं धैर्य होणार नाहीं.' किरकिरे हताशपणानें म्हणाला.

'चारित्र्य ?' दडप्यानें तुलनेचें आणखी एक गमक सुचविलें.

'ऑर्डर, ऑर्डर ! दोघांचाही चारित्र्याशीं मात्र दूरचा देखील संबंध नाहीं !' किरकिरे चिडून बोलला.

'एकाचं धाडस लोकोत्तर आहे.'

'पण दुसऱ्याचा दांभिकपणा अतुलनीय ठरेल !'

'एकाची बेलगाम रसिकता–'

'दुसऱ्याचा अभिजात पागलपणा–'

'एकाचीं तमाशेवजा नाटकं–'

'दुसऱ्याच्या ध्येयशून्य प्रणयी कादंबऱ्या–'

'एकाचे चित्रपट–'

'दुसऱ्याचे त्या चित्रपटांवरचे बुरख्याआडून लिहिलेले मत्सरपूर्ण टीकालेख–'

ही तुलना आणखीही चालू राहिली असती; पण भेळ संपलेली आणि परत फिरायची वेळ देखील टळून गेलेली, म्हणून समझोत्यानें त्या चर्चेला अकस्मात विराम देण्याचें ठरविलें.

'वाद बंद करा आतां. दोघेही समान, अगदीं तुल्यगुण आहेत.' असें म्हणून त्यानें रद्दीचे ते दोन्ही तुकडे टर्ररदिशीं टरकावले. आणि आम्ही घरच्या मार्गाला लागलों.

टिळकरोडवर आम्ही एकमेकांचा निरोप घेणार इतक्यांत—

'अहो शिष्ट !' परिचयाची हाक माझ्या कानीं आली.

आणि आम्हीं चौघांनींहि एकदम त्या दिशेकडे पाहिलें.

हातांत कसली तरी पुडी घेऊन रस्त्यापासून पंधरावीस कदमांवर पडक्या विहिरीच्या दगडी मोटवणापाशीं जोशीबुवा उभे होते आणि हंसत हंसत ती पुडी आम्हांला दाखवीत होते.

'अशा गोरज मुहूर्तावर कुणाला शिवी देतांय् ?' मीं त्यांना विचारलें.

'उडदांमाजी काळे गोरे...' विडीचें थोटुक फेकून देत त्यांनीं

त्या दोघांनीं गेलीं तीनचार वर्षें साहित्यक्षेत्र हलवून सोडलें होतें. दोघांनाही परस्परांचा हेवा वाटत होता– कारण दोघेही असामान्य होते– निदान त्यांच्या स्वतःच्या दृष्टीनें तरी.

त्यांतला एक तमाशाच्या कलामंदिरांचें उद्घाटन करून, वेळीं-अवेळीं विदूषकी विनोदाचीं व्याख्यानें देऊन, कोणाहि सभ्य माणसावर चिखलफेक करून, वाऱ्याबरोबर राजकीय मतांची टोपी फिरवून, शेवटीं बरोबर नटयांना नाचवून 'येन केन प्रकारेण' प्रसिद्धी पावण्याचा प्रयत्न करून राहिला होता—

आणि दुसरा—

वैद्यबुवांचें सोंग करणाऱ्या बेडकाची गोष्ट आहे ना? तसा!

दोघांनींही साहित्यिक बुवाबाजीच एका प्रकारें चालविली होती.

आणि दोघांचाहि भगतगण देखील बराच मोठा होता.

रद्दीचे दोन्ही तुकडे हातीं धरून सुदाम किरकिऱ्यानें विचारलें, 'ह्यांतला मोठा कोण?'

'मोठेपणाचं मोजमाप काय?' मीं विचारलें.

'कसलंही घ्या.' बंडोपंत म्हणाला.

'वजनानं ठरवायचं असेल तर उत्तर सोपं आहे.' शंतनु म्हणाला.

'लोकप्रियता?' किरकिऱ्यानें प्रश्न केला.

'त्यांची कीं त्यांच्या रद्दीची?' इति दडपे.

'कुणाच्याही रद्दीचा भाव सारखाच. आणि सध्या तो चांगला आहे.' मीं म्हटलें.

'कोणाच्या व्याख्यानाला गर्दी अधिक होईल?' समझोत्यानें नवें परिमाण सुचविलें.

'पण त्यांपैकीं एक पुण्यांत तरी व्याख्यान देणार नाहीं.' मीं शंका काढली.

'आणि इतक्यांत त्या दुसऱ्याला कसलाही जाहीर कार्यक्रम करण्याचं धैर्य होणार नाहीं.' किरकिरे हताशपणानें म्हणाला.

'चारित्र्य ?' दडप्यानें तुलनेचें आणखी एक गमक सुचविलें.

'ऑर्डर, ऑर्डर ! दोघांचाही चारित्र्याशीं मात्र दूरचा देखील संबंध नाहीं !' किरकिरे चिडून बोलला.

'एकाचं धाडस लोकोत्तर आहे.'

'पण दुसऱ्याचा दांभिकपणा अतुलनीय ठरेल !'

'एकाची बेलगाम रसिकता–'

'दुसऱ्याचा अभिजात पागलपणा–'

'एकाचीं तमाशेवजा नाटकं–'

'दुसऱ्याच्या ध्येयशून्य प्रणयी कादंबऱ्या–'

'एकाचे चित्रपट–'

'दुसऱ्याचे त्या चित्रपटांवरचे बुरख्याआडून लिहिलेले मत्सरपूर्ण टीकालेख–'

ही तुलना आणखीही चालू राहिली असती; पण भेळ संपलेली आणि परत फिरायची वेळ देखील टळून गेलेली, म्हणून समझोत्यानें त्या चर्चेला अकस्मात विराम देण्याचें ठरविलें.

'वाद बंद करा आतां. दोघेही समान, अगदीं तुल्यगुण आहेत.' असें म्हणून त्यानें रद्दीचे ते दोन्ही तुकडे टर्रदिशीं टरकावले. आणि आम्ही घरच्या मार्गाला लागलों.

टिळकरोडवर आम्ही एकमेकांचा निरोप घेणार इतक्यांत—

'अहो शिष्ट !' परिचयाची हाक माझ्या कानीं आली.

आणि आम्हीं चौघांनींहि एकदम त्या दिशेकडे पाहिलें.

हातांत कसली तरी पुडी घेऊन रस्त्यापासून पंधरावीस कदमांवर पडक्या विहिरीच्या दगडी मोटवणापाशीं जोशीबुवा उभे होते आणि हंसत हंसत ती पुडी आम्हांला दाखवीत होते.

'अशा गोरज मुहूर्तावर कुणाला शिवी देतांय् ?' मीं त्यांना विचारलें.

'उडदांमाजी काळे गोरे...' विडीचें थोटुक फेकून देत त्यांनी

उत्तर दिलें.

'जोशीबुवा, आम्हीं भेळ खाल्लीय् आतांच'. किरकिरे म्हणाला.

'हो, आहे माहीत! तुम्हांला नको असली तर मी एकटाच खाऊं शकतों. तुम्ही आपले पाहात तर बसाल?'

जोशीबुवांची भिड मोडणें कुणाला शक्य आहे?

आम्ही एकत्र खालीं बसलों. जोशीबुवा पुडी सोडूं लागले—

'काय योगायोग पाहा—कला, कलावंत, कलामंदिर इथें देखील हजर!' तो कागद पाहून मीं म्हटलें.

'खरंच कीं!' कुतूहलानें त्या कागदाकडे पाहात जोशीबुवा म्हणाले. 'पण त्यांत आश्चर्य वाटण्याजोगं काय आहे? काढ अंक कीं घाल रद्दींत, असं केलं तरी तोटा व्हायच्या नाहीं सध्या. शिवाय जकातींत देखील बचत...' आणि त्यांनीं भेळीचा बकणा मारला. आम्हीं भेळ खाल्ली होती तरी चौघांचेही हात एकदम पुढें झाले.

'जोशीबुवा, तुमचं मत काय आहे!' मीं विचारलें.

'कशाविषयीं?'

'मराठी साहित्यिकांतल्या गामा-गुंगाविषयीं.' दडपे म्हणाला.

'खुशाल आहेत कीं! कांहीं कमजास्त ऐकलंत कीं काय?' त्यांनीं उपहासपूर्ण गांभीर्यानें विचारलें.

'व्हायचं तें झालं कीं सगळं! आतां काय व्हायचं राहिलं आहे?' किरकिरे म्हणाला.

'मग आतां कां डोक्याला त्रास करून घेतांय्?' जोशीबुवांनीं पूर्वीच्याच स्वरांत म्हटलें.

'नाहीं हो! पण उद्यां अभिनंदन कीं निषेध, हा विषय आहेच ना शिल्लक!' मीं म्हटलें.

'दोन्ही गोष्टींना माझा अगदीं फुल सपोर्ट आहे.' जोशीबुवा प्रांजलपणें म्हणाले.

'म्हणूनच तुमचं खरं मत आम्हांला समजून घ्यायची इच्छा

झाली आहे.' त्यांची पळवाट बंद करण्याच्या उद्देशानें दडपे म्हणाला.

'तुम्हांला एक गोष्ट सांगतों.' जोशीबुवांनीं भेळ संपवून विडी शिलगावली.

'पण तुमचं उत्तर?' मीं विचारलें.

'गोष्ट संपल्यावर आठवण करा.'

'बरं, सांगा तुमची गोष्ट.' – आणि आम्हीं श्रोत्यांची भूमिका स्वीकारली.

विडीचें थोटुक फेकून जोशीबुवांनीं आरंभ केला—

'पुणें नांवाचं एक मोठं शहर होतं– म्हणजे अजूनहि आहे.

'त्यांत दोन वेडे राहात होते—

'एक संपूर्ण वेडा– आणि एक अर्धवट वेडा—

'अर्धवट वेड्याला संपूर्ण वेड्याच्या अस्तित्वाची कल्पना नव्हती.

'संपूर्ण वेड्याला त्या अर्धवटाची दखल नव्हती—

'विचित्रपणाला ईश्वरी अवतार समजण्याची प्रथा असल्यामुळें ते दोघेही वेडेपणाच्या भांडवलावर एका प्रकारें 'बुवाच' बनले होते आणि दोघांचाही भगतगण बराच मोठा होता.

'एकदां काय झालें—

'दुपारच्या ऐन बारा वाजतां त्या दोन वेड्यांची भर बुधवार-चौकांत अगदीं समोरासमोर गांठ पडली—

'संपूर्ण वेडा सपशेल नंगा—

'आणि अर्धवट वेडा फक्त लंगोटी नेसलेला—

'दोघेही भुतारल्यासारखे एकमेकांकडे पाहूं लागले—

'आणि अर्धवट वेड्याच्या अंगांत एकाएकीं जो कांहीं संचार झाला– जी कांहीं वीरश्री चढली– तो थरथर कांपूं लागला आणि एकदम त्या संपूर्ण वेड्याला म्हणाला —

'काय रे, तूं आहेस तरी कोण? भर बुधवारचौकांत, दिवसा-ढवळ्या असा नागव्यानें फिरतोस? लाजलज्जा कांहीं आहे कीं

नाहीं तुला ?’

संपूर्ण वेड्यानें परमावधीचें आश्चर्य दाखवीत म्हटलें—

‘हे महात्म्या, माझी लाज काढण्यापूर्वी तुझ्या अब्रूचा स्टॉक केवढा आहे तो तरी मला दाखव !’

एवढ्यांत दोघांच्याही भगतगणांना ह्याची वर्दी लागली आणि ते आपापल्या आराध्य-विभूतींच्या मागें येऊन दाखल झाले—

‘काय ही सात्त्विकतेची कळकळ–’ अर्धवटाचे भगत त्याचे गोडवे गाऊं लागले—

‘काय ही निर्भीड उघडी मनोवृत्ती–’ संपूर्ण वेड्याच्या आरत्या सुरू झाल्या.

आणि त्या दोन वेड्यांचा वितंडवाद चाललाच होता.

‘माझ्या अब्रूविषयीं विचारतोस ? आणि तूं ?’ अर्धवट वेडा कुचेष्टेनें संपूर्ण वेड्याला विचारूं लागला.

‘हो ! हो ! तुझी अब्रू. अरे मी तर बोलून चालून नंगाच आहें !’ संपूर्ण वेडा गर्जून बोलूं लागला.

‘काय हा धाडशी बेडरपणा !’ संपूर्ण वेड्याचे भगत आक्रोशूं लागले.

‘ही काय धडाडी ? हा तर बेशरमपणाचा कळस आहे !’ अर्धवटाचे चाहाते त्याची बाजू सांवरून धरण्याचा प्रयत्न करूं लागले—

‘तुझी काय लायकी आहे माझ्या अब्रूविषयीं विचारायची ! शुक्रवारांतल्या कसबिणींनें सदाशिव पेठेंतल्या पतिव्रतेवर शिंतोडे उडवायचे...’ अर्धवट वेडा म्हणाला.

‘जा रे लुकड्या ! माझं ब्लिट्स् माहीत नाहीं अजून !’ संपूर्ण वेडा ‘फॉर्मात’ येऊन म्हणाला.

‘ती घमेंड राहूं द्या हां. माझ्याही पाठीशीं पैसेवाला फिल्म कंपनीचा मालक आहे म्हटलं !’ अर्धवट वेडा फुशारक्या मारूं लागला.

‘संपूर्ण वेडाच तो ! त्याला एकदम कसलीशी हिरहिरी आली.

तो आपल्या प्रतिस्पर्ध्याला गंभीरपणें म्हणाला,

'तूं स्वतःला भलताच कोणी तरी समजतोस असं वाटतं. सांग रे, सांग ! काय करूं मी ?'

'हा प्रश्न ऐकून अर्धवट वेडा क्षणभर विचारांत पडला.

'दोघांचेही भगत 'आतां पुढें काय ?' अशा उत्सुकतेनें दोघांकडेही पाहूं लागले.

'पण त्यांना फार काळ संशयांत न ठेवतां अर्धवट वेड्यानें एकदम आपली लंगोटी फेडली आणि ती संपूर्ण वेड्याच्या पुढें धरून त्याला म्हणाला—

'चल, निदान ही नेसून तरी फीर.'

'छे, छे ! तुझी लंगोटी, आणि मला ? हट् ! तुझी अब्रू देखील झांकली नाहीं तिनें तर माझी ?' आणि तो संपूर्ण वेडा विचित्रपणेंच हसूं लागला.

'केवढं औदार्य !' अर्धवटाचे भगत म्हणूं लागले.

'काय ही निःस्पृहता !' संपूर्ण वेड्याच्या भगतांनीं हर्षभरित होऊन त्याच्या नौबती बडवायला आरंभ केला.

'दोघेही वेडे एकमेकांना 'तूं नेस', 'तूं नेस' म्हणून आग्रह करूं लागले—

'अर्धवट वेडा संपूर्ण वेड्याच्या अब्रूची काळजी वाहूं लागला—

'संपूर्ण वेड्याला अर्धवट वेड्याच्या स्थितीविषयीं भडभडून आलें.

'आणि ती अब्रूची लंगोटी मात्र असहायपणें त्रिशंकूसारखी मध्येंच लोंबकळत होती.'

चटदिशीं जोशीबुवा उठले आणि म्हणाले—'संपली गोष्ट ! आतां याउप्पर आमचं मत आपणांस ऐकायचं आहे काय ?'

* * * *

'जोशीबुवा' कोण हें आतां मीं सांगितलेंच पाहिजे काय ?

---

## रीगलमधील 'री-टेक' : : ४

दिवे लागणीची वेळ. जिमखान्यावरचीं कामें आटोपून मी लकडीपुलाजवळच्या 'रीगल'मध्यें लेमोनेड पीत बसलों होतों, आणि त्या दिवशींचींच, पण माझ्यासारख्या असंख्य फुकट्या वाचकांनीं हाताळल्यामुळें चोळामोळा झालेलीं, वर्तमानपत्रें वरवर चाळीत होतों.

रेस्टॉरॉंमध्यें म्हणण्यासारखी गर्दी नव्हती, यामुळें प्रत्येक गिऱ्हाइकाला एक एक टेबल लाभूनही दोन टेबलें, सभोंवतालच्या खुर्च्यांसहित, त्या वेळीं मोकळींच पडलेलीं होतीं.

काउंटरपाशीं बसलेला इराणी कसलें तरी इराणी गाणें गुणगुणत स्वतःची करमणूक करून घेत होता.

फुटपाथवरच्या सायकल-स्टँडवर सायकली खडखडल्यामुळें—कुलूप लावण्याची दक्षता घेतली होती तरी—माझ्या सायकलकडे मीं दृष्टि फेकली.

तिघां नवजवानांनीं आपल्या सायकली खाड्दिशीं स्टँडवर उभ्या केल्या आणि ते वर आले. माझ्या पलीकडचें मोकळें टेबल पाहून सभोवतालीं दृष्टि फेकीत ते तिथें येऊन बसले.

तिघांच्याही वेशावरून आणि त्या वेळच्या चर्येवरून ते नुकतेच

कसली तरी मॅच खेळून आले असावेत असें दिसत होतें.

उत्तम प्रकृतीच्या माणसांविषयीं अकारणच माझा अनुकूल ग्रह होत असतो. बेसुमार सिगरेटा ओढल्याकारणानें जरी त्या तिघांचेही ओठ चांगलेच काळवंडलेले दिसत होते तरी मीं स्वतःशींच म्हटलें, 'उद्यां म्हाताऱ्यासारखे वांकून खोकायला लागले कीं देतील सोडून.'

त्यांतला एक होता पंचविशीच्या वयाचा. चेहऱ्यावरून 'निबर' दिसत असला तरी त्याच्या डोळ्यांत पोरकटपणा ओतप्रोत भरून राहिला होता. तो किंचित् ठेंगणासा होता तरी एरवीं कांहीं बेडौल दिसत नव्हता.

दुसरा वयानें विशीच्या आंतबाहेर होता. पोशाखावरून मात्र श्रीमंताचा लेक दिसत होता तो. अंगानें उंच सडपातळ, तरी पण प्रकृतीनें ठीक दिसत होता.

आणि तिसरा– सोळाच्या पुढें आणि अठराच्या आंत अशा संक्रमणावस्थेंतला असावा. बोलण्यांत मात्र त्या दोघांनाही मुळींच ऐकणारा नव्हता.

त्या 'निबर' जवानानें आपल्या उंच स्नेह्याला म्हटलें—

'××× च्या, सोडालेमन-मिक्स कीं आयस्क्रीमसोडा ?'

'आजच्या बजेटांत सिंगल चहाच बसतो.'

'बापाचा पैसा आहे तरी इतका चिक्कू ! उद्यां स्वतःचे खर्चायची वेळ आली तर सेकंडहँड वेण्याच बायकोच्या डोक्यांत घालील–' त्या छोट्यानें टोला मारला.

'त्या बिचारीची एवढ्यांत नको रे काळजी...' श्रीमंतांनीं उत्तर दिलें. 'खरंच, आज माझ्याजवळ दोन तीन आणे निघतील.'

'मी तुला कर्ज देतों, पण आज भिकारडेपणा नाहीं चालायचा !' त्या ठेंगण्यानें उत्तर दिलें.

'क्या लावूं साब ?' पोऱ्यानें त्यांना विचारलें.

'तीन आयस्क्रीमसोडा.'

'बग्या, आज किती तारीख ?' श्रीमंतानें विचारलें.

'अठ्ठावीस. चार दिवसांनीं येईल तुझी M.O.' छोट्या बग्यानें म्हटलें, 'आणि तोंपर्यंत हे माधवराव कर्ज देत राहतील तुला.'

'पैसे माझे आणि हें कार्ट तुला आश्वासनं देतंय् बाबुराव !' माधवरावांनीं मोठेपणाचा आव आणून हंसत म्हटलें. 'पण माझा खजिना देखील अगदीं रिकामा आहे बघ. फार तर दोन अडीच...'

इतक्यांत बग्यानें त्यांना खुणावलें व तिघेही दरवाज्याकडे पाहूं लागले. दोन 'कॉलेज गर्ल्स्' आंत येत होत्या.

'ओ ऽ येस्.' बाबुराव हंसतच आपल्या दोस्तांना म्हणाला.

त्यांना पाहतांच त्या मुली दूरच्या टेबलाकडे निघाल्या. पण त्या जात असतांना, तिघेही नाटकी अभिनय करीत वांकून अर्धवट त्यांना ऐकूं जाईल अशा बेतानें आणि अर्धवट स्वतःशींच, पण अत्यंत पाचकळपणानें, म्हणाले 'अहो या, या कीं !'

पण त्यांच्याकडे लक्षही न देतां त्या पलीकडे जाऊन बसल्यावर माधवराव म्हणाला— 'बाबुराव— मर्जी नाहीं लागत आज !'

'रुसल्या बरं का ! My lady has frowned !' साभिनय बग्या बोलला.

'Alas, my Love !' बग्याचा गालगुचा घेत बाबुरावानें भग्न हृदयाचा 'ट्रॅजिक' आविर्भाव केला.

आणि मग त्या दोघींना उद्देशून त्यांनीं मुक्ताफळें काढायची जी शर्यत आरंभिली तिचें वर्णन करणें शक्य आणि इष्ट नाहीं.

त्या मुली निघून जातांना पुनः एकदां त्या तिघांनींही आपल्या अभिजात रसिकतेचें (?) हिडीस प्रदर्शन केलें.

* * *

केवळ योगायोगानेंच, पण दुसऱ्या दिवशीं देखील त्याच वेळीं मी रीगलमध्यें शिरलों आणि माझें आवडतें लेमोनेड मागविलें.

काल ज्या टेबलापाशीं मी बसलों होतों तिथें आज दुसरेच एक

गृहस्थ–सुमारें पस्तिशीच्या वयाचे–रॅस्पबेरी पीत बसले होते. त्यांचें शरीर लक्षांत मरण्यासारखें सुदृढ– अगदीं पहिलवानी घाटाचें म्हणानात– पण चेहरा मात्र सौम्य आणि सीध्या वृत्तीचा निदर्शक दिसत होता.

लेमोनेड येईपर्यंत आजूबाजूच्या टेबलांवरून कांहीं वर्तमानपत्रें मीं जमा केलीं आणि कोपऱ्यांतल्या एका टेबलापाशीं बसलों.

पण वाचनाकडे माझें लक्ष लागेना. कारण, कालचा तो प्रसंग माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला आणि त्याविषयींच मी विचार करूं लागलों.

त्या शिलेदारांची आणि त्या मुलींची जानपछान होती का ?

तसें कांहीं मला वाटेना. कारण, त्यांना पाहतांक्षणींच त्या तर तिरस्कारानेंच दुसरीकडे जाऊन बसल्या होत्या !

मग अशा वागण्यापासून त्या जवानांना काय लाभ ?

तिघेही कॉलेजचे विद्यार्थी !

माझा कांहीं गैरसमज तर होत नव्हता ना ? कीं ही एक विनोदाची नवी तऱ्हा अलिकडेच 'व्होग'मध्यें आली होती ?

अशिक्षितांनीं असें केलें असतें तर त्यांना सुशिक्षितांनीं 'मवाली' म्हटलें असतें—

पण हे तर चांगले, निदान वरून तरी, सभ्य दिसत होते.

माझें लेमोनेड टेबलावर येऊन दाखल झालें. आणि तितक्यांतच कालचे तिघे नवजवान अगदीं कालच्याच वेशांत आणि कालच्याच 'मूड'मध्यें आंत शिरले.

कालचेंच त्यांचें टेबल आजहि त्यांची वाट पाहात होतें. शिरस्त्या-प्रमाणें सभोंवार दृष्टि फेकीत त्या टेबलापाशीं ते जाऊन बसले.

दुसऱ्या कोणीं कसलीही सूचना करण्यापूर्वींच बाबुरावानें 'तीन सोडालेमन मिक्स' मागविलीं आणि तो माधवरावांना म्हणाला, 'किती पैसे आहेत खिशांत ?'

'असतील चारपांच आणे.'

'बरं, तर मग पासिंगशोचं पाकिट तूंच घे आज.' असें म्हणून बाबुरावानें आपल्या खिशांतलें सिगरेटचें पॅकेट काढलें. त्यांत तीनच सिगरेटा शिल्लक होत्या; आणि त्या तिघांनीं शिलगावल्या. आगगाडीच्या एन्जिनासारखा धूर वर फुंकीत बाबुराव म्हणाला– 'अजून कमींत कमी तीन दिवस आहेत पैसे यायला!'

वेटरनें तीन ग्लासें त्यांच्या पुढ्यांत आणून ठेवलीं.

सभोंवार पाहून माधवराव म्हणाला, 'आज रे? कीं एकादशी?'

पण तेवढ्यांतच दोन तरुणी आंत आल्या आणि सोयीची जागा पाहण्यासाठीं क्षणभर काउंटरपाशींच उभ्या राहिल्या.

त्या तीन जवानांचें लक्ष एकाच वेळीं त्यांच्याकडे गेलें आणि अगदीं अंगवळणीं पडल्यासारखा त्यांनीं कालचाच अभिनय करून त्या मुलींना ऐकूं जाईल अशा बेतानें म्हटलें, 'हं, हं. अहो याकीं!'

पण त्यांचें 'स्वागत' संपतें न संपतें तोंच मी जिथें काल बसलों होतों त्या टेबलापाशीं बसलेला गृहस्थ एकदम उठला आणि त्या मुलींना मोठ्यानें म्हणाला,

'कमे, सुशे, हे सद्गृहस्थ तुम्हांला बोलवताहेत. या कीं इकडेच!' आणि त्यानें खर्रर्कन तीन खुर्च्या ओढून त्यांच्या टेबलापाशीं मांडल्या.

मी आश्चर्यानेंच त्या गृहस्थाकडे पाहूं लागलों—

पण– त्या तिघांचे चेहेरे मात्र एकदम पाहण्यासारखे झाले!

त्या दोघी मुली हंसतच त्या टेबलापाशीं आल्या—

तो पेहेलवानी थाटाचा गृहस्थ माधवराव आणि बाबुराव यांच्या मध्यें बसला.

बग्या उठून जाण्याचा प्रयत्न करूं लागला. पण इतक्यांतच त्या दोघी मुली त्याच्या दोहीं बाजूंस येऊन बसल्या. त्या बसल्याबरोबर तो गृहस्थ त्या मुलींना म्हणाला—

'ठीक! मला वाटलं तुम्हांला ऐकूं गेलं नसेल.' नंतर माधवरावांच्याकडे वळून तो म्हणाला, 'तुमच्या इच्छेला मान देऊन ह्या आल्या आहेत. मी ह्यांचा एक दूरचा नातेवाईक आहें. काल तुम्हीं इतक्या उदारपणें दुसऱ्या दोघींना बोलावलंत! पण मला वाटतं त्यांना मॅनर्सच नव्हत्या. आज तसं कांहीं नाहीं. अगदीं मोकळेपणानं बरं का! कमे, काय घेणार तूं? आणि तूं सुशा?'

परंतु तिघेही जवान दगडासारखे निश्चल झाले होते.

'कांहींही चालेल आम्हांला.' त्या मुली हंसतच म्हणाल्या.

माधवराव उठूं लागला– पण त्या गृहस्थानें आपल्या बळकट हातानें त्याला जबरीनेंच खालीं बसायला भाग पाडून म्हटलें–'छे! छे! बसा हो! खिलाडू वृत्ति आवडते मला देखील.'

पण ते तिघेही हातरुमाल काढून घाम पुसूं लागले.

'तुम्ही काय घेणार?' त्या गृहस्थानें त्या तिघांना एकदम सवाल केला. पण एकाचेंही तोंड उघडेना.

'ठीक आहे! बॉय, सहा डबल आयस्क्रीम, सहा पुडिंग आणि केक्स आण.'

'अच्छा साब' म्हणून पोऱ्या गेला.

'आतां तुमचा परिचय करून देतों बरं का. मिस्टर माधवराव, तुमचं आडनांव काय? आणि बाबुराव तुमचं?' मग बग्याकडे वळून तो गृहस्थ म्हणाला 'आणि तुझं रे बाळ? तुम्ही ××× कॉलेजांत आहांत नाहीं का?'

ते तिघेही वीर एकमेकांकडे पाहूं लागले—

आणि माझ्यासारखीं इतर गिऱ्हाइकें गालांतल्या गालांत हंसत त्यांच्याकडे पाहूं लागलीं. त्या मुली मिस्किलपणें हंसूं लागल्या. आणि त्यामुळें तर त्यांची स्थिति फारच केविलवाणी झाली.

ते बोलत नाहींत असें पाहून तो गृहस्थ त्या मुलींना म्हणाला, 'काय ग? मुलींनीं बोलण्याचं काम करायचं आणि मुलांनीं

माना खालीं घालून बसायचं असा नवा शिष्टाचार निघालाय् कीं काय ? मी कॉलेज सोडल्याला दहाबारा वर्षें झालीं आतां, म्हणूनच विचारतों.'

'तसं नाहीं कांहीं. इतक्या आदरानं आम्हांला बोलावलंय त्यांनीं, ते काय बोलल्याशिवाय राहतील ? कांहीं वेळानं कदाचित् 'प्रपोज' करायलासुद्धां भ्यायचे नाहींत.' 'कमा'नें धीटपणें त्यांची टिंगल उडवायला आरंभ केला.

उसना राग आणि नकली धीटपणा अंगीं आणून माधवराव आणि बाबुराव एकदम ऊभे राहिले.

पण त्या गृहस्थानें दोन्ही हातांनीं त्यांच्या मानगुट्या पकडल्या आणि हंसतच तो त्यांना म्हणाला, 'बसा हो, बसा. पहिल्यापहिल्यांदा सगळेच नर्व्हस होतात मुलींच्या पुढ्यांत. बसा खालीं. निमंत्रित पाहुण्यांना मध्येंच सोडून जाणं हा रीतीचा मार्ग नव्हे.'

थरथर कांपत ते खालीं बसले. त्या गृहस्थाची पक्कड त्यांना चांगलीच जाणवली असेल कदाचित्.

बग्याकडे वळून दुसरी मुलगी– सुशी– म्हणाली, 'तुझी बहीण– मालती– आमच्या चांगली ओळखीची आहे. ती तुझी फारच स्तुती करते आमच्याजवळ.'

माझ्याकडे कॅमेरा असता त्या वेळीं तर त्या 'बाळा'चा मीं खासच फोटो काढून घेतला असता.

पोऱ्यानें आयस्क्रीमची एक एक प्लेट प्रत्येकापुढें ठेवली आणि मिस्किलपणें हंसतच तो पुडिंग आणण्यासाठीं निघून गेला.

'करा सुरुवात.' त्या मुलींच्या 'दूरच्या नातेवाईकानें' फर्माविलें.

पण आइस्क्रीम पुढ्यांत दिसत असूनहि त्या तिघां जवानांच्या घशांना मात्र कोरड पडली होती.

दीनवाणा चेहरा करून बाबुराव त्या गृहस्थांना हळूच म्हणाला, 'We are very sorry. Please excuse us this time.'

(आम्हांला फार वाईट वाटतं. एवढी वेळ क्षमा करा आम्हांला.)

'भलतंच !' कमा मोठ्यानें हंसून म्हणाली, 'On the contrary, we are very very glad to have met you!' (उलट तुमची भेट झाल्यामुळें आम्हांला फार फार आनंद होतोय!)

पोऱ्यानें पुडिंगच्या व केक्सच्या बशा आणून त्यांच्यापुढें मांडल्या आणि विचारलें, 'और क्या लावूं, साब ?'

'छे ओव्हल्टाईन लाव. एकदम फर्स्ट क्लास!' त्या गृहस्थानें त्या तिघांकडे पाहात फर्माविलें.

त्या दोघां मुलींनीं सहा सहा केक्स कापून प्रत्येकाच्या पुढ्यांत सरकविल्या आणि आयस्क्रीम चाखायला आरंभ केला.

ते तिघेही 'होस्ट' मात्र 'देवा'सारखे बसले होते.

'करा ना सुरवात ! कीं भरवायला पाहिजे...' त्या गृहस्थानें उपहासानें त्यांच्याकडे पाहात म्हटलें—

तिघांनींही चिमणीसारखीं तोंडें करून केकचा एक एक तुकडा उचलला.

'आजचा हा प्रसंग आमच्या दृष्टीनें तरी सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे, नाहीं कमे ?' सुशीनें पुडिंगच्या बशींत चमचा खुपसून म्हटलें.

* * * *

ओव्हल्टाईनचे कप त्या दोघां मुलींनीं रिकामे केल्यावर तो गृहस्थ नाटकी गंभीरतेनें त्यांना म्हणाला, 'हं, उठा आतां. ह्यांनीं आपलीं नांवं सांगितलीं नसलीं तरी आपल्याला माहीत आहेतच. आणि आम्हांला तर ते कधींच विसरायचे नाहींत.' नंतर अंतर्यामीं थिजलेल्या व बाहेरून काळवंडलेल्या त्या तिघांना उद्देशून म्हणाला, 'लौकरच परतफेड होईल बरं का तुमच्या आदरातिथ्याची !'

त्या दोघी धीट मुली त्या गृहस्थाबरोबर बाहेर पडल्या. दरवाजापाशीं काउंटरकडच्या इराण्याला त्या गृहस्थानें डोळ्यांनींच कांहीं-

तरी खुणाविलें.

* * * *

हालचाल करण्याइतकी चेतना अंगीं आल्याबरोबर ते तिघेही आजूबाजूला न पाहतां एकदम निघाले—

'आवाज करो.' इराण्यानें आंत असलेल्या बॉयला पुकारलें.

तिघांनाही थांबणें भागच पडलें.

'तीन इस्सम सात-बारा आना ऽऽ' पोऱ्या आंतूनच ओरडला.

आणि गिऱ्हाइकांच्या सातमजली हास्यानें 'रीगल' दुमदुमून गेलें.

पण सारी शोभा मुकाट्यानें सहन करण्याशिवाय त्या तिघांना गत्यंतरच नव्हतें. इतके पैसे जवळ नसल्यामुळें बाबुराव कोट उतरूं लागला—

'ठीक तमाशा हुवा ! फिर ख्याल रहेगा ना साब ? जाव अबी.' इराण्यानें काउंटरवरूनच बाबुरावाच्या पाठीवर शाबासकी दिली.

* * * *

रीगलमध्येंच काय पण लकडीपुलाच्या बाजूला देखील तेव्हांपासून अजून ते तिघेही मला कधीं दिसले नाहींत.

## ब्रम्ह तेथें माया ! : : ५

राधाकृष्णसंप्रदायाचे विसाव्या शतकांतील महाराष्ट्रीय अध्वर्यु, श्रीसकलगुणावगुणविद्याऽवडंबरमंडित प्रणयतीर्थाधिपति अप्पास्वामी करबीरकर यांच्या पुणें येथील मठांत त्या दिवशीं संध्याकाळीं मोठीच गडबड माजून राहिली होती.

प्रसंगच तसा महत्त्वाचा होता !

राधाकृष्णसंप्रदायाच्याच काय पण अखंड भारतवर्षांच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचा असाच तो प्रसंग होता. आणि अशा ह्या अतुलनीय, अद्वितीय प्रसंगीं अप्पास्वामींच्या शिष्यगणाची भयंकर धांदल उडून जावी हें अगदीं साहजिक होतें.

अप्पास्वामींचा शिष्यगण जरी महाराष्ट्रभर पसरलेला होता तरी पुणें हेंच अलिकडे, निदान तीनचार वर्षें, अप्पास्वामींचें विशेष स्वरूपाचें कार्यक्षेत्र बनलें असल्याकारणानें त्यांच्या पुण्यपत्तनस्थ शिष्यगणांवरच त्यांच्या महत्कार्याची विशेष जबाबदारी येऊन पडली होती. आणि ते देखील गुरुसेवेंत अनन्यभावानें तनमनधन अर्पण करून आपल्या जीविताचें सार्थक साधण्याच्या मागें अहर्निश गढून गेलेले दिसत होते.

अप्पास्वामींचा अधिकारच तसा होता ! संतशिरोमणि ज्ञानेश्वर-

महाराज यांना ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथराज लिहूनहि जें साधतां आलें नाहीं, एकनाथाला भागवतांत जें प्रतिपादतां आलें नाहीं, तुकारामाला ज्याच्या महत्त्वाचा गंध देखील नव्हता, इतकेंच काय पण प्रत्यक्ष लोकमान्यांना देखील गीतारहस्य लिहून जें सांगतां आलें नाहीं, असें अत्यंत उच्च प्रतीचें तत्त्वज्ञान अप्पास्वामींनीं लोकांपुढें मांडलें होतें. कुणाही माणसाला मोक्षाप्रत नेणारा, जीविताचें संपूर्ण सार्थक साधणारा एकच एक मार्ग जो 'प्रणयसोपान' त्याचें दिव्य दर्शन फक्त अप्पास्वामींनाच झालेलें होतें. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' हें तत्त्व 'नवी गीता' लिहून आणि आपल्या नव्या मार्गाचें ज्ञान ग्रंथद्वारा, प्रवचनद्वारा आणि प्रत्यक्ष आचरणद्वारा अज्ञजनांना देऊन त्यांनीं पुनः एकवार सिद्ध केलें होतें. ह्या नव्या पंथाचें पितृपद वास्तविक त्यांनाच मिळणें रास्त होतें; असें असतां देखील, भोळसट लोकांना 'जुनें कांहीं तरी' दाखविल्याखेरीज ते ह्या सद्धर्माचा स्वीकार करणार नाहींत हें बरोबर ओळखून अप्पास्वामींनीं 'आपण जुन्या राधाकृष्णसंप्रदायाचाच पुनरुद्धार करीत आहोंत' असाच प्रकट प्रचार करून एक अद्वितीय स्वार्थत्यागहि साधला होता.

आणि म्हणूनच नव्या महाराष्ट्रांत त्यांचा शिष्यगण देखील उन्हाळ्यांतल्या ढेकणांच्या पैदाशीप्रमाणें अनिर्बद्धपणें वर्धमान होऊन राहिला होता.

पण—

'सास्वडकरबुवा' म्हणून ओळखला जाणारा दुसराच एक स्वामी अलिकडे प्रसिद्धीला येऊं लागला होता. आणि त्याची प्रचारपद्धति व भूमितिश्रेढीनें, अगदीं कॉलऱ्याच्या जंतूंच्या गतीनें, वाढूं लागलेला शिष्यगण पाहून अप्पास्वामींच्या पोटांत गोळा उठूं लागला होता.

सास्वडकर बुवाचें प्रस्थ बेताबाहेर वाढण्याच्या आधींच त्याचा निकाल लावण्याच्या इराद्यानें अप्पास्वामींनीं त्याची नालस्ती करायला सुरुवात केली. एका जाहीर प्रवचनांत त्यांनीं सास्वड-

कराच्या धर्महीन, लज्जाहीन, नीतिभंजक...वगैरे प्रचारावर अग्न्यस्त्र सोडलें आणि त्याच्याच आयुधांनीं त्याला 'सफा' करण्याची भीष्म-प्रतिज्ञा व्यासपीठावरून प्रकटपणें बोलून दाखविली.

अप्पास्वामींच्या शिष्यवृंदानें त्या प्रतिज्ञेची 'आकाशवाणी' साऱ्या महाराष्ट्रभर निनादून सोडली.

पण सास्वडकर बुवा कांहीं कच्चा नव्हता.

अप्पास्वामींचींच तत्त्वें, पण अधिक भडक शब्दांत आणि अधिक निःसंकोचपणें, तो आपलींच म्हणून खपवीत होता, आणि—

अप्पास्वामींचीं सारीं बिंगें त्याला परिपूर्ण माहीत होतीं !

अप्पास्वामी जें सूचित करीत तें तो आक्रोशून सांगे—

अप्पास्वामी गोंडस नांवाखालीं जें प्रथम प्रथम चोरून मारून करीत तें तो उघड उघड, अगदीं बेडरपणानें, लोकांच्या नाकावर टिच्चून करून दाखवीत होता—

अप्पास्वामी ज्याला 'प्लेटॉनिक लव्ह' म्हणत त्याला तो 'कलात्मक अद्वैत' म्हणे—

आणि नानाविध 'लाळितें' व अगदीं पानवाल्यापासून तों सलूनवाल्यापर्यंत सहज समजेल अशा भाषेंत आणि फाल्गुनी पौर्णिमेच्या प्रतिभापूर्ण म्हणी-उखाण्यांनीं सजवून आपला प्रचार तो चालवी.

आपल्या कीर्तिप्रांतावरचें सास्वडकराचें हें आक्रमण अप्पास्वामींना असह्य झालें आणि त्यांनीं देखील नियतकालिकद्वारा व विद्याऽवडंबरपूर्ण प्रवचनांच्या साह्यानें त्याच्याशीं खरोखरीचा सामना देण्याचा चंग बांधला.

आणि तब्बल तीन वर्षें ह्या दोन प्रतिस्पर्धी बुवांनीं चालविलेल्या गंभीर वादांत सारी जनता हवालदिल होऊन गेली.

दोघांच्याही मठांमध्यें चालणारे सारे उदात्त सोहळे उजेडांत येऊं लागले—

दोघांच्याही चारित्र्यदीपांमधून उफाळणारे प्रखर प्रकाशाचे झोत

सामान्य जनांचीं मनें करपून टाकूं लागले—

'ब्रह्म तेथें माया आणि बुवा तेथें बाया' हें पुरातन तत्त्व पुनः एकवार अविस्मरणीय रीतीनें लोकांच्या हृत्पटलावर कोरलें गेलें—

पण तेवढ्यांतच सास्वडकरबुवाचे ग्रह एकदम फिरले !

त्याचें असें झालें—

अजिंक्यतेचा अश्वमेध करण्याची महत्त्वाकांक्षा सास्वडकराच्या डोक्यांत थैमान घालूं लागली.

पण दिग्विजयाच्या ईर्षेनें त्यानें अनिर्बद्ध वेगानें पिटाळलेला आपल्या कीर्तीचा अश्व प्रत्यक्षांत मात्र लांब कानांचा गर्दभ ठरला —आणि कुणीं तरी तो मध्येंच पकडला.

'सोड माझा अश्व, नाहीं तर युद्धाला सिद्ध हो !' सास्वडकर-बुवानें युद्धाची आरोळी ठोकली.

'गोसावड्या, तुझं गाढव वाटेल त्याला लाथा मारू लागलं आहे तेव्हां त्याच्या तंगड्याच मोडून टाकतों.' एवढेंच उत्तर त्याला मिळालें.

––आणि सास्वडकरानें खरोखरच युद्ध पुकारलें.

पण त्याच्या कीर्तीच्या गर्दभाचींच मोजमापें सुरू झालीं.

त्याच्या 'रक्षक वीरां'ची एकामागून एक वासलात लागूं लागली.

गर्दभाला अश्व समजून त्याच्यावर आरोहण करण्याचा विक्रम करण्यासाठीं पुढें सरसावलेली सास्वडकरबुवाची शिष्या—

रासभाबरोबर तिची देखील शोभा होऊं लागली !

सास्वडकराचा उन्माद पार उतरला– आणि

'विसर्जिलीं मीं स्वप्नें सारीं
आशा लावियल्या माघारीं
'कीर्ती'च्या आतां बाजारीं
नुरला माझा संग...'

ह्या काव्यचरणांच्या शेवटीं— 'पण बाबा, आतां थांबव शिंग !'

असें धृपद जोडून, अगदीं जोगी रागांत सास्वडकर बुवा त्याचा करुणरस लोकांपुढें पिळूं लागला.

हल्ला करणाऱ्यानेंच रणांगणांतून पळ काढल्यावर युद्ध कसलें ?

सास्वडकराच्या ह्या फजितीमुळें अप्पास्वामींना मनस्वी आनंद झाला असेल नाहीं ?

साफ चूक !

प्रारंभीं प्रारंभीं तें युद्ध पाहतांना त्यांना गुदगुल्या होत होत्या ही गोष्ट खरीच—

पण— युद्ध ऐन रंगांत आल्यावर— सास्वडकरबुवाच्या कीर्तिरासभावर आरूढ झालेली त्याची शिष्या समरांगणांत उतरतांना पाहून—

अप्पास्वामींचा रक्तदाब एकदम वाढला— त्यांना भोवळ येऊं लागली !

आणि— पण पुढचें सर्वांनाच माहीत आहे !

सास्वडकराचा प्रश्न म्हणण्यासारखा उरला नसला तरी 'लग्न ही बाब वैयक्तिक स्वरूपाची आहे कीं सामाजिक ?' ह्या प्रश्नाचा विशिष्ट निर्णय लावून घेण्याची अवश्यकता मात्र अप्पास्वामींना तीव्रतेनें जाणवूं लागली.

पुण्यांतल्या त्यांच्या मठांत जी गडबड उडून राहिली होती असें मीं वर म्हटलें ती ह्याचबद्दलची होती—

अप्पास्वामींचा शिष्यशिरोमणी कुमार भेदक हा आपल्या बालबुद्धीप्रमाणें त्या धर्मनिर्णयपरिषदेची पूर्वतयारी करीत होता.

उदबत्त्या आणि धूप यांचा सुवास साऱ्या मठभर दरवळून राहिला होता.

वेगवेगळ्या 'पोझिस्' व वेगवेगळे 'मूड्स्' दाखविणारीं अप्पास्वामींचीं असंख्य छायाचित्रें भिंतींवर व्यवस्थितपणें टांगलेलीं होतीं व प्रत्येकाच्या खालीं त्या त्या प्रसंगाचें माहात्म्य विशद करणारी

श्वेतपत्रिका चिकटविलेली होती.

अप्पास्वामींचें सर्वांत अलिकडचें– प्रियशिष्येचें त्यांनीं यथाविधि पाणिग्रहण केल्यानंतरचें जोडप्याचें– छायाचित्र मठाच्या सभास्थानीं एका व्यासपीठावर शृंगारून ठेविलेलें होतें. त्या दांपत्यप्रतिमेला पुष्पमाला अडकवितांना कुमार भेदक आपला गुरुबंधु चिंचवडकर याला म्हणाला– 'तुझा रिपोर्ट तयार आहे ना? कंपोजला पाठवावा लागेल थोड्या वेळांत.'

'त्याची काळजी नको. आत्तां पाठवीत असलास तरी चालेल.'

इतक्यांत अप्पास्वामींचे दुसरे शिष्यवर कवि राधाकांत तळेगांवकर उपस्थित झाले.

'एवढा रिपोर्ट पाहा छापखान्यांत पाठवायच्या आधीं.' चिंचवडकरानें तो रिपोर्ट त्यांच्या हातीं देत म्हटलें.

कवि राधाकांतानें तो रिपोर्ट वाचून पाहिला आणि एकदोन किरकोळ सुधारणा करून परत चिंचवडकराकडे दिला. चिंचवडकरानें भेदकाकडे दिला आणि भेदकानें 'अर्जंट' असें वर लिहून पोऱ्याच्या हातीं छापखान्यांत पाठवून दिला.

'बाकी तूंच आजचा निमंत्रक आहेस हें बरं झालं. विवाहितांनींच ही परिषद् घडवून आणली असं कुणीही म्हणूं शकणार नाहीं आतां.' कवि राधाकांतानें कुमार भेदक याच्या पाठीवर थाप मारून हंसत हंसत म्हटलें.

'म्हणूनच तर असं केलं. नाहींपेक्षां प्राध्यापक कीर्तिलोभ्यांच्याच सहीची निमंत्रणपत्रिका काढायचा विचार होता पहिल्यांदा.' कुमार भेदक आपल्या दूरदर्शीपणाची चमक दाखवून म्हणाला. 'सास्वडकरबुवाला मार बसला तेव्हां लांबलांबून रडायला माणसं आणावीं लागलीं त्याला! आपलं कांहीं तसं नाहीं. यादींतलीं सगळीं माणसं तर येतीलच, पण मला भीती वाटतेय् कीं मठाची जागाच कमी पडेल कदाचित्.'

एवढ्यांत, कुणी सहकुटुंब तर कुणी सहपरिवार अशीं 'यादींतलीं माणसें' मठांत दाखल होऊं लागलीं. कुमार भेदक त्यांचें स्वागत करूं लागला.

एकशेंवीस इंच लांब आणि चौऱ्याऐशीं इंच रुंद असलेलें तें प्रचंड सभागृह अल्पावधींतच गच्च भरून गेलें.

प्रणयमूर्ति पंचशराच्या आरतीनें परिषदेला सुरुवात झाली. आरती आटोपल्यानंतर कुमार भेदक यानें प्रास्ताविक भाषण करून अध्यक्षपदासाठीं प्रा. कीर्तिलोभे यांचें नांव सुचविलें.

श्रीयुत परमाणु मुर्कुटे एम्. ए. यांनीं पंधरावीस मिनिटें प्रा. कीर्तिलोभ्यांवर स्तुतिसुमनांचा वर्षाव करून एकदांचे दुजोऱ्या-दाखलचे आपले 'चार शब्द' संपविले.

प्रा. कीर्तिलोभे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले व रिवाजाप्रमाणें त्यांनीं परिषदेच्या कार्याला आरंभ केला. कमालीचें गांभीर्य चेहऱ्या-वर ओढून ते म्हणाले—

'आजची आपली परिषद् म्हणजे खरोखर धर्मपरिषद् आहे असं म्हणण्यानें अतिशयोक्ती होणार नाहीं. अत्यंत महत्त्वाच्या, अत्यंत जिव्हाळ्याच्या, अत्यंत निकडीच्या, अत्यंत...ह्याच्या अशा एका प्रश्नाचा सांगोपांग ऊहापोह करून आपल्याला आपल्या समाजाच्या दृष्टीनें, प्रगतीच्या दृष्टीनें, सुधारणेच्या दृष्टीनें, समाज-धारणेच्या दृष्टीनें, धर्मसातत्याच्या दृष्टीनें, ह्याच्या दृष्टीनें आणि त्याच्या दृष्टीनें ...म्हणजे एकंदर सर्वच दृष्टींनीं 'विवाह ही बाब वैयक्तिक स्वरूपाची आहे कीं सामाजिक स्वरूपाची आहे?' या प्रश्नाचा महत्त्वाचा निर्णय करावयाचा आहे...'

'सभेंत कांहीं अधिकारी व्यक्ती आपापलीं मतें मांडणार आहेत. त्यांना पुरेसा अवसर मिळावा यासाठीं मी स्वतः आतां कांहीं विशेष बोलत नाहीं. शेवटीं चार शब्द बोलेन.' असें म्हणून अध्यक्षमहाराज खालीं बसले.

मग चर्चेला सुरुवात झाली.

एकामागून एक अशा वक्त्यांनीं– त्यांत दोन महिला होत्या– वेगवेगळ्या सुरांत 'विवाह ही वैयक्तिक बाब आहे– त्यांत इतर समाजानें पडूं नये' असें ठांसून सांगितलें.

आधींच ठरल्याप्रमाणें कवि राधाकांत तळेगांवकरानें विरोधी भूमिका स्वीकारून 'विवाह ही सामाजिक बाब आहे' असें अनेक लठ्ठ पुस्तकांतल्या उताऱ्यांवरून साधार दाखवून देण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला.

सौ. तळेगांवकरांनीं त्यांच्या भाषणाला पुष्टि दिली.

आणि पूर्वयोजनेनुसार प्रा. कीर्तिलोभे यांनीं कवि राधाकांत यांचें म्हणणें विद्वत्तापूर्ण भाषणानें– कुणीं आजवर कधीं ऐकलेलीं देखील नाहींत अशीं ग्रीक, रोमन, जर्मन, स्कँडिनेव्हियन, चिनी, जपानी, इतकींच काय, पण आफ्रिकन तत्त्वज्ञान्यांचीं नांवें आणि वचनें भराभर फेकून खोडून काढलें. 'आतां कुणाला ह्या बाबतींत शंका आहेत काय?' असा प्रश्न अखेरीस त्यांनीं सभेला विचारला.

'आपल्या उत्तरानें आमचं समाधान झालं आहे.' कवि राधाकांतानें गंभीरपणें सांगितलें आणि सौ. तळेगांवकरांनीं त्याच्या हाताला हात लावला.

इतक्यांत रिपोर्टाचीं प्रुफें घेऊन छापखान्यांतला पोऱ्या तेथें दाखल झाला.

कुमार भेदक यांनीं तीं प्रुफें हातांत घेऊन अध्यक्षांच्या परवानगीनें तो रिपोर्ट वाचून दाखविण्याला आरंभ केला.

'नीति-मंथन-मंडळ, पुणें, ह्या संस्थेच्या विद्यमानें, ता. २१-३-१९४३ ह्या दिवशीं होलिकोत्सवाच्या सुमुहूर्तावर, पर्वतीच्या पटांगणावर, 'लग्न ही बाब वैयक्तिक आहे कीं सामाजिक?' ह्या विषयावर निर्णय घेण्यासाठीं प्रचंड सभा भरविण्यांत आली. सभेस दहा हजारांवर श्रोतृसमुदाय उपस्थित होता. प्रा. कीर्तिलोभे यांनीं

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ७३८८५ दि: ...
क्रमांक १६७२ नोंद दि: २८-२-

अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर, लग्न ही वैयक्तिक बाब आहे अशा आशयाचीं अनेक स्त्री-पुरुष वक्त्यांचीं भाषणें झालीं. सौ. तरलाबाई वाह्यात्, कु. चंचला दिवटे एम्. ए., श्री. शंकरराव चिंचवडकर व विद्वन्मन्य श्री. परमाणु मुर्कुटे एम्. ए. यांनीं आपल्या अत्यंत विद्वत्तापूर्ण भाषणांनीं विवाहाचें वैयक्तिक स्वरूप सिद्ध करून दाखविलें. नंतर कवि राधाकांत तळेगांवकर यांनीं लग्न ही बाब सामाजिक महत्त्वाची आहे असें साधार प्रतिपादिलें. सौ. तळेगांवकर यांनीं त्यांना पुष्टि देणारें वक्तव्य केलें. त्यानंतर अध्यक्ष प्रा. कीर्तिलोभे यांनीं असंख्य, अधिकारयुक्त आधार दाखवून कवि तळेगांवकर यांचें म्हणणें खोडून काढलें. सभेच्या शेवटीं लग्न ही वैयक्तिक बाब आहे असें एकमतानें ठरविण्यांत आलें; आणि हें तत्त्व प्रत्यक्ष कृतींत उतरून दाखविण्याचें धैर्य दाखविल्याबद्दल प्रणयतीर्थाधिपति अप्पास्वामी यांचा गौरव करण्यांत आला...' रिपोर्ट वाचून कुमार भेदक खालीं बसले.

'या अहवालावरून आपल्या आजच्या परिषदेचा एकमुखी निर्णय आपल्याला कळलाच असेल !' अध्यक्षांनीं विचारलें.

सर्वांनीं टाळ्या वाजवून आपली संमति घोषित केली.

आभार-प्रदर्शनाची गोड कामगिरी बजावण्यासाठीं सौ. चिंचवडकर उभ्या राहिल्या. त्या म्हणाल्या—

'आजचा प्रसंग अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा असा आहे. लग्न ही बाब वैयक्तिक आहे, असा जो निर्णय आज घेण्यांत आला त्यामुळें आपल्या समाजाच्या प्रगतीच्या मार्गांतील एक मोठाच अडथळा नाहींसा होणार आहे. प्रणयतीर्थाधिपति अप्पास्वामी यांनीं जें उदाहरण घालून दिलं आहे त्याला आज आपणांसारख्या अधिकारी माणसांनीं पुष्टि दिली हें मोठंच कार्य झालं ही गोष्ट कुणालाही पटण्याजोगी आहे. अन्यायमूलक सामाजिक बंधनांमुळें समाजाचं जीवन खुरटून चाललं आहे हें आपण पाहतों. पण आतां स्वातं-

मराठी ग्रंथ संग्रहालय
६२१८

ज्याच्या चैतन्यपूर्ण वातावरणांत समाज हां हां म्हणतां प्रगत होईल यांत शंकाच नाहीं. अप्पास्वामींच्या अद्वितीय मोक्षमार्गाची-- अनंत अशा प्रणयसोपानाची महती जिला कळली नाहीं त्या स्त्रीला मी हतभागी समजतें. मला सांगायला आनंद वाटतो कीं, व्यक्ति-स्वातंत्र्याच्या आतां सुरू झालेल्या नवयुगांत भारभूत होऊन बस-लेलीं— गळफांसाप्रमाणें असह्य झालेलीं—वैवाहिक बंधनं तटातट् तोडून टाकण्यामध्यें महिलावर्ग आतां मुळींच मागें राहणार नाहीं. ही सभा होण्यापूर्वींच आमच्या महिलासमितीची देखील खास बैठक आजच भरली होती. पहिलीं वैवाहिक बंधनं तोडतां आलीं नाहींत तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करून, आपल्या मताप्रमाणें अनुरूप पुरुषाशीं नव्यानें संसार थाटण्याची प्रतिज्ञा आम्हीं सर्वांनीं केली आहे. अप्पा-स्वामींच्या पहिल्या कुटुंबाला हा मार्ग स्वीकारतां आला नसला तरी आम्हीं सुशिक्षित महिला धडाडीनें तो अनुसरणार आहोंत.'

'आमच्या बैठकींत मान्य झालेला ठराव मी आतां वाचून दाखवतें...'

"स्त्री-पुरुषांची समानता ही अप्पास्वामी करवीरकर यांची शिक-वण ह्या समितीला पूर्णत्वानें मान्य असून, ज्याप्रमाणें एका पुरुषाला व्यक्तिस्वातंत्र्याच्या आधारावर एकाच वेळीं अनेक विवाह करतां येतात तशीच मोकळीक स्त्रियांना देखील असणें न्यायाचें आहे." हा ठराव एकमतानें संमत केल्यावर त्याची अंमलबजावणी करण्या-साठीं पुढें नांवं दिलेल्या धैर्यशाली महिलांनीं आजपासून आपल्या प्रथम-पतींचा त्याग करण्याचं ठरवलं असून लौकरच नवे संसार उभारण्याचं निश्चित केलं आहे. ह्या नवीन उपक्रमांत धडाडीनें भाग घेण्यासाठीं— पहिलं नांव, आजच्या अध्यक्षांच्या पत्नी सौ. वेत्रवतीबाई कीर्तिलोभे ..."

अध्यक्षमहाराज आपल्या पत्नीकडे पाहतात— आणि दुसऱ्याच क्षणीं दोन्ही हातांनीं आपलें डोकें सांवरून धरतात.

'दुसऱ्या, सौ. तरलाबाई वाह्यात् ...' पण त्यांचे पतिराज उपस्थित नव्हते.

'तिसऱ्या, सौ. तळेगांवकर...' कवि राधाकांत अगदीं केविलवाण्या नजरेनें पत्नीकडे पाहूं लागले ...

'आणि मी— म्हणजे सौ. चिंचवडकर ...'

पण चिंचवडकरानें कुमार भेदकाच्या हातांतलीं रिपोर्टाचीं प्रुफें आणि मूळ हस्तलिखितें खसकन हिसकून घेतलीं व अप्पास्वामींच्या 'सप्रिया' तसबिरीपुढें लावलेल्या मेणवातीवर पेटवून दिलीं–

दुसऱ्याच क्षणीं होलिकोत्सवांतील गगनभेदी मंगलध्वनि मठासमोरच्या रस्त्यावर दुमदुमून गेला.

———

[वरील गोष्टींतलीं 'पात्रें' व घटना संपूर्णतया काल्पनिक आहेत. कारण ही नुसती 'माया' आहे. त्यांत 'ब्रह्मदर्शन' होईलच असा निर्वाळा लेखकाला देतां येत नाहीं.]

## सत्तेचाळिसावी मुलगी ! : : ६

### मालिनीची रोजनिशी

अमळनेर

ता. १९ डिसेंबर १९४२

...पुन्हा आली पीडा ! आज चार वर्षं चालले आहेत हे धिंडवडे. झालं इतकं पुरे नाहीं का ? तरी अण्णांची चिकाटी जबरदस्त खरी. बाकी ते तरी काय करतील ? आतां वीस वर्षं व्हायला आलीं मला. कुणाचाही नकार आला– आणि आतां-पर्यंत एकदोन स्थळं सोडून नकारच आले– म्हणजे त्यांचा चेहरा असा होतो कीं...मला मात्र जीव नकोसा होऊन जातो. काय करावं अन् काय नाहीं– असं वाटतं कीं...पण नको. मी कुरूप खास नाहीं. खूप चांगली गोरी नाहीं इतकंच. खान-देशची ही असली कडक हवा. युरोपियन दिखील चार वर्षांनीं आमच्यासारखे दिसायला लागायचे. माझा तर जन्म इथें गेलेला ...आणि अण्णांना काय वाटतं कुणाला ठाऊक. त्यांना आपल्या तोलाचं, अगदीं श्रीमंताचं स्थळ हवंय् माझ्यासाठीं. तें कधीं मिळायचंय् कुणाला ठाऊक ! मला मात्र ह्या नाटकाचा वीट आलाय् अगदीं. पण अण्णांना सांगायचं कुणीं ? आणि

आईला दिखील एवढं कळूं नये का? बाकी ती दिखील श्रीमंताचीच लेक, तेव्हां श्रीमंतीबाहेर सद्गुण असूं शकेल हें तिच्या स्वप्नांत तरी असायला हवं...जाऊं द्या! चल म्हटलं कीं निघायचं, बैस म्हटलं कीं बसायचं, उठ म्हटलं कीं उठायचं, वाच म्हटलं कीं वाचून दाखवायचं...हं, मालिनीबाई, करा मन खंबीर! खरंच, जनावरांचा बाजार तरी बरा. त्या बिचाऱ्यांना मान आणि मन दोन्ही नसतात...अशी चीड येते ...पण करायचं काय?

---

पुणें, ता. २१ डिसेंबर १९४२

...लग्नाचं काय व्हायचं असेल तें होवो. खरंच, अण्णा किती पक्के आहेत! सुशिलेच्या घरीं आपल्याला उतरायचं आहे याचा पत्ता दिखील लागूं दिला नाहीं मला त्यांनीं. आज चार वर्षांनीं तिची अन् माझी पुनः भेट झाली. पण खरंच– किती प्रेमळ मुलगी आहे! अमळनेरला आम्ही एकाच शाळेंत तीन वर्षं बरोबरीनं शिकत होतों– आम्ही तिच्यापेक्षां श्रीमंत, पण माझ्या इतर श्रीमंत मैत्रिणींपेक्षां मला तीच अधिक आवडत असे– आणि आतां मला अभिमानच वाटतो तिच्याबद्दल. ती मॅट्रिक झालीय् आणि पहिल्या वर्षाला जाते कॉलेजांत– पण पूर्वीचा साधेपणा कांहीं गेला नाहीं. हो! तिच्याकडे पाहिलं कीं मन कसं भारून जातं अगदीं. किती सुरेख आहे, पण गर्व नाहीं रूपाचा. इथं त्यांच्या घरांत तरी किती मोकळं अन् खेळीमेळीचं वातावरण. जागा भाड्याचीच पण किती व्यवस्थितपणा राखलाय् घरांत...अन् तिचा तो चुलत भाऊ. चुकून मी त्याच्या खोलींत गेलें...मला एकदम संकोच वाटला, पण त्यानें मात्र मला परकेपणा जाणवूं दिला नाहीं...अन् तरी देखील वागणं किती मर्यादशील! आणि त्यानें जेव्हां अगदीं स्थिर दृष्टीनें

माझ्याकडे पाहिलं, तेव्हां मला जरा चमत्कारिक वाटलं...पण त्याच्या दृष्टींत चोरटेपणा नव्हता, चटोरपणा नव्हता कीं कांहीं देखील विचित्रपणा नव्हता. असला अनुभव मला पूर्वी नव्हता म्हणून, मला वाटतं, मी गोंधळून गेलें...आणि सुशीलेनं मला सांगितलं कीं तो चित्रकार आहे अन् त्याच्या मतें मी अगदीं रेखीव चेहऱ्याची अन् बांधेसूद आहें म्हणून! मलाही वाटतं कीं आहेंच मी तशी! श्रीमंतांच्या शाळिग्रामाला संगमरवरी पुतळी पाहिजेना पण! मुलींच्या इच्छेला कसला आला आहे मान? ...जाऊंद्या! मालिनीबाई, एका मैत्रिणीच्या चुलत भावानं सुरेख म्हटलं म्हणून तुला पाहायला येणारे तसंच म्हणतील असा विश्वास नाहीं बरं! उगाच आभाळांत उडायचं तुला कारण नाहीं. आतां अण्णा काय कार्यक्रम ठरवून येतात तें पाहायचं. रायबहादुरांचा मुलगा चांगला आहे म्हणतात, पण त्याची आई म्हणे मोठं प्रस्थच आहे. तिच्या बडेजावी स्वभावामुळं आणि हुकूमशाही वृत्तीमुळं जवळपास खूपच कीर्ति मिळवलीय् तिनं. तिला म्हणे हज्जारांतली सुस्वरूप मुलगी हवीय् सून म्हणून... अन् पत्रिका आहेच शिवाय! इतक्या ठिकाणचा अनुभव असून अण्णा कां भलत्या भरीला पडताहेत? का मुली सांगून यायच्या बंद झाल्यामुळं रावबहादुरीणबाईंच्या अपेक्षा अन् अटी वसरायला लागल्या आहेत आतां? अन् मुलाला कांहींच का विचार नाहीं? बाकी सुशीला तर म्हणत होतीच कीं बाईसाहेबांच्यापुढं त्यांच्या नवऱ्याचं अन् मुलाचं कांहींसुद्धां चालत नाहीं म्हणून! छे, इथं कसलं जमणार आहे? अन् चुकून जमलंच तर...'हज्जारांतली मुलगी' नाहीं म्हणून छळील कीं ती महामाया मला!...

---

पुणें, ता. २२ डिसेंबर १९४२

...झाली एकदांची वधूपरीक्षा !...छे, झाली कसली? एक पेपर झालाय् फक्त. अजून रावबहादुरीणबाई, त्यांचे यजमान, मुलाच्या मित्रमंडळीसह पुन्हा एकदां मुलगा...जीव घेणाऱ्या ह्या नाटकाचे किती प्रवेश आणि अंक शिल्लक आहेत कुणाला माहीत? यापेक्षां स्पष्ट नकार कां देत नाहींत? मी गोरी नाहीं हें काय सांगायला हवं?...स्वच्छ सांगा म्हणावं, मुलगी मुलापेक्षां गोरी नाहीं! अन् व्हा मोकळे. आणि अण्णांची तरी काय रीत पाहा...गेल्यावर्षींपेक्षां यंदा हुंड्याचा आंकडा त्यांनी आपण होऊनच एक हजारानी वाढवलाय्; आणि आजच्या त्यांच्या बोलण्यावरून ह्या स्थळासाठीं आणखिन् देखील द्यायला तयार होतील. रावबहादुरांचा तो बंगला भरलाय् डोळ्यांत...शिवाय मोटार! सुशीलेला मीं सगळं सांगितलं तेव्हां ती गंभीर कां बरं झाली? आतां आली फिरून कीं विचारतेंच तिला.

---

पुणें, ता. २३ डिसेंबर १९४२

—एकंदरींत रावबहादुरांचं स्थळ म्हणजे भारीच प्रकरण दिसतं आहे! काल त्यांच्या चिरंजीवांनीं मला पाहिली. प्रश्न विचारले नि वाचून पण घेतलं. आज मातोश्री आल्या पाहायला. कालच आल्या असत्या तर कुठें बिघडलं असतं? पण सुशीलेनं सांगितलंन् तसंच दिसतं आहे. पत्रिका हें जुळते कीं नाहीं हें पाहायच्या आधींच कां मुली पाहतात? बरोबर आहे, मुलगी मनाजोगती नसली किंवा मुलगी पसंत असून हुंड्याचं जमत नसलं कीं पत्रिका जुळत नाहीं म्हणायचं! आणि मुलाची पत्रिका कां नाहीं देत? कीं वरपक्षाचाच तेवढा हा खास अधिकार आहे? काय दिमाख, केवढा डामडौल रावबहादुरीणबाईचा! 'मुलगी चांगलीच पाहिजे' ना? मग मला द्या कीं

नकार. कीं अण्णांनीं हुंड्याची रक्कम बोलून मोह पाडलाय् त्यांना ? तसंही असेल कदाचित्...सुशीला म्हणते त्यावरून ह्यांचं उत्तर यायलाच महिनाभर जायचा. आणि वर म्हणे 'मोठं स्थळ हवं तर वाट नको का पाहायला ?'. स्वतःबद्दल काय ही घमेंड. रावबहादुरीण बाईंना पाहिल्यापासूनच, कां कोण जाणे, माझ्या मनांत त्यांच्याविषयीं अढीच बसून गेली आहे...उद्यां रावबहाद्दूर येणार आहेत पाह्यला– आणि परवां चार मित्रांना घेऊन पुनः त्यांचे चिरंजीव...आणि शेवटीं ??...यापेक्षां... पण नकोच !

---

## सुशीलेची रोजनिशी

पुणें, ता. २५।१२।४२

...मालिनीच्या वधूपरीक्षेचा शेवटचा अंक आज संपला. आमचा समाज म्हणे आतां फार सुधारला आहे. प्रणयकथांचा आणि तसल्याच कादंबऱ्यांचा नुसता पाऊस पडतो आहे. पण ह्या केवळ आकाशांतल्या भराऱ्या नाहींत का ? उपवर मुलींच्या बाबतींत नुसती माणुसकी दाखवायला देखील समाज तयार नाहीं. वाटेल त्या शेंबड्या पोरानं बापाच्या श्रीमंतीच्या जोरावर, ज्यांच्याशीं बोलण्याची दिखील आपली लायकी नाहीं अशा मुलींची दुकानांतल्या खेळण्यांप्रमाणें परीक्षा करण्याचा आव आणावा, त्यांना वाटतील ते प्रश्न विचारावे, स्वतःला देखील ज्यांचा अर्थ कळण्याची अक्कल नाहीं अशीं पुस्तकं वाचून दाखवायला सांगावं. काय ही शोभा चालली आहे ! मालिनीचं डोकं आज चार वर्षं असला थोरांचा पोरखेळ चालला असतांना देखील ठिकाणावर राहिलं आहे याचंच नवल वाटतं मला. मुलीला नवरा कसला हवा याला महत्त्व नाहीं. आईबापांना श्रीमंत जांवई– अर्थात् स्वतः मिळवतो म्हणून नव्हे, तर

श्रीमंताचा लेक म्हणून– मिळाला कीं झालं. आर्थिक परिस्थितीचं कांटेरी कुंपण ओलांडतां आलंच तर पुढं गोत्र-पत्रिकांचा चक्रव्यूह आहेच. आम्ही म्हणे 'वरचे समाज–' ! नांव मोठं नि लक्षण खोटं, तसंच नाहीं का हें ? अशा साऱ्या मर्यादा पाळून जीव हैराण झाला तर नवल नाहीं. आणि अशा उद्विग्नतेंत एकाद्या मुलीनं साऱ्यांनाच झुगारून कांहीं कमीजास्त केलं, अगदीं नाइलाज म्हणून– तर तिला दोष कां द्यायचा ?...रावबहादुरांच्याकडचा 'नकार' मला आधींच माहीत होता. पण त्यांनीं तो पहिल्याच दिवशीं दिला असता, वधूपरीक्षेचे पुढचे तीन फार्स केले नसते, तर काय बिघडलं असतं ? पण मग मोठेपणा तो काय राहिला ?...तें कांहीं नाहीं. यांची चांगली खोड मोडली पाहिजे...नाहीं तरी माझ्यासाठीं रावबहादुरीण बाईनीं अप्रत्यक्ष रीतीनं सुचविलंच होतं...ठीक आहे. पण मालिनीचं काय आतां ? हो ! तिला पण ठेवून घेतें आमच्याकडे आणखी पंधरा दिवस. तिच्या अण्णांच्याही डोळ्यांत अंजन घातलं पाहिजे एकदां...

---

## मालिनीची रोजनिशी

पुणें, ता. २९ डिसेंबर १९४२

...इथें आल्यापासून पाहातें तों सारंच कांहीं अघटित होतं आहे. माझी इच्छा नसतांना सुद्धां अण्णांनीं रावबहादुरांच्या स्थळासाठीं कांहीं देखील करायचं बाकी ठेवलं नाहीं. चार दिवस मला पाहण्याचे फार्स चालले होते तेव्हां मला सुद्धां वाटलं कीं खात्रीनंच नकार येईल असं नाहीं. सुशीला म्हणत होती त्याप्रमाणं इतक्यांत त्यांचं उत्तरच येणं संभवनीय नव्हतं. पण काय झालं कुणाला माहीत– कीं अण्णांनींच निकड लावली ! पण 'नाहीं' म्हणून कां होईना, तरी उत्तर मात्र लौंच दिलं

रावब्रहादुरीण बाईंनीं. माझ्या आधीं पाहिलेल्या बऱ्याच मुलीं-च्या बाबतींत अजून कांहीं कळवलं नाहीं म्हणे...'मोठं स्थळ हवं तर वाट पाह्यला हवीच.' असंच त्या सांगतात म्हणे कुणीं फारच निकड लावली तर. मोठेपणाच्या काय ह्या कल्पना! सुशीला म्हणते कीं अलिकडे जवळपासच्या मुली सांगून जाय-च्याच बंद झाल्या आहेत. कां नाहीं होणार? सगळ्याच मुलींचे बाप आमच्या अण्णांच्यासारखे कसे असतील?...पण झालं हें एका अर्थीं बरं झालं. अण्णांना वाईट वाटलं...वाटायचंच. पण मला मात्र बरं वाटलं ह्या नकारामुळं...पण अण्णा मला सुशीलेकडे पंधरा दिवस ठेवायला कसे तयार झाले याचं मात्र राहून राहून नवल वाटतंय् मला. पुण्यांत नकार मिळाला कीं नगरला, नगरची आशा सुटली कीं आणखी कुठें तरी, असं चालायचं वास्तविक...माझं मन घट्ट, अगदीं निगरगट्ट झालं आहे आतां...तरी देखील 'नकार' कळला कीं अण्णांची धड-पण आणि निराशा डोळ्यांपुढं उभीं राहतात,– आणि माझ्या डोळ्यांना पाणी येतं. कालचीच गोष्ट पाहाना. सुशीलेला माझ्या पेक्षांही वाईट वाटलं...खरं म्हणजे चिडलीच ती...आज अण्णा अमळनेरला गेले. आणि मी? पण खरं सांगायचं तर निदान पंधरवडा तरी वधूपरीक्षेच्या त्रासाशिवाय स्वस्थपणानं घालवितां येईल. पण सुशीला कसल्या तरी बेतांत गुंतलेली दिसतेय्. मला मोकळेपणानीं सांगायला अजून तयार नाहीं ती. आणि तिचा तो चुलत भाऊ...त्याचीं आणि सुशीलेचीं सारखीं खलबतं चाललीं आहेत कालपासून. तो माझ्याशीं आतां जरा अधिक मोकळेपणानं बोलूं लागला आहे. पण छे, उगाच माझ्या मनांत कांहीं तरीच आलं. तरी पण आज बाहेर जातांना असा मिस्किल-पणानं कां हंसला माझ्याकडे पाहून? सुशीलेलाच विचारणार आहें मी...

———

## सुशीलेची रोजनिशी

ता. ३० डिसेंबर १९४२

माधवनं तर पहिला प्रवेश चांगलाच रंगवलेला दिसतो आहे. बाकी त्याला तें काम फारसं कठीण पडायचं कारणच नव्हतं. मी चांगली आहें दिसायला, आणि म्हणून मला जवळजवळ मागणीच घातली होती रावबहादुरीणबाईंनीं. पण नुसती चांगली दिसून नाहीं भागायचं...खूप हुंडा देण्याइतकी श्रीमंत असायला पाहिजे. कांहीं हरकत नाहीं. मामा उद्यां येतील...उद्यांच पाहायला या बरं रावबहादुरीणबाई ! अगदीं लागेल तितके वेळ वेगवेगळया हप्त्यांनीं या पाहायला. म्हणे 'चांगली मुलगी असली तर अगदीं गरिबाची देखील करून घेऊं.' केवढं औदार्य ! मग आपली मुलगी द्या कीं गरिबींतल्या, निदान सामान्य स्थितींतल्या, मुलाला. काय दांभिकपणा आहे तरी. गरिबाची मुलगी श्रीमंताच्या घरीं पडली कीं ती श्रीमंतांतच सामील व्हायची. माहेरचा संबंध फक्त अपमान करण्यापुरता, उणीं काढून त्यांच्या गरिबीची जाणीव देत राहण्यापुरता. मी म्हणतें, मग निदान दांभिकपणा तरी नको. गरिबांच्या सुंदर मुलीला काय तिच्याच स्थितींतला अनुरूप वर मिळणार नाहीं ? पण ऐश्वर्याचा, पैशाचा मोह पडतो ना ? 'श्रीमंतांची दौलत दुसऱ्यांचं लुबाडून मिळविलेली' म्हणून आक्रोश करणारे बाप आपल्याच रक्तामासाचं कन्याधन जेव्हां श्रीमंतांना, केवळ लोभाला—छे, नुसत्या आशेला —बळी पडून लुबाडूं देतात तेव्हां त्यांना काय म्हणायचं ? अण्णासाहेब आज चार वर्षं श्रीमंताचीं स्थळं पाहाताहेत. पण त्यांनीं सामान्य स्थितींतलाच पण उत्साही आणि आत्मविश्वास असलेला मुलगा पाहून मालिनीचं लग्न करायचा विचार केला असता तर केव्हांच ते मोकळे झाले असते. श्रीमंताच्या स्थळासाठीं हुंडा द्यायला हवी तेवढी रक्कम त्यांनीं जर एखाद्या लायक

मुलाला दिली तर तो त्या भांडवलाच्या आणि आपल्या उद्यो-
गाच्या बळावर केव्हांच पुढें येईल. पण जिथं पैशाची खरी
जरूरी आहे तिथं तो दिला तर आर्यसंस्कृति, व्यवहार...सारं
रसातळाला जाईल ना! मुलीला श्रीमंताच्या घरीं दिली कीं
संपलं आपलं कर्तव्य, हीच जिथें भावना, तिथें असले विचार
सुचणार आणि पटणार तरी कसे? विवाह म्हणे 'धार्मिक विधि'
आहे. आत्मवंचनाच नाहीं का ही? सरळ सरळ नफ्यातोट्याचं
गणित आहे हें; आणि तें जमवण्यासाठीं पत्रिकेपासून साऱ्या
गोष्टींचा बाजारी सरंजाम जमवायचा. तरी वर आहेच 'धर्म.'
मालिनीसारखी धडधाकट, सुस्वभावी, नाकींडोळीं नीटस,
शरिरानें बांधेसूद अशी मुलगी केवळ श्रीमंताच्या, कुणींतरी
केव्हांतरी जमवून ठेवलेल्या दौलतीवर 'वेळ पडली तर' बसून
खातां आलं पाहिजे, अशाच घरीं देण्यासाठीं चार वर्षं दारोदार
फिरवली जाते आहे. लग्न झालं कीं मुलगी माहेराला अंतरली—
जिला आधाराची खरी आवश्यकता तिचाच आधार तोडून
टाकायचा. छे, पण 'धर्म' आहे हा! मग फिरा म्हणावं असेच
दारोदार! श्रीमंतीच्या सुवासानेंच पोट भरतं.. गरिबींतल्या
गुणांना किंमत नाहीं...पण.. उद्यां मला रावबहादुरांचे चिरं-
जीव पाहायला यायचे आहेत नाहीं का? या म्हणावं. मी देखील
पाहून घेतें.

पण मालिनीचं पुढें काय?... असंच केलं पाहिजे. पण
आधीं तिचं मन अजमावलं पाहिजे...बोलून चालून श्रीमंताची
मुलगी आहे ती....

---

## मालिनीची रोजनिशी

पुणें, ता. ३१ डिसेंबर १९४३

सुशीला जितकी साधी अन् सरळ आहे तितकीच धूर्त आणि

धाडशी पण आहे. रावबहादुरांचे चिरंजीव आज तिला पाहायला आले तेव्हां माझा गैरसमजच झाला तिच्याविषयीं....पण, संध्याकाळीं मला विश्वासांत घेऊन तिनें आपला बेत सांगितला तेव्हां मी सर्दच झालें. इतका धीटपणा तिच्या अंगीं कुठून आला ? चार वर्षें माझी फरवड चालली आहे. अगदींच असह्य झालं कीं मी मुकाट्यानें अगदीं एकटीच रडून मनाचा भार हलका करण्याचा यत्न करतें. यापेक्षां मीं अधिक काय केलं, आणि करूं शकणार ? उद्वेगानें मनांत वाटतील तसले भयंकर विचार येतात—पण त्यामुळें मन मात्र अधिकच दुबळं बनतं. सुशीलेइतकं धैर्य माझ्या अंगीं नाहीं...पण म्हणूनच मला तिचं अधिकच कौतुक वाटतं. रावबहादुरीणबाई तिच्या रूपावर आधींच भाळलेल्या आहेत. आतां पाहूं या काय गंमत होते ती. उद्यां त्या यायच्या आहेत सुशीलेला पाहायला...आणि चार वेळांच कां, त्याहीपेक्षां अधिक वेळां तिला पाहण्याचा फार्स सुशीला आपण होऊन करून घेणार आहे...पण माझं काय ? नवऱ्याच्या बाबतींत माझ्या अपेक्षा काय असं मला सुशीला विचारीत होती. मी काय सांगणार ? चांगला असला म्हणजे झालं. पण मग तिनें ज्या गोष्टी मला सुनावल्या त्या ऐकून मात्र माझे डोळे उघडले. आमच्या दृष्टीचा एकांगीपणा आणि आंधळा स्वार्थीपणा तिनें स्वच्छ दाखवून दिला. खरंच श्रीमंतीचा हव्यास आम्हीं धरला नसता तर आम्हाला इतकीं वर्षं कशाला तिष्ठावं अन् भटकावं लागलं असतं ? पण अण्णांना हें कसं आणि कुणीं पटवून द्यायचं ? तेवढं धैर्य मला होईल का ?... सुशीला ह्या बाबतींत मला साह्य करील का ? तिचं बोलणं ऐकल्यापासून मनाला स्वस्थपणा म्हणून लाभत नाहीं...तसं पाहिलं तर जन्माचा जोडीदार चांगला मिळणं ही नशिबाचीच गोष्ट आहे. तरी पण खोट्या कल्पनांनीं श्रीमंतीच्या मृग-

जळामागेंच आम्ही धांवत नव्हतों का?...काय करावं तेंच सुचत नाहीं. सुशीलाच मला मार्ग दाखवील असा मला विश्वास वाटतो. तिलाच मी विचारणार आहें....

---

पुणें, ता. १ जानेवारी १९४३

...व्यवहाराच्या नव्या वर्षाला आज आरंभ झाला. माझ्या आयुष्याचं भवितव्य ज्यावर अवलंबून राहील असा एक महत्त्वाचा निर्णय मला आज करायचा आहे. लग्नाची विवंचनाच काय ती आजपर्यंत मला त्रास देत होती. पण जबाबदारीचं ओझं अण्णांच्याच शिरावर असल्यामुळें त्या बाबतींत तरी मी निर्धास्त होतें. तें ओझं मीं स्वतःच्या शिरावर घ्यायचं ठरवलं तर...मला भीति वाटते. दुसऱ्यावर अवलंबून राहायची संवय आजवरची, त्यामुळें मन कसं भांबावून गेलं आहे. सुशीला अविचारानं कांहीं देखील करणार नाहीं. पण, तिच्यांत आणि माझ्यांत फार अंतर आहे. अपरिचित तरुणाशीं नुसतं बोलायचं म्हटलं तरी मला भीति आणि लाज वाटते. सुशीला म्हणते, माझी तयारी असली तर तिच्या माहितींतला एक चांगला अन् मिळवता मुलगा आहे. तिचा चुलत भाऊ– माधवच– नसेल ना तो? तोच असला तर...माझं मन आतांच कसं बावरून गेलं आहे. नुसतं 'हो' म्हणायलासुद्धां शब्द निघेल का माझ्या तोंडून? पण त्याला तरी मी पसंत पडेन का? तो किती चांगला, विद्वान् आणि रसिक आहे...त्याच्यापुढें मी?...खरंच त्याच्या विषयीं सुशीला म्हणत असली तर काय उत्तर देऊं मी? पण तो नव्हता का म्हणाला कीं मी दिसायला चांगली आहें म्हणून ...झालं. पुनः लागलें मी वाहायला. पण मला मन खंबीर केलंच पाहिजे. सुशीलेसारखी मैत्रीण असतांना मला कशाला हवं

घाबरायला ? कोण मुलगा आहे तें तरी कळूं द्या आधीं...नाहीं-तर मलाच उतावळी म्हणायची ती... .

---

## सुशीलेची रोजनिशी

पुणें ता. ४ जानेवारी १९४३

माझ्या वधूपरीक्षेचे सारे अंक तर पार पडले. मामा येतील कीं नाहीं याची मला खात्री नव्हती, पण ते आले एवढंच नव्हे, तर त्यांनीं श्रीमंत बाबासाहेबांची भूमिका देखील यशस्वी रीतीनें पार पडली. रावबहादुरांच्या ज्योतिष्यानें पत्रिका देखील सोळा आणे जुळवून टाकल्या. आमच्या 'होऊं पाहणाऱ्या' सासूबाई मुहूर्ताची चौकशी करायला लागल्या आहेत तेव्हां आतां राहिलं आहे फक्त आमच्याचकडून. पण आतांच माझ्या नाटकाला खरा रंग चढणार आहे. उद्यां मामा नवऱ्यामुलाला पाहण्यासाठीं म्हणून जायचे आहेत. परवां आई आपल्या माहितींच्या दोघी बायकांना घेऊन रावबहादुरांच्या घरांतलं वातावरण वगैरे पाहून येणार आहे.— रावबहादुरीणबाईंना आपल्या श्रीमंतीचं प्रदर्शन करायला तेवढीच संधि !...मी काय करूं ? हो, माझ्या चारदोन मैत्रिणींना दाखवायला म्हणून 'नवरोबां'ना घेतें एकदां बोलावून. कां नको ? सांगून आलेल्या प्रत्येक मुलीला असंच छळलं त्यांनीं...अगदीं पुरती परतफेड करून घेणार आहें मी. हुंड्याची मोठी रक्कम बोलून मामांनीं आधींच त्यांना मारून टाकलं आहे, तेव्हां आतां भ्यायचं कारण नाहीं...कांहीं हरकत नाहीं. असंच झालं पाहिजे...आणि मग ? पाहात राहा म्हणावं गंमत.

पण मालिनीच्या बाबतींत मी करतें आहें त्यांत मी चुकत तर नाहीं ना ? आतां ती चांगलीच तयार झाली आहे. माधवच्या 'कलात्मक' दृष्टींत तर ती पहिल्याच दिवशीं भरली. पण तिच्या

स्वभावाची पारख करायला त्याला सवड मिळाली हें बरं झालं. व्यवहार आहे हा. ह्यांत काव्य आणि प्रेम हवींतर येतील मागाहून. वामनराव जोश्यांनीं म्हटल्याप्रमाणं 'सहवासानं बहुधा प्रेम उत्पन्न होतंच.' दोघांनींही आपापल्या रीतीनें लग्नाला संमति दिली आहे. प्रश्न राहिला तिच्या अण्णांचा. चार वर्षांच्या अनुभवानें ते खासच शहाणे झाले असतील. योग्य रीतीनं त्यांना विचारलं तर नाहीं थोडेच म्हणणार आहेत...आणि बसलेच अडून, तर? मालिनी चांगली वीस वर्षांची झाली आहे अन् दोन तासांत शास्त्रोक्त रीतीनं लग्न उरकून टाकतां येतं. पण अशी वेळ खचित येणार नाहीं. अण्णांना माधवसारखा जांवई मिळाला तर आनंदच वाटेल. कांहींहि असो; त्यांना सरळ पत्र पाठवून विचारायचं– लिहायचं कीं मुलीला मुलगा पसंत आहे, लग्नाच्या तयारींत निघून या. अडचण असली तर तारेनं कळवा. पण जर कांहीं संशय वाटला तर...तर? सरळ चढवतें दोघांनाही बोहल्यावर!

---

## मालिनीची रोजनिशी

पुणें, ता. ५ जानेवारी १९४३

...माझ्या दृष्टीनें माझा प्रश्न सुटला आहे. लग्नासारख्या विषयाबद्दल सुशीलेजवळ मी जितक्या मोकळेपणानं बोलूं शकलें तितकं प्रत्यक्ष आईजवळ देखील मला बोलतां आलं नाहीं. माझ्या हिताच्या दृष्टीनं तिनं दोन्ही बाजूंनीं मला विचार करायला लावलंन. समवयस्क मैत्रीण म्हणूनच ती माझ्या भावनांशीं समरस होऊं शकली. मला वीस वर्षं झालीं. माझं हितानहित पाहण्याची पात्रता आतां माझ्यामध्यें असायला नको का? पण ही जाणीव सुद्धां सुशीलेमुळंच मला झाली. आणि मीं आतां ठरवलं आहे कीं पुनः पूर्वीचंच नाटक करीत राहायचं नाहीं.

एकदां वाटतं कीं आईला पत्र लिहून सारं कळवून टाकावं. पण पुनः भीति वाटते कीं जर तिनें आणि अण्णांनीं याचा भलता अर्थ केला, तर काय होईल ? सुशीला आपल्या मामांच्याकडून अण्णांना पत्र लिहून त्यांची संमति मिळवायचा प्रयत्न करणार आहे. त्यांना यश आलं तर चांगलंच. माधव कोणत्या दृष्टीनं कमी आहे ? घरची मोठी दौलत नसली तरी आज चांगला मिळवता आहे. त्याला मिळतं तेवढ्यांत आम्ही सुखानं आणि समाधानानं संसार खासच करूं. त्याच्याविषयीं, कां तें मला नाहीं कळत, पण मला विश्वास वाटतो. त्याच्या त्या निश्चयी, शांत आणि आनंदी मुद्रेकडे पाहिलं कीं कसं समाधान वाटतं. श्रीमंतीतलं सौख्य मीं पाहिलं आहे. माझ्या पुष्कळ मैत्रिणी अगदीं संपत्तींत लोळताहेत पण त्यांना खरं सुख लाभत असेलच असं मला मुळींच नाहीं वाटत. उलट, कांहींना तर त्यांच्या घरीं पोतेऱ्याइतकी देखील किंमत नाहीं .. 'अनुरूपता आणि अनुकूलता नसेल तर ब्राह्मणांनीं कितीहि अक्षता डोक्यावर टाकल्या, होमाग्नीच्या धुरानें डोळे अगदीं लाल झाले, तरी त्याला विवाह म्हणतां येणार नाहीं. अगम्यगमनाची ती कायदेशीर परवानगी एवढाच त्याचा अर्थ.' किती अर्थ भरलेला आहे ह्या वाक्यांत ! काय वाटेल तें होवो. माझा निश्चय ठरला आहे. आईवडिलांनीं माझ्या इच्छेला मान दिला तर ठीक, नाहीं तर मी जगांत पोरकी आहें असंच समजेन...अगदीं, माझी निवड चुकली, माझ्या आयुष्याचा मींच नाश केला असं झालं तरी त्यांत मला वाईट वाटायचं नाहीं. गोत्रपत्रिका शंभर टक्के जुळून आणि आईबापांच्याच निवडीनें झालेल्या लग्नांचे हृदयद्रावक शेवट होतच नाहींत का कधीं ? कांहीं हरकत नाहीं ...व्हायचं असेल तें होईल. मी भलत्या भावनांना बळी पडून कांहीं मनाचा निश्चय केलेला नाहीं. अगदीं पूर्ण विचार करूनच

काय तें ठरवलं आहे. आतां मला माघार घेणं शक्यच नाहीं... अयाऽई, अंग नि डोकं किती तापलं आहे माझं ! पण मनाला आतां समाधान वाटतं आहे. कधींहि न संपणाऱ्या वधूपरीक्षेंतून सुटलें आहें मी आतां...माझी आई यावेळीं जवळ असती तर तिच्या कुशींत डोकं लपवून रडून घेतलं असतं मीं. खरंच मला आनंद झाला आहे, पण तो आनंद अश्रूंच्या रूपानं बाहेर पडूं पाहतो आहे. माझी बाल्यावस्था आज खरी संपली. ह्या चार दिवसांत किती फरक झाला आहे माझ्यांत ! आई...तुझी सारखी आठवण येतीय् ग आज. पण तूं माझ्यावर रागावणार नाहींस ना ?...

---

## सुशीलेची रोजनिशी

पुणें ता. ९ जानेवारी १९४३

...आज मला किती समाधान वाटतं आहे ! माझे सारे बेत अगदीं सोळा आणे तडीला गेले आहेत. मामांचं आणि माधवचं साह्य मिळालं नसतं तर मी एकटी काय करणार होतें ? मालिनीची वधूपरीक्षा– ते सारे सोहळे– मीं डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिले म्हणूनच असली विचित्र कल्पना मला सुचली. सुक्याबरोबर ओलं देखील जळून जातं तसा प्रकार कांहीं माणसांच्या– रावबहादुरांच्या चिरंजीवांच्या–बाबतींत झाला असेल हें खरं. पण माझा इलाज नाहीं त्या गोष्टीला. आईनें वाटेल तें सांगितलं तरी पदवीधर, सुशिक्षित म्हणवणाऱ्या मुलांना स्वतःची म्हणून अक्कल नको का थोडी तरी ? गेल्या दोन वर्षांत पंचेचाळीस मुली पाहिल्या म्हणे त्यानं. त्याच्या आईला त्यांतच मोठेपणा वाटतो. रावबहादूर काय ? त्यांना जवळ जवळ अस्तित्वच नाहीं घरांत म्हटलं तरी चालेल. पण त्याला इतरांनीं काय करावं ? एका दृष्टीनं झालं हें छानच् झालं. साऱ्यांचेच डोळे उघडतील. वर-

परीक्षेचं नाटक मीं अगदीं सात अंकी करून टाकलं. आणि आतां माझा नकार कळल्यावर त्या नाटकाची चांगलीच ट्रॅजिडी होणार आहे. मुली म्हणजे काय वाटलं ह्यांना ? 'तुमच्यापेक्षां अधिक चांगलं स्थळ मिळाल्यामुळं तुम्हांला नकार द्यावा लागत आहे' असं स्पष्टच लिहून टाकलंय मामांनीं रावबहादुरांना, आणि तें पत्र त्यांना आज दुपारीं मिळालं असेल. माझं पत्र त्यांच्या चिरंजीवांना माधवनं एवढ्यांत नेऊन दिलं असेल सुद्धां. चांगलाच भडका उडेल त्यांच्या घरीं आतां. सेचाळीस मुलींची तुम्हीं वाटेल तशी शोभा केलीत पण सत्तेचाळिसावी मुलगी तुमच्या जन्मभर लक्षांत राहील म्हणावं.

राहतां राहिला प्रश्न मालिनीचा. तिच्या वडिलांना पत्र लिहून विचारण्याचा माझा बेत मामांना पसंत नाहीं. ते म्हणतात कीं त्यांची संमति आपण मिळवतों. त्यांत कुठें बिघडलं ? तें तर अधिक चांगलं. पोक्त माणसांची समजूत पोक्त माणसांकडूनच काढली पाहिजे हेंच खरं. मामा वस्ताद खरे. 'बुद्धिवाद' निरुपयोगी ठरला तर त्यांनीं माधवची पत्रिका सुद्धां मालिनीच्या पत्रिकेशीं जुळती करून घेतली आहे. गोत्राची अडचण निघाली तर माधवला ते दत्तक देखील घेतील. पण मला वाटतं, असलं नाटक करावं लागणारच नाहीं. मामा स्वतःच त्यांच्याकडे गेले कीं खात्रीनें काम फत्ते करून येतील. अण्णासाहेबांना देखील एका परीनें आपला मान राखल्यासारखं वाटून समाधान होईल. आणि इतकंहि करून नाहींच भागत असं वाटलं तर...मामांची तार यायचा अवकाश, दोन तासांत माधव-मालिनीचं लग्न अगदीं यथाविधी लावून टाकूं...तिच्याबद्दल आतां माझी खात्री झाली आहे. आठ दिवसांत किती फरक पडला आहे तिच्यांत ! मुली जात्या दुबळ्या मनाच्या असतील— पण एकदां निश्चय झाला कीं त्यांच्या ठिकाणीं असामान्य धैर्य येतं हें कांहीं खोटं

नाहीं. पण माझं पुढें काय ?...सध्या दुसऱ्यांचीं लग्नं जमवण्याचा अनुभव तर घेतें. त्या अनुभवावरून माझ्या लग्नाचा फॉर्म्युला ठरवतां येईल मला. ...वा ! मी तर मोठी समाजकार्य-कर्ती होऊं पाहतेंय् ! ... पण रावबहादुरांच्या घरीं काय चाललं असेल एव्हांना ?...

---

## निशिकान्ताची रोजनिशी

पुणें ता. १० जानेवारी १९४३

...सत्तेचाळिसावी मुलगी !...डोकं फिरून गेलं आहे कालपासून. मातोश्री, आतां आणखी मुली पाहायला जा कीं ! मात्र तुम्ही एकटयाच जा बरं. लग्न करायला निघाली आहे माझं. तुम्हाला हजारांतली मुलगी हवी नाहीं का ?...झक्क झालं अगदीं. बाबांनीं बांगड्याच भरल्या आहेत जशा कांहीं,...वेळ आली म्हणजे बोलावंच लागतं. पण त्या पोरीनं बोलण्याचं कामच ठेवलं नाहीं. एका दगडानं तिघांचीं नाकं ठेंचलींन् चांगलीं. मला कल्पना नव्हती कीं हें सगळं नाटक करते आहे ती म्हणून. ...पण तसं पाहिलं तर खरं आहे तिचं म्हणणं. चारचौघांत कबूल नाहीं केलं तरी पण स्वतःशींच कबूल करणं भाग आहे... आतां माझे डोळे चांगले उघडले आहेत. काल तिचं पत्र आलं तेव्हा मी भयंकर चिडून गेलों हें खरं....पण आतां मला तिचं म्हणणं पटलं आहे. एका परीनं तिनं केवढं तरी काम केलं आहे. मुद्दामच तिचं पत्र मी आईला अन् बाबांना वाचायला दिलं. सुशीलेच्या मामांचं पत्र दुपारींच आलं होतं हें मला काय माहीत ? काय दोघंही चिडलीं माझ्यावर ! पण आतां लग्नाच्या बाबतींत आईनं चांगलाच धडा घेतला असेल. केवळ तिच्या तोंडाला आणि आजवरच्या हट्टी स्वभावाला भिऊन मी इतक्या मुली पाहण्याचा मूर्खपणा करीत होतों...छे, आतां दोन वर्षं

लग्नाचं नांव नको. सत्तेचाळिसावी मुलगी !! आम्हां सगळ्यांना चांगलीच आठवण राहील तिची....मी तर पत्र लिहून तिचे आभारच मानणार आहें.

---

## मालिनीची रोजनिशी

पुणें ता. १७ जानेवारी १९४३

अमळनेरहून निघतांना मला कल्पना तरी होती का, माझ्या आयुष्यांत इतक्या थोड्या वेळांत एवढं स्थित्यंतर होईल म्हणून ? माझं लग्न झालं म्हणून नाहीं मी म्हणत. लग्न केव्हांतरी व्हाय-चंच– मग कुणाशींही गांठ पडो. लग्न झाल्यानंतर मुलींमध्यें फरक पडतो म्हणतात, पण माझ्यामध्यें आधीं फरक झाला– मी पुरती बदललें- आणि मग माझं लग्न झालं. अजून देखील मला नवल वाटतं साऱ्या गोष्टींचं. पूर्वीच्याच माझ्या मनोवृत्तींत आणि अण्णांचा प्रयत्न चालला होता त्या प्रकारानं, ज्याची माझी तोंडओळखसुद्धां नाहीं, क्षणभरच ज्याला पाहून मीं माझी संमति– ती देखील विचारली तर– द्यायची, अशा अगदीं खूप श्रीमंत मुलाशीं माझं लग्न झालं असतं तर मी पूर्वीइतकीच लग्नानंतर देखील मनांत दुर्बलच राहिलें नसतें का ? पण आतां मला एका प्रकारचा आत्मविश्वास आला आहे. कदाचित् त्या आत्मविश्वासाचं फळ म्हणूनच अण्णा आणि आई यांचा आशी-र्वादही मला मिळाला आहे. सुशीलेनं किती समंजसपणानं साऱ्या गोष्टी घडवून आणल्या ! तिच्या मामांनीं तिला पोक्त-पणानं साह्य केलं आणि त्यांच्यामुळेंच सगळं कांहीं गोडीनं पार पडलं. अण्णा आले तेव्हां मला त्यांच्यापुढें जाण्याचं धैर्य होईना. पण त्यांची ती प्रेमळ हाक ऐकली मात्र, आणि...अण्णांच्या डोळ्यांत मीं प्रथमच पाहिलेले ते अश्रु आनंदाश्रु होते. प्रसंगीं कितीही कठोर वाटलं तरी जन्मदात्या आईबापांचं मन आहे तें.

...जावं त्याच्या वंशा तेव्हां कळे....पण आतां पुरे झालं लिहिणं ... लिहायचं म्हटलं तर सकाळपर्यंत लिहीत बसलें तरी संपायचं नाहीं. माझं मन कसं गुलाबासारखं फुललं आहे.... मधुर सुवास घ्यायचा सोडून, त्याच्या पाकळ्यांची वर्णनं करीत बसूं ? इतकी कांहीं मी अरसिक नाहीं... छे, पण खूपच विनोद आहे बाई ! सत्तेचाळिसावी मुलगी ! ! सुशीलेच्या धीटपणामुळं ती जेवढं काम करूं शकली तेवढं शेकडों व्याख्यानांनीं आणि कादंबऱ्यांनीं देखील झालं नसतं. तिला कुणी फाजील म्हणून दोष देतीलही कदाचित्. पण श्रीमंतीच्या आणि मोठेपणाच्या बळावर माणुसकीला पारखे झालेल्यांचे डोळे उघडायला असलेच जालीम उपाय योजायला नकोत का ?

———

## वांचवा ! वांचवा ! : : ७

तो प्रसंग मी केव्हांही विसरणार नाहीं.

साहित्यभैरव केरोपंत महाबळेश्वर यांच्या गंभीर आजाराची खबर लागल्यापासून त्यांचें घर भेटायला येणाऱ्या लहानमोठ्या स्नेह्यांनीं, मोठमोठ्या हपीसरांनीं आणि वेगवेगळ्या 'कॅलिबर'च्या साहित्यिकांनीं कसें गजबजून गेलें होतें. केरोपंतांचे प्रच्छन्न शत्रू देखील भेटायला येणाऱ्यांच्या यादींत आपलें नांव छापून येईल ह्या आशेनें आपल्या आगमनानें त्यांना हैराण करूं लागले होते.

केरोपंतांचा आणि माझा परिचय म्हणण्यासारखा– निदान ते फारच आजारी असतांना त्यांच्या बिछान्यापर्यंत जाऊन, आणि चेहरा लांब करून, 'बरं वाटतंय् ना आतां?' असें विचारण्याइतका– नव्हता. पण त्यांचे एक पुरातन स्नेही परगांवाहून त्यांना भेटण्यासाठीं आमच्याकडे येऊन उतरले आणि त्यांच्याबरोबर मला देखील केरोपंतांच्या घरीं जावें लागलें.

आंत गेलेले लोक बाहेर पडेपर्यंत आमचे पाहुणे आणि मी दिवाणखान्यांतच बसलों होतों. एकामागून एक असे चार पांच पोक्त गृहस्थ गंभीर चेहऱ्यानें केरोपंतांच्या रुग्णमंदिरांतून दिवाणखान्यांत आले आणि फारसा गोंगाट न करतां बाहेर पडले. एकं-

दरींत, केरोपंतांचा आजार, वर्तमानपत्रांपुरताच नव्हे तर खरोखरच, गंभीर असला पाहिजे अशी आमची खात्री झाली.

आम्हीं त्यांना पाहायला जाण्यासाठीं उठणार इतक्यांत, साठी उलटलेले एक गृहस्थ बाहेरच्या दरवाज्यापासूनच आम्हांला आणि आजूबाजूच्या रिकाम्या खुर्च्यांना हंसतमुखानें नमस्कार करीत आंत आले. गैरसमजानें कां होईना, तरी पण नमस्काराची परतफेड करण्याचा शिष्टाचार आम्हांला पाळावाच लागला.

"अलभ्य लाभ, अलभ्य लाभ ! आपली भेट होणं म्हणजेऽऽ म्हणजे अलभ्य लाभच नाहीं तर काय ? ठीक चाललंय ना ? अगदीं चारचौघांत हें करण्यासारखीं माणसं आपण..." असें म्हणत आणि आपले जोडलेले हात नमस्कारांचें अखंडत्व साधण्यासाठीं पुढेंमागें हालवीत ते गृहस्थ सरळ केरोपंतांना भेटायला आंत निघून गेले.

ते आम्हां दोघांपैकीं कोणाला उद्देशून बोलत गेले हें कळणें शक्यच नव्हतें.

'आपल्या माहितीचे आहेत ?' मीं पाहुण्यांना विचारलें.

'छे हो ! मला वाटलं तुमच्या ओळखीचे असतील.' पाहुण्यांनीं उत्तर दिलें.

मग कुणाला अभिवादन केलें त्यांनीं ? खरें बोलायचें तर त्यांचा तो अभिनय कोणाही नामांकित नटाला लाजवील इतका उत्कृष्ट—अगदीं par excellence होता.

केरोपंतांचे ते एकादे जिवश्चकंठश्च स्नेही असावेत एवढेंच अनुमान करून आम्ही स्वस्थ बसलों.

पण त्यांना आंत जाऊन क्षणभरहि लोटला नसेल इतक्यांत... 'वांचवा...सत्कार, तैलचित्र...वांचवा ! वांचवा !' असें भयंकर ओरडणें आंतून ऐकूं आलें.

विचार करीत बसण्याची ती वेळ नव्हती. धांवतच आम्ही दोघेही त्या भयप्रद आवाजाच्या दिशेनें आंत घुसलों. एक दालन

ओलांडतांच आम्ही केरोपंतांच्या रुग्णमंदिरांत पोचलों....

"वांचवा ! वांचवा !..." केरोपंत भ्रमांतल्याप्रमाणें, आतांच त्यांना भेटायला आलेल्या त्या गृहस्थाकडे भेदरलेल्या दृष्टीनें पाहात, ओरडत, उठून बसण्याचा प्रयत्न करतांना पुनः पुनः बिछान्यावर कोलमडत होते.

—आणि तो गृहस्थ आ वासून त्यांच्याकडे पाहात–पळून जाण्याच्या विचारांत असावा अशा पवित्र्यांत– उभा होता.

क्षणार्धांत घरांतली सर्व मंडळी केरोपंतांभोवतीं जमा झाली.

"ह्याला आधीं हाकला....मला जगायचं आहे...त्याचं चित्र फाडून टाका...वांचवा ! हाकला त्याला..." असेंच कांहीं तरी त्वेषानें आणि भीतीनें केरोपंत बरळत होते.

—कुणीं सांगायच्या आधींच तो गृहस्थ खोलीबाहेर सटकला.

आणि कपाळावर हात आपटीत केरोपंत अंथरुणावर पडले. पण पडल्या पडल्या त्यांनीं आपल्या मुलाला हांक मारून म्हटलें...'अरे त्याच्या घराची झडती घे. माझं तैलचित्र तो करीत असेल तें फाडून जाळून टाक. मला जगायचं आहे अजून...आणि मेलों तरी त्याच्या हातचं स्मारक करून पुनः मारूं नका रे मलाऽ ! ओऽय ! अन् पुन्हां त्याला येऊं देऊं नका इथें...'

माझ्या पाहुण्यांकडे केरोपंतांचें लक्ष जातांच त्यांची चर्या पालटली. मोठ्या प्रेमानें त्यांना जवळ बोलावून ते त्यांच्याशीं अडखळतच पण मनापासून बोलूं लागले; आणि मी मागच्या पावलीं दिवाणखान्यांत जाऊन बसलों.

आतांच्या ह्या विचित्र प्रसंगाला कारण झालेले ते गृहस्थ केव्हांच पसार झाले होते.

* * * *

आमचे पाहुणे घरीं आल्यानंतर त्या प्रसंगाचा खुलासा त्यांच्याकडून आणि अन्य कांहीं साधनांच्या द्वारा मला कळला तो असा—

'निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते' ह्या सुभाषिताप्रमाणें महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनाच्या अनेक दालनांमध्यें स्थिति झालेली आहे. खऱ्या वृक्षराजांच्या अभावीं, निरुपाय म्हणून कां होईना, पण विभूतिपूजेची तहान भागविण्यासाठीं, अनेक एरंडांचें द्रुमत्व, त्यांच्या 'किंचित् विद्वत्ते'च्या पल्लवांच्या आधारावर समाजानें मान्य केलें आहे. अनुकूल कालीं जन्माला आल्यामुळें मोठे हपीसर झालेले मंदधि आणि तशाच प्रकारच्या अनुकूलतेमुळें 'पायोनिअरशिप' लाभलेले अल्पगुणी विद्वान् आज नव्या पिढीच्या रास्त आकांक्षांच्या आणि वास्तव हक्कांच्या आड पदोपदीं येत असलेले दिसतातच कीं नाहीं ?

साहित्यभैरव केरोपंत महाबळेश्वर, आणि त्यांच्या रुग्णावस्थेंतच अगदीं अकल्पित रीतीनें त्यांना 'वांचवा, वांचवा !' असें ओरडायला लावणारे ते वृद्ध गृहस्थ –चित्रकार सुरकांडे– हे दोघेही वरच्याच जातींतले गाळीव नमुने होत.

साहित्यभैरव केरोपंत आणि चित्रकार सुरकांडे म्हणजे सामाजिक, साहित्यिक किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या समारंभाचे दोन आधारस्तंभ– छे, शोभेचीं तोरणेंच–म्हटलें तर त्यांच्या खऱ्या भूमिकेची थोडीशी कल्पना येईल.

केरोपंतांचा मुख्य व्यवसाय कोणता म्हणून विचारलें तर उत्तर देणेंच कठिण पडेल. ते प्राध्यापकही आहेत आणि साहित्यिकहि आहेत; इतिहास-संशोधक आहेत तसेच धर्मपंडितही आहेत. प्रत्यक्ष भरीव कामगिरी करून दाखविण्याची वेळच कधीं त्यांच्यावर आली नाहीं, यामुळें त्यांच्या कर्तृत्वाची झांकली मूठ अद्यापिही तशीच आहे. तथापि परिस्थितीच्या अनुकूलतेमुळें आणि असामान्य धोरणीपणामुळें त्यांनीं अल्पावधींतच आपलें स्थान महाराष्ट्राच्या पहिल्या पांच विभूतींमध्यें निश्चित करून टाकलें. आणि अजूनहि ते 'मोठयांचे' अनभिषिक्त अग्रणीच आहेत.

—अलिकडे तर त्यांच्या मोठेपणाला किंमत येऊं लागल्यामुळें म्हणा किंवा आपला मोठेपणा नेहमीं ताजातवाना ठेवण्याच्या इच्छेनें म्हणा– ते कोणत्याही कलेवर देखील अभिप्राय देऊं लागले होते. वास्तविक कुठल्याच कलेचा आणि त्यांचा दूरचासुद्धां संबंध नव्हता आणि नाहीं—पण त्यांचा स्वतःविषयीं गैरसमज व्हायला कारणहि तसेंच झालें. तें कारण म्हणजे—चित्रकार सुरकांडे !

त्याचा इतिहास असा आहे—

मूळ व्यवसायांतून सेवानिवृत्त झाल्यानंतर सुरकांड्यांना वेळ जाण्याला कोणतेंही साधन उरलें नाहीं. आणि त्यांचा लुडबुडा स्वभाव कांहीं त्यांना स्वस्थ बसूं देईना. त्यांनीं खूप विचार केला, पण रिकामपणामुळें त्यांचे हाल होऊं लागले.

आणि मग एकदम त्यांना आठवलें कीं आपल्या ड्रॉइंगच्या तीन परीक्षा चाळीस वर्षांपूर्वीं झाल्या आहेत.

झालें ! त्यांनीं चित्रकारच व्हायचें ठरविलें. तावडतोब त्यांनीं आपल्या जुन्या साहित्याचा शोध चालू केला आणि तें त्यांना मिळालेंही. मात्र रंगाच्या पेटींत रंगाच्या वड्याच तेवढ्या नव्हत्या आणि ब्रशांचे केस झुरळांनीं खाऊन टाकलेले होते !

पण त्यामुळें ते थोडेच नाउमेद होणार ! त्या शहरांतल्या साऱ्या ड्रॉइंग मास्तरांच्या त्यांनीं भेटी घेतल्या. चित्रकार होण्याच्या नुसत्या संकल्पाच्या बळावरच त्यांनीं चित्रकार-मंडळाची स्थापना देखील अल्पावधींतच करून टाकली.

पण कुणातरी मोठ्याशा साहित्यिकाचा अबदागीर पाठीमागें असल्याशिवाय, होऊं घातलेल्या ह्या चित्रकाराला आणि त्याच्या चित्रकारमंडळाला शोभा आणि महत्त्व कशीं येणार ? पण सुरकांड्यांनीं यावरही तत्काळ उपाययोजना केली.

इतिहासोपयोगी-पुरातन-वस्तुसंग्रहालयांत त्यांनीं केरोपंतांची एक दिवस भेट घेतली.

केरोपंत त्या वेळीं एका जुन्या चित्रापुढें ध्यानस्थ उभे होते.

'वाहवा ! आणि म्हणे महाराष्ट्रांत चित्रकला नव्हती.'

सुरकांड्यांच्या ह्या शब्दांनीं केरोपंतांची चित्रसमाधी उतरली. तें पेशवाईतलेंच चित्र असलें पाहिजे– एरवीं इतकें चांगलें कसें असूं शकेल ? असें मनाशीं ठरवीत सुरकांड्यांच्याकडे ते पाहूं लागले.

'छान ! आपली शोधकबुद्धी आणि रसिकता म्हणजे अगदीं असामान्य आहे.' कमालीचा आदर दाखवीत, अगदीं हुजऱ्याप्रमाणें केरोपंतांना नमस्कार करीत सुरकांडे बोलूं लागले. 'आपण अगदीं... म्हणजे चारचौघांत आपलं हेंच केलं पाहिजे...म्हणजे...'

केरोपंतांना प्रथम कांहींच उलगडा झाला नाहीं. पण बोलणारे आपली स्तुती करीत आहेत एवढें त्यांना कळलें आणि हंसतच त्यांनीं सुरकांड्यांना विचारलें, 'ओळखलं नाहीं मीं. आपण कोण ?'

'मी म्हणजे तसा कुणी हा नाहीं...पण चित्रकलेची लहानपणापासून आवड आहे मला...चित्रकार सुरकांडे म्हणतात तो मींच... हॅ हॅ हॅ... !'

'तुम्ही चित्रकार आहांत होय ? ठीक. आमच्याजवळचीं जुनीं चित्रं खराब झालीं आहेत– फाटलीं आहेत तेव्हां...म्हटलं...' केरोपंतांनीं आपला मनोदय सूचित केला.

'हो ! हो ! संग्रहालयाचं काम आहे...अवश्य. अगदीं आनंदानं करीन.' सुरकांड्यांनीं पूर्वीच्याच चपराशी वृत्तीनें उत्तर दिलें.

'अहो, पण खर्च काय येईल तें कळायला नको का आधीं ?' केरोपंतांनीं व्यावहारिक सवाल केला.

'छे ! छे ! खर्च कसला घेऊन बसलांत ? अहो, मला काय कमी आहे ? संग्रहालयाचं काम. मला कांहींसुद्धां नको.'

'असं कसं चालेल ?' केरोपंत म्हणाले.

'अहो कां नाहीं चालणार ? मला साडेतीनशें पेन्शन आहे...' सुरकांड्यांनीं नम्रपणें उत्तर दिलें.

'ऑऽऽ ?' सुरकांड्यांविषयीं एकदम उत्पन्न झालेल्या आदराचें ओझें सहन न झाल्यामुळें केरोपंत मटकन खुर्चीवर बसले.

* * * *

पुढें चारदोन महिन्यांतच सुरकांडे पेन्शनर महाराष्ट्राचे 'सुप्रसिद्ध चित्रकार सुरकांडे' बनले. चित्रकलेवर ते व्याख्यानेंही देऊं लागले. चित्रकार मंडळाचे ते तर संस्थापक होतेच.

लौकरच, कोणत्याही जिवंत किंवा दिवंगत विभूतीच्या तैल-चित्राचें अनावरण व्हायचें म्हणून ऐकू आलें म्हणजे तें 'चित्रकार सुरकांड्यांनींच' केलेलें तैलचित्र असणार आणि केरोपंतांच्या हस्तेंच त्याचा अनावरण समारंभ होणार हें जसें कांहीं ठरूनच गेलें. कारण, केरोपंतांची स्तुती दहावेळां तरी, संधि मिळेल तिथें केल्या-शिवाय सुरकांड्यांचा एकही दिवस जात नसे. आणि अर्थात् ह्या स्तुतीचे पडसाद केरोपंतांपर्यंत गेल्याशिवाय राहत नसत.

कारण तेव्हांपासून कुणाचाही सत्कार, एकसष्टी किंवा स्मारक करण्याचा बूट निघाला कीं, साहित्यक्षेत्रांतल्या त्यांच्या असामान्य स्थानामुळें लोक केरोपंतांचा सल्ला घ्यायला येत आणि तैलचित्रा-साठीं केरोपंत आपण होऊन 'चित्रकार सुरकांडे' यांची शिफारस करीत. एवढ्या बडया माणसाची शिफारस खिशांत पडल्यामुळें सुरकांडयांची मग जी चलती झाली ती कांहीं विचारूंच नका. केरोपंतांची आपल्यावर अशीच मेहेरनजर कायम राहावी यासाठीं सुरकांडे म्हणजे केरोपंतांचें स्तुतिपाठक यंत्रच झाले असें म्हणाना. चुकून कुणी आपण होऊन त्यांना चित्राची ऑर्डर द्यायला आला तर सुरकांडे मोठ्या पोक्तपणानें अध्यक्षपदासाठीं केरोपंतांचेंच नांव सुचवीत आणि वर म्हणत...'पाहा, माझ्याकडून चित्र काढून घ्यायचं तर अध्यक्ष तितक्याच पात्रतेचा पाहिजे...!"

गिऱ्हाइकांना खूष राखणें हा तर सुरकांड्यांच्या हातचा मळच होता. 'विनामूल्य' चित्र करून देण्याची भाषा ते आपण होऊन

काढीत आणि 'फक्त खर्च तुम्हीं देणारच. तेवढा मला पुरे कीं !' मला पैसे का मिळवायचे आहेत ? अहो, प्रेमाचं आणि आदराचं काम आहे हें!' ह्या त्यांच्या बोलण्यानें गिऱ्हाइक अर्धें गार पडत असे. मग दीड रुपयाच्या मांजरपाटाला अठ्ठावीस रुपयांचा कॅन्व्हास बनवून ते चित्राचा खर्चच पन्नासांच्या वर नेत. वर, चित्र 'विना-मूल्य' दिल्याचा मोठेपणा आणि प्रसिद्धी! शिवाय त्यासाठीं त्यांना 'प्रेमाचा आहेर' म्हणून केव्हां पैसे, तर केव्हां जरीकाठी उपरणें; केव्हां चांदीच्या मुठीची काठी तर केव्हां सोन्याचा मुलामा दिलेलें चांदीचें एकादें पदक अशा वस्तु मिळत त्या वेगळ्याच.

चित्रकला म्हणजे हौसेनें कांहींतरी रंगविण्याची कला इतकेंच ज्ञान त्याबाबत मोठमोठ्या लोकांना देखील असल्यामुळें वृद्ध सुरकां-ड्यांच्या तपश्चर्येचें फळ म्हणूनच एक दिवस चित्रकलेचें प्राध्यापक म्हणून एका स्त्रियांच्या कॉलेजांत त्यांची नेमणूक देखील झाली.

पण लौकरच, मुंबईच्या स्कूल ऑफ आर्टमध्यें शिक्षण घेऊन आलेला एक विद्यार्थी गांवांत क्लास उघडण्याच्या विचारांत असल्याचें सुरकांडयांना आणि चित्रकारमंडळांतील त्यांच्या जन्मजात चित्र-कार स्नेह्यांना कळलें. मनांतून घाबरलेले असतांना देखील चित्रकार सुरकांडे आपल्या प्रभावळीला म्हणाले– 'अरे कालचीं पोरं रे हीं ! चित्रकला कशाशीं खातात हें ठाऊक तरी आहे का ह्यांना ? राजा रविवर्मा काय बर्न साहेबाच्या हाताखालीं गेला होता कीं काय शिकायला ? बाबानों, तें तपश्चर्येचं काम आहे.'

पण दुसऱ्याच दिवशीं, क्लास उघडण्याच्या विचारांत असलेल्या त्या डिप्लोमा-होल्डरकडे आपण होऊन ते गेले. 'आपलं नांव ऐकून आलों आहें मी...' अशी सुरवात करून त्यांनीं त्याचीं चित्रं पाहिलीं आणि मग त्याची तोंडभर स्तुती केली. शेवटीं जातां जातां त्याला म्हणाले, 'छे बुवा ! तुम्हीं म्हणजे अगदीं क्रान्तीच केली आहे...चारचौघांत तुमचं हेंच करायला पाहिजे... ! पण तुमच्या

गुणांचं चीज इथें होतांना कठिणच दिसतं आहे !'

तोंडावर स्तुती आणि पाठीमागून नालस्ती ह्या सुरकांड्यांच्या रीतीची पुष्कळांना ओळख होऊं लागली, आणि स्त्रियांच्या कॉले-जांतसुद्धां कांहीं तरी कुरबुर होत आहे अशी जेव्हां त्यांना शंका आली तेव्हां आपल्या मानाचें व स्वार्थत्यागाचें स्थान अढळ राखण्याच्या उद्देशानें ते म्हणाले, 'अहो, तरण्याताठ्या मुलींचा प्रश्न आहे. मी इथें काम करतों तो एवढ्याच हेतूनं. आणि आर्टस्कूल म्हणजे काय समजतां तुम्ही ? तो सालोमनसाहेब मला बोलवीत होता डायरेक्टर म्हणून. पण मीं म्हटलं ह्या वयांत त्या उठाठेवी कराव्या कुणीं ?

नवे चित्रकार गांवांत आल्याकारणानें सुरकांडांच्या गिऱ्हाइकां-मध्यें देखील अनिश्चितपणा सुरू झाला. गिऱ्हाइक पक्कें करण्या-साठीं सुरकांडे सांगूं लागले, 'अहो हें पाहा, माझे केस पिकले चित्रं काढून. हीं कालचीं पोरं काय करणार आहेत ? काळ्या माणसाचा पोर्ट्रेट काढायला अस्सल इंग्रजी भारी आयव्हेरी ब्लॅक मी वापरतों. त्यांच्याजवळ भिकारडे जपानी रंग आहेत. वार्निश देखील वापरा-यचं माहीत नाहीं त्यांना...शिवाय पैसे तर कुणीकडच्या कुणीकडेच मागतात. अहो, मिशांचे केस काढायला मी झिरो नंबरचा ब्रश वापरतों त्या ब्रशालाच नुसते साडेअकरा रुपये पडतात. त्या पोरां-जवळ आहेत का असले ब्रश नि इंग्लिश मेकचे भारी रंग ?... काय सांगताय काय ?... मला खात्री आहे कीं तुम्ही माझ्याकडेच येणार शेवटीं. आपला राग नाहीं हां कुणावर... अहो, आपल्याला प्रसिद्धीची जरूरच नाहीं. माझ्या दोन ट्रंका भरल्या आहेत मेडल्सनीं आणि सर्टिफिकिटांनीं ! पण मला त्यांचं महत्त्व वाटतच नाहीं तर लोकांना कशाला दाखवूं ?'

पण स्वहितरक्षणार्थ ते आतां अधिक तत्पर राहूं लागले. कुणाचा सत्कार व्हायचा आहे असें कळण्याचा अवकाश कीं त्याचें तैलचित्र

सुरकांड्यांच्या घरीं, कुणीं सांगायच्या आधींच, तयार व्हायला लागायचें– आणि एक दिवस अचानक सत्कार-समितीकडे 'विनामूल्य' तें येऊन दाखलहि व्हायचें. कुणाचेंही स्मारक व्हावयाचें असो, सुरकांड्यांकडे त्या हुतात्म्याची तैलप्रतिमा तयार ! साहित्यिकांमध्यें आणि इतरहि मोठमोठ्या मंडळीमध्यें त्यांनीं आपली ये जा अलिकडे अधिक जागरुकतेनें चालू केली.

—आणि एक दिवस, प्रारंभीं वर्णन केलेल्या विचित्र प्रसंगाच्या मुळाशीं असलेली गोष्ट घडली.

एक नामांकित, मोठे वजनदार गृहस्थ महिन्या दोन महिन्यांच्या आजारानंतर पंचत्व पावले आणि शहरांतली जी प्रमुख मंडळी त्यांच्या अंत्यविधीसाठीं हजर होती त्यामध्यें चित्रकार सुरकांडे हे एक होते. दिवंगतावर स्मशानांत दुःखपूर्ण स्तुतिसुमनें वाहण्यांत चित्रकार सुरकांड्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. बोलतांना त्यांचा कंठ दाटून आला आणि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. 'अशा ह्या थोर विभूतींचं स्मारकही त्यांच्या मोठेपणाला साजेसंच झालं पाहिजे...' असें शेवटीं बोलून उपरण्यानें डोळे पुशीत सुरकांड्यांनीं आपलें भाषण संपविलें तेव्हां, 'म्हातारा किती हळव्या मनाचा आहे !' असे उद्गार निघाले.

स्मशानयात्रेहून परत येतांना चित्रकार सुरकांडे केरोपंतांना म्हणाले, 'असेच जरा आमच्या घरावरून चला. थोडं काम आहे.'

घरीं पोंचल्यावर केरोपंतांना त्यांनीं चकितच करून सोडलें.

ज्या गृहस्थांच्या अंत्यविधीहून ते आतांच परतले होते त्यांचेंच जवळजवळ पूर्ण झालेलें तैलचित्र केरोपंतांच्या पुढें ठेवून ते म्हणाले,

'ह्यांचं स्मारक हें व्हायचंच. तर म्हटलं लक्षांत असूंद्या तुमच्या. ...चित्र तयारच आहे म्हणाना...प्रेमाचं काम आहे हें...'

'ठीक आहे. पण त्याला अवकाश आहे अजून.' असें म्हणून केरोपंत निघून गेले.

* * *

लौकरच केरोपंत कशालासे मुंबईला गेले. योगायोगानेंच त्यांच्या एका स्नेह्याबरोबर कोटांतील 'म्यूझियम' पाहायला ते गेले– आणि तेथील चित्रविभागांतलीं, वेगवेगळ्या देशांतील नामांकित चित्रकारांनीं काढलेलीं तीं चित्रें पाहून चित्रकलेविषयींच्या आजवरच्या त्यांच्या कल्पनेला जबरदस्त धक्का बसला. त्या चित्रसमूहामध्यें हिंदी चित्र-कारांच्याही उत्कृष्ट कलाकृती होत्या आणि त्याही केरोपंतांच्या दृष्टींतून सुटल्या नाहींत.

तीं चित्रें पाहात असतांना, चित्रकार सुरकांड्यांचीं तैलचित्रें म्हणजे 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां' असें म्हणायला लावणारीं भूतचित्रेंच म्हटलीं पाहिजेत असें त्यांनाच वाटूं लागलें. चित्रकला म्हणजे ताणलेल्या कपड्यावर चौक आंखून व वेगवेगळे रंग भरून केलेल्या छायाचित्रांच्या निर्जीव, विडंबनात्मक, भयप्रद प्रतिकृती नव्हेत ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं येऊन चुकली.

आणि सुरकांड्यांच्या तैलचित्रांची ती भुतावळ त्या म्यूझियम-मध्येंच केरोपंतांच्या मनःचक्षूंपुढें थैमान घालूं लागली. शेवटीं ते उद्वेगानें स्वतःशींच म्हणाले– 'चित्रकार कसला ? ... प्रत्येकाचीं थडगीं बांधायला टपलेला मुडदेफरास आहे नुसता...कुणी आजारी पडला कीं तो पुरता मरायच्या आधींच ह्याच्या घरीं त्याचं तैलचित्र तयार...!'

आणि योगायोग असा कीं मुंबईहून आले तेच केरोपंत भयंकर आजारी पडले.

सुरवातीला सांगितलेला प्रसंग त्या आजारांतच घडला. आणि

खरोखरच चित्रकार सुरकांड्यांच्या घरीं केरोपंतांचें तैलचित्र त्या वेळीं तयार होत होतें.

केरोपंत त्या दुखण्यांतून बरे झाले. परंतु लागलेंच त्यांनीं आपलें मृत्युपत्र करून त्यांत असें लिहून ठेवलें आहे म्हणतात कीं 'चित्रकार सुरकांड्यांकडून माझ्या हयातींत किंवा नंतर, माझें किंवा माझ्या घराण्यांतल्या कोणाही व्यक्तीचें, चित्र काढून घेतलें गेल्यास माझी सगळी इस्टेट धर्मादाय करून टाकण्याचा अधिकार ट्रस्टींना मी देत आहें.'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 73554 वि: निबंध
क्रमांक 9562
REFBK-0006368

## — उत्कृष्ट संग्राह्य पुस्तकें —

| | | |
|---|---|---|
| **पुनर्भेट** भाग ५ वा | य. गो. जोशी | रु. १। |
| **प्रहार** कादंबरी | प. त्रिं. सहस्रबुद्धे | ,, १। |
| **उल्कापात** कथासंग्रह | वि. वि. बोकील | ,, १॥ |
| **सहवास** स्फुट कविता | इन्दिरा व ना. मा. संत | ,, ·॥· |
| **फार फार सुंदर शहर** मुलांसाठीं चटकदार बोधप्रद कथा | भा. रा. भागवत | ,, ·।= |
| **रुपेरी पडद्यामागें** चित्रपटांचें उत्पत्तिशास्त्र | श. य. गुण्ये | ,, १ |
| **घरंदाज** सामाजिक नाटक | प्रो. ना. बा. पराडकर | ,, ·॥· |
| **न बोलायच्या गोष्टी** उपहासकथा | य. ग. वझे | ,, १ |
| **हिमालयांत** (सचित्र) | नो. गो. चापेकर | ,, २॥। |
| **स्त्री आणि सौंदर्य** (सचित्र) | य. ग. वझे | ,, १॥। |
| **राजकवि तांबे** चरित्र व काव्यपरामर्श | प्रो. ना. बा. पराडकर | ,, २ |
| **ठिणग्या** उपहासकथा | य. ग. वझे | ,, १॥ |

**सर्व प्रमुख ग्रंथविक्रेत्यांकडे मिळतात**

**आर्यसंस्कृति प्रकाशन,** पो. बॉ. २१, पुणें शहर.